CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

**आजचा सामना**

चेन्नई सुपरकिंग्ज वि. राजस्थान रॉयल्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली

सोलापूर | मंगळवार, २० मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १९१| पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रत्येक वेळी श्रोते निरनिराळे असतात. विषय तोच असला तरी काळ बदललेला असतो. माझ्या श्रोत्यांचा वेळ वाया जाऊ नये यासाठी नीट तयारी केलीच पाहिजे.

**- एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# भारत धर्मशाळा नाही

## शरणार्थींच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने फटकारले

**नवी दिल्ली, १९ मे**

पूर्वी लिट्टे या दहशतवादी संघटनेचा सदस्य असलेल्या श्रीलंकन नागरिकाच्या आश्रय देण्याच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र संताप व्यक्त केला. भारत धर्मशाळा नाही, जिथे आम्ही जगभरातील नागरिकांना आश्रय देऊ. येथे आधीच १४० कोटी नागरिक संघर्षमय जीवन जगत आहेत, अशा शब्दांत याचिकाकर्त्याला न्यायालयाने फटकारले. आम्ही जर प्रत्येकालाच या देशात आश्रय देत राहिलो, तर आमच्या नागरिकांचे काय होणार, त्यांनी कुठे जावे, असा संतप्त सवालही न्यायालयाने उपस्थित केला.

न्या. दीपंकर दत्ता आणि न्या. विनोद चंद्रन यांच्या दोन सदस्यीय न्यायासनाने एका श्रीलंकन नागरिकाच्या याचिकेवर सुनावणी केली. या नागरिकाला २०१५ मध्ये प्रतिबंधित लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलम अर्थात् लिट्टे या अतिरेकी संघटनेचा सदस्य असल्याच्या आरोपात अटक करण्यात आली होती. त्याच्यावर बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत आरोप निश्चित करण्यात आले होते. सात वर्षांचा शिक्षेचा कालावधी पूर्ण करीत असलेल्या या नागरिकाने आपल्याला शरणार्थींसाठी असलेल्या शिबिरातच वास्तव्य करण्याची परवानगी मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मला माझ्या देशात परत पाठविण्यात आल्यास तिथे मला ठार मारण्यात येईल. त्यामुळे मला भारतातच आश्रय देण्यात यावा, अशी विनंती त्याने केली.

हा भारत देश म्हणजे धर्मशाळा नाही, जिथे जगभरातून कुणीही यावे आणि आश्रय मागावा. आम्ही येथे १४० कोटी नागरिक आहोत. आमचाच संघर्ष आम्हाला पुरत नाही. अनेकांना घर नाही, खायला अन्न नाही. अशा स्थितीत जर आम्ही जगभरातील नागरिकांना येथे आश्रय देऊ लागलो तर आमच्या नागरिकांचे काय होईल, असा सवाल न्यायालयाने केला आणि त्याची याचिका फेटाळून लावली. (वृत्तसंस्था)

### काय आहे प्रकरण?

या श्रीलंकन नागरिकाला २०१८ मध्ये विशेष न्यायालयाने बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्यांतर्गत दोषी ठरवत १० वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली होती. नंतर मद्रास उच्च न्यायालयाने २०२२ मध्ये त्याची शिक्षा सात वर्षांची केली. शिक्षा पूर्ण होताच हा देश सोडून जाण्याचा आदेशही उच्च न्यायालयाने त्याला दिला होता. या विरोधात त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

### श्रीलंकेत धोका असेल तर दुसऱ्या देशात जा

त्याच्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने स्पष्ट केले की, श्रीलंकेत जर तुमच्या जीवाला धोका असेल, तर तुम्ही दुसऱ्या देशात जा, पण तुम्ही भारतात राहू शकत नाही. तुमच्या शिक्षेचा कालावधी आता पूर्ण होत आहे. त्यानंतर तुम्हाला हा देश सोडावाच लागेल.





### आग प्रकरणाची होणार चौकशी

# औद्योगिक वसाहतीत अतिक्रमण, सुविधांचा ४० कोटींचा प्रस्ताव पडून

- जिल्हाधिकारी आशिर्वाद; आज बैठक
- होरपळून ८ जणांच्या मृत्यूने खळबळ
- शासकीय यंत्रणा लागली कामाला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील अंतर्गत रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा या मूलभूत सुविधांसाठी वर्षभरापूर्वी ४० कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे पाठवण्यात आला होता. परंतु त्याबाबत अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही.

एमआयडीसीमध्ये रस्त्यावरील अतिक्रमणमुळे रविवारच्या आगीच्या घटनेत अग्निशामन दलाच्या यंत्रणांना लवकर पोहचता आले नाही. एम आयडीसी उद्योगांसाठी असतानाही अनेक नागरिक या ठिकाणी वास्तव्यास आहेत. असे गंभीर मुद्दे समोर आलेले असून आग प्रकरणी मंगळवार, दि. २० मे रोजी जिल्हा प्रशासनाने बैठकीचे आयोजन केले आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सोमवारी पत्रकार परिषद घेवून माहिती दिली.

अक्कलकोट रोडवरील एम आयडीसी येथे असलेल्या सेंट्रल टेक्स्टाईल या टॉवेल कारखान्याच्या आगी प्रकरणाची चौकशी करणार असून, त्याबाबत आज मंगळवारी दिनांक २० मे रोजी बैठक घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सेंट्रल टेक्स्टाईल या टॉवेल कारखान्याला भीषण आग लागून रविवारी कारखान्याचे मालक व कामगार आणि त्यांच्या कुटुंबातील एकूण आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला होता. यात टेक्स्टाईल पार्कचे मालक उस्मान मन्सुरी, अनस मन्सूरी, मेहताब बागवान, सलमान बागवान, आशाबानो बागवान, हिना बागवान, शिपा मन्सूरी यांच्यासह दीड वर्षाच्या एका बाळाचा देखील दुर्दैवी अंत झाला होता.

महापालिका आयुक्त, महावितरणचे अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी, प्रांताधिकारी, तहसीलदार, अग्निशमन यंत्रणा विभाग यांच्या समवेत आज मंगळवारी बैठक होणार आहे. ही आग नेमकं कशामुळे लागली याबाबत चौकशी केली जाणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी पाच लाख रुपये मदत जाहीर केले आहेत. त्या अनुषंगाने संबंधित मुख्यमंत्री सहायता निधीसाठी प्रस्ताव पाठवले जाणार असल्याचेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

# युको बँकेत ६,२१० कोटींचा घोटाळा

## माजी अध्यक्षाला अटक, ईडीने जप्त केली ५१० कोटींची मालमत्ता

**नवी दिल्ली, १९ मे**

युको बँकेतील ६,२१०.७२ कोटी रुपयांच्या गैरव्यवहारात अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने बँकेचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुबोध कुमार गोयल यांना फसवणुकीच्या आरोपात राजधानी दिल्ली येथील त्यांच्या राहत्या घरातून अटक केली. याप्रकरणी विविध ठिकाणी टाकण्यात आलेल्या छाप्यात आतार्पत ५१० कोटींच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या.

ईडीने यासंदर्भात सोमवारी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, युको बँकेतील फसवणुकीचा प्रकार कोलकाता येथील मेसर्स कॉनकास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेड कंपनीशी संबंधित आहे. गोयल यांनी पदावर असताना बोगस दस्तऐवजाच्या आधारे कंपनीला ६,२०० कोटींपेक्षा अधिकचे कर्ज मिळवून दिले. या प्रकरणी सीबीआयने दाखल केलेल्या एफआयआरची दखल घेत ईडीने एप्रिलमध्येच सुबोध कुमार गोयल आणि इतरांच्या घरांवर छापे टाकत ५१० कोटींच्या मालमत्तावर टाच आणली. त्यानंतर सुबोध कुमार गोयल यांना १७ मे रोजी ईडीने अटक केली. त्यांना पीएमएलए न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना २१ मेपर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे. (वृत्तसंस्था)





# विधान भवनाच्या प्रवेशद्वाराला आग

- आमदार सुरक्षित, शॉर्टसर्किटने आग लागल्याचा अंदाज

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ मे-**

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन तोंडावर आले असताना मुंबईतील विधान भवनाच्या प्रवेशद्वारालगत आग लागल्याची घटना घडली आहे. ही आग नेमकी कशी लागली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ती शॉर्ट सर्किटमुळे लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

मुंबईतील विधानभवन परिसर नेहमीच गजबजलेला असतो. येथे सदैव नेते व त्यांच्या कार्यकर्त्यांची गर्दी असते. एवढेच नव्हे तर सर्वसामान्य नागरिकही येथे आपल्या समस्या घेऊन येत असतात. त्यामुळे सोमवारी दुपारी अचानक विधान भवनाच्या प्रवेशद्वारालागत आग लागल्यामुळे एकच गोंधळ उडाला. यासंबंधीच्या माहितीनुसार, विधान भवनाच्या प्रवेशद्वारालगतच्या परिसरात ही आग लागली आहे. तेथून धुराचे काळे लोट बाहेर येत आहेत. अधिकाऱ्यांनी तत्काळ ही माहिती अग्निशमन दलाला दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. ही आग नेमकी कशी लागली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण प्रवेशद्वारालगत असणाऱ्या स्कॅनिंग मशीनमध्ये शॉर्ट सर्किट झाल्यामुळे ती लागली असावी असा अंदाज व्यक्त केला जात आहे. आगीची घटना घडली तेव्हा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर विधान भवनातील एका कार्यक्रमात होते. त्यांना या घटनेची माहिती मिळताच त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतील. स्थितीचा आढावा घेतल्यानंतर त्यांनी ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचा अंदाज व्यक्त केला. विधान भवनाच्या रिसेप्शन एरियात जी स्कॅनिंग मशीन असते, त्यात शॉर्ट सर्किट झाल्यामुळे छोट्या प्रमाणात ही आग लागली आहे. ती नियंत्रणात आलेली आहे. अग्निशमन दलाच्या गाड्या थोड्याच वेळात येथे येत आहेत. परंतु स्थिती नियंत्रणात असल्यामुळे कुणीही चिंता करण्याची गरज नाही. तूर्त, स्कॅनिंग मशीनमधील शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सर्वजण सुरक्षित आहेत, असे नार्वेकर म्हणाले.

### सुरक्षेत चूक नाही, हा केवळ अपघात

सुरक्षेतील चुकीसंबंधीचा प्रश्न राहुल नार्वेकरांनी धुडकावून लावला. हा एक अपघात आहे. ही आग इस्टाब्लिशमेंटच्या कनेक्शनमध्ये लागली नाही. स्कॅनिंग मशीनमध्ये काही बिघाड झाल्यामुळे शॉर्ट सर्किट झाले असेल. स्थिती पूर्णतः नियंत्रणात आहे. सर्वजण सुरक्षित आहेत.

## महत्त्वाचे

### विविध संस्थांनी तोडले तुर्की संस्थांशी संबंध

नवी दिल्ली : दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानची उघडपणे पाठराखण करणे आणि भारताच्या ऑपरेशन सिंदूरवर टीका करणे तुर्कस्तानला चांगलेच महागात पडते आहे. भारतातील विविध संस्थांनी तुर्कस्तानच्या संस्थांशी असलेले शैक्षणिक संबंध संपुष्टात आणले आहेत. जवाहरलाल नेहरू विद्यापीठ आणि जामिया मिलिया इस्लामिया (जेएमआय) यांनी तुर्की संस्थांसोबतचे त्यांचे विद्यमान शैक्षणिक सामंजस्य करार (एमओयू) स्थगित केले आहेत. दिल्ली विद्यापीठ, कानपूर विद्यापीठ, मौलाना आझाद राष्ट्रीय उर्दू विद्यापीठ यांचाही या यादीत समावेश आहे. 'भारत-पाकिस्तान तणावाच्या पृष्ठभूमीवर पाकिस्तानच्या दहशतवादी कारवायांना तुर्कीने दिलेल्या पाठिंब्याच्या निषेधार्थ हा निर्णय घेण्यात आला आहे,' असे संस्थांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

### भुजबळांच्या पीएकडे खंडणी मागणारा अटकेत

नाशिकः माजी मंत्री छगन भुजबळ यांच्या स्वीय सहायकला मोबाईलवरून संपर्क साधत त्र्यंबकेश्वर येथील फार्महाउसवर आयकर विभागाची छापा पडणार असल्याची माहिती देत मदत हवी असल्यास एक कोटींची खंडणी स्वीकारणाऱ्या आरोपीला पोलिसांनी अटक केली. खंडणीची रक्कम पेठ तालुक्यातील करंजाळीजवळ स्वीकारली असता नाशिक शहर पोलिस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा युनिट-१च्या पथकाने त्याला रंगेहात जाळ्यात घेतले. राहुल दिलीप भुसारे असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. माजी मंत्री भुजबळ यांचा मोबाइल क्रमांक ऑनलाइन पद्धतीने मिळविल्यानंतर राहुल याने पहिल्यांदा २३ एप्रिल रोजी संपर्क साधला.

### मे महिन्यात १८,६२० कोटी विदेशी गुंतवणूक

मुंबई : मे महिन्यात आतापर्यंत विदेशी गुंतवणूकदारांनी १८,६२० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. भारत-पाकिस्तान स्थितीचा तणाव असूनही, एफआयआय भारतीय बाजारात सतत खरेदी करत आहेत. एप्रिलच्या सुरुवातीला, २०२५ मध्ये विदेशी गुंतवणूकदार पहिल्यांदाच ४,२२३ कोटी रुपयांच्या खरेदीसह निव्वळ खरेदीदार बनले. वर्षाच्या पहिल्या तीन महिन्यांत, एफआयआयनी १.४ लाख कोटी रुपयांचे शेअर्स विकले होते. जानेवारी आणि फेब्रुवारी या पहिल्या दोन महिन्यांत, एफआयआयनी अनुक्रमे ७८,०२७ आणि ३४,५७४ कोटींचे शेअर्स विकले होते.

# ब्रह्मोसची जागा घेणार 'स्टार' क्षेपणास्त्र



## ताशी ३०६२ किमीची गती, डीआरडीओचे काम अंतिम टप्प्यात

**नवी दिल्ली, १९ मे**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात् डीआरडीओ सध्या एका अशा स्वदेशी क्षेपणास्त्रावर काम करीत आहे, जे भविष्यात भारत आणि रशियाचा संयुक्त उपक्रम असलेल्या ब्रह्मोस या शक्तिशाली क्षेपणास्त्राची जागा घेऊ शकते. या क्षेपणास्त्राचे नाव 'स्टार.' हे क्षेपणास्त्र विकासाच्या तिसऱ्या टप्प्यात असून, हा त्याचा अंतिम टप्पा असल्याचे डीआरडीओच्या सूत्रांनी सांगितले. त्याच्या काही महत्त्वाच्या चाचण्याही घेण्यात आल्या असून, त्या यशस्वी ठरल्या आहेत. ताशी ३०६२ किमी वेगाने या क्षेपणास्त्राची मारक क्षमता राहणार आहे.

विकासाच्या या तिसऱ्या टप्प्यात डीआरडीओचे अभियंते क्षेपणास्त्राच्या सर्व भागांना जसे, इंजिन, नेव्हिगेशन प्रणाली आणि नियंत्रण प्रणालीला एकत्र जोडत असतात. नंतर युद्धासारखी स्थिती निर्माण करून त्या क्षेपणास्त्राच्या अनेक चाचण्या घेतल्या जातात. यातून अचूक मारा करण्याची त्याची क्षमता आणि प्रभाव याची कल्पना येत असते. या चाचण्यांमधून उपलब्ध होणाऱ्या माहितीतून ते अधिक अत्याधुनिक केले जाते, जेणेकरून युद्धासारख्या स्थितीत त्याचा प्रभावी वापर करता येईल. सध्या डीआरडीओ वेगवेगळ्या वातावरणात आणि परिस्थितींमध्ये या क्षेपणास्त्राचे परीक्षण घेत आहे. या अंतर्गत हे क्षेपणास्त्र जमीन आणि हवाई उपकरणांसोबत व्यवस्थित काम करीत आहे की, याचा अभ्यास केला जात आहे. या सर्व चाचण्या यशस्वी ठरल्यानंतर डीआरडीओ या क्षेपणास्त्राचे मर्यादित स्वरूपात उत्पादन करू शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. (वृत्तसंस्था)

### तिन्ही दलांसाठी उपयुक्त

हे एक स्वदेशी क्षेपणास्त्र असून, यामुळे हवाई दल, लष्कर आणि नौदलाची ताकद कितीतरी पटीने वाढणार आहे. सध्याच्या टप्प्यात देशाचे हे तिन्ही सशस्त्र दल या क्षेपणास्त्राच्या माध्यमातून लक्ष्याचा अचूक भेद करण्याचा सराव करू शकतात. हे क्षेपणास्त्र स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून विकसित केले जात असल्याने ते किमतीच्या तुलनेत स्वस्त असून, भविष्यात ते ब्रह्मोससारख्या क्षेपणास्त्रांसाठी पर्याय ठरू शकते, असे सूत्रांनी सांगितले.




तुमच्या मार्केट परताव्यामध्ये लाइफ कव्हरचा फायदा

नॉन-पार, लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना

- ₹2500/- इतक्या कमी मासिक प्रिमियमने सुरुवात करा
- दोन फंडाच्या निवडीचा पर्याय-निफ्टी 50 (फ्लेक्सी स्मार्ट ग्रोथ फंड) किंवा निफ्टी 100 (फ्लेक्सी ग्रोथ फंड) यांच्या निवडक स्टॉक्समधील गुंतवणूकीच्या 100% पर्यंत
- हमीपूर्वक वृध्दीसह*

* अटी आणि शर्ती लागू

LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA

प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत

LIC/P1/2024-25/22/MAR

अधिक माहितीसाठी तुमच्या एजंट/जवळची एलआयसीची शाखा यांच्याशी संपर्क साधा किंवा 56767474 वर तुमच्या शहराचे नाव एसएमएस करा

एलआयसी मोबाईल ॲप डाऊनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827 | आमचा व्हाट्सअॅप नं. 8976862090 बोला 'Hi' | आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512

भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी विमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या विमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

लिंक्ड इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् हे परंपरागत इन्श्युरन्स प्रॉडक्ट्स् पेक्षा वेगळे असतात आणि हे जोखिम घटकांच्या अधीन असतात.
लिंक्ड इन्श्युरन्स पॉलिसीज् मध्ये भरण्यात येणारे प्रिमियम हे बाजारपेठेतील भांडवल आणि जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्याशी संबंधित गुंतवणूकीच्या जोखमींच्या अधीन असतात. फंडाची कामगिरी आणि भांडवली बाजारपेठ/जाहीररीत्या उपलब्ध असणारा निर्देशांक यांच्यावर परिणाम करणारे घटक यांच्या आधारे युनिट्सचा एनएव्ही कमी जास्त होऊ शकतो आणि विमाधारक व्यक्ती ही त्याच्या/तिच्या निर्णयासाठी स्वत:च जबाबदार असते.
लाइफ इन्श्युरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया हे केवळ लाइफ इन्श्युरन्स कंपनीचे नाव आहे आणि इंडेक्स प्लस हे केवळ संलग्न इन्श्युरन्स कॉन्ट्रॅक्टचे नाव आहे आणि त्यातून कॉन्ट्रॅक्टची गुणवत्ता, त्याच्या भविष्यातील संभावना किंवा परतावे या गोष्टी कोणत्याही प्रकारे सूचित होत नाहीत.
कृपया तुमचे विमा एजंट किंवा मध्यस्थ किंवा इन्श्युरन्स कंपनीने दिलेले पॉलिसी डॉक्युमेन्ट यांच्यामधून संबंधित जोखमी आणि लागू होणारे भार यांची माहिती घ्या.
या कॉन्ट्रॅक्ट अंतर्गत देऊ करण्यात येणारे वेगवेगळे फंड्स ही फक्त फंडांची नावे आहेत आणि ती कोणत्याही प्रकारे या प्लॅन्सची गुणवत्ता, त्यांच्या भविष्यकाळातील संभावना आणि परतावे सूचित करीत नाहीत.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# शेतकऱ्यांना सिबल स्कोअरची अट न घालता कर्ज द्या : मुख्यमंत्र्यांची बँकांना ताकीद

## ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटींच्या पतपुरवठा आराखड्यास मंजुरी

**तभा वृत्तसेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १९ मे-**

शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकरी आत्महत्यांमध्ये होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना सिबल स्कोअर मागू नका, हे वारंवार सांगितले, तरी बँका सिबल स्कोअर मागतात. त्यावर आजच्या बैठकीतच तातडीने तोडगा सांगा. यापूर्वी अशा बँकावर शासनाने एफआयआर पण केले आहेत. हा विषय तुम्हालाच गांभीर्याने घ्यावा लागेल. रिझर्व्ह बँकेने सुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर कोणती बँक शाखा सिविल स्कोअर मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल, असा निर्णय आजच्या बैठकीत घ्यावा, अशा स्पष्ट शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बँकांना तंबी दिली. कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदाच्या वर्षी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोमवारी दिल्या.



राज्यस्तरीय बँकर्स समितीची १६७ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे संपन्न झाली. या बैठकीमध्ये मुख्यमंत्री फडणवीस यांनी या सूचना दिल्या. यावेळी राज्याचे सन २०२५ -२६ या वित्तीय वर्षाचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडा ही बैठकीत मंजूर करण्यात आला. महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकरी हा राज्याचा कणा असून कृषी व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. या भागाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. हवामान विभागाने यंदा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे दुष्काळी परिस्थिती नाही, पीक चांगले येणार आहे. अशात बँकांनी शेतकऱ्यांना अधिक सहकार्य करायला हवे. चांगला पाऊस झाला की कृषी विकासदर चांगला असतो. याचा लाभ बँकांनी ही घ्यावा आणि शेतकऱ्यांनाही द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये सध्या गुंतवणूक धोरण राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बँकांची भूमिका महत्वची असून त्यांनी या गुंतवणूकीमध्ये सहभागी व्हावे. कृषी क्षेत्रामध्ये किमान ५ हजार कोटी प्रतिवर्षी गुंतवणुकीचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आता गुंतवणुकीला नवीन संधी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना जास्तीतजास्त पतपुरवठा करावा. त्याचा बँकांना फायदाच होणार आहे. कृषी क्षेत्र आता फक्त सहाय्यक आणि पुनर्वसनात्मक असणार नाही तर एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहण्यात येईल. यामध्ये बँकांनी त्यांची भूमिका पार पाडावी. शेतकऱ्यांसाठी आणि या योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचे धोरण ठरवावे. जेणेकरून आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल आणि जे चांगले काम करणार नाही, त्यांची नावे घ्या, त्यांच्यावर पुढच्या बैठकीत नाराजीची नोंद व्यक्त करा, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने अर्धा ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा टप्पा पार केला असून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्याकडे वेगाने वाटचाल सुरू आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्यामध्ये बँकांची भूमिका महत्वाची आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. दावोस मधून राज्यात १६ लाख कोटींची थेट गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र आता स्टार्टअप्सची राजधानी आहे. या क्षेत्राकडे ही बँकांनी लक्ष द्यावे. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. एसएसएमईमध्येही राज्य प्रथम क्रमांकावर असून त्यामध्ये गुंतवणुकीस चांगल्या संधी आहेत. बँकांनी आणि शासनाने मिळून एमएसएमईच्या केंद्र आणि राज्याच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यासह देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होणार आहे. तसेच पर्यटन, सेवा क्षेत्र यावर बँकांनी प्रथमिकतेने लक्ष केंद्रीत करावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

फडणवीस पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात मोठ्या संख्येने आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये ते महत्वाची भूमिका बजावू शकतात. गडचिरोलीवर अधिक लक्ष केंद्रीत करावे. त्या ठिकाणी उद्योगांचे जाळे तयार होते आहे. बँकांनी त्यांचे प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवल्यास समग्र विकास होईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना अंमलात आणणे ही बँकाची सुद्धा जबाबदारी आहे. त्यातूनच आर्थिक सर्वसमावेशकता साधली जाईल, असेही फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कृषी कर्ज पुरवठ्याचा विषय बँकांनी गांभिर्याने घ्यावा. तसेच कर्ज पुरवठ्याचे १०० टक्के उद्दीष्ट पूर्ण करावे. उद्योजकांना विशेषतः महिला उद्योजकांना बँकांनी सहकार्य करावे. बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे सचिव राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष आदेश पांडे, सर्व विभागांचे सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य आणि विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

## महत्त्वाचे...

### सर्वपक्षीय डेलिगेशन संसदीय असले पाहिजे : पृथ्वीराज चव्हाण

**तभा वृत्त सेवा। विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१९ मे-**

भारताची भूमिका जगासमोर मांडण्यासाठी भूमिका योग्य असली सर्वपक्षीय डिलिगेशन संसदीय असले पाहिजे, अशी भुमिका काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सोमवारी पत्रकाराशी बोलताना मांडली.



आदिवासी मतावर डोळा असल्याने वादग्रस्त मंत्री विजय शाह यांचा राजीनामा घेण्याचे हिंमत दाखवत नाहीत, असेही त्यांनी सांगितले. काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि अलीकडील निर्णयांवर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी वन नेशन-वन इलेक्शनपासून ईव्हीएम, ऑल पार्टी डेलीगेशन, आशिया कप, पाकिस्तानशी संबंधित जलविवाद अशा सर्व मुद्द्यांवर भुमिका मांडली. ते म्हणाले कि, देशाने युद्धकाळातही पारदर्शिकता राखली आहे. १९६५ मध्ये नेहरू, १९७१ मध्ये इंदिरा गांधी आणि कारगिल युद्धाच्या वेळी अटल बिहारी वाजपेयी संसदेस नियमित माहिती देत असत. आज पंतप्रधान ना जनतेसमोर येतात, ना प्रेस कॉन्फरन्स घेतात, ना संसदेचे अधिवेशन बोलवतात. भारत सरकारचे पीओके संदर्भात स्पष्ट धोरण असले पाहिजे, पण ते दिसत नाही.असे सांगून ते म्हणाले कि,* 'वन नेशन-वन इलेक्शन'चा फायदा जरी दाखवला जात असला तरी, पण ब्रिटीश संसदीय पद्धतीत कधीही लोकसभा किंवा विधानसभा भंग होऊ शकते., 'मी स्वतः १९९६, १९९८ आणि १९९९ मध्ये तीन वर्षांत तीनदा लोकसभा निवडणुका लढल्या आहेत. याचा अर्थ लोकसभा कोणत्याही वेळी भंग होऊ शकते, आणि त्यानंतर उपलब्ध कार्यकाळासाठी वेगळ्या निवडणुका घ्याव्या लागतील.तसेच पुढे आरोप करताना ते म्हणाले कि, केंद्र सरकार अमेरिका-प्रणालीप्रमाणे निवडणूक प्रक्रिया भारतात आणण्याचा प्रयत्न करीत आहे, ज्यावर काँग्रेस विरोध करते. यासह त्यांनी ईव्हीएम वर पूर्णपणे बंदी आणण्याची मागणी पुनः केली आणि म्हणाले, 'जगभर ईव्हीएम विरोध होत आहे, परंतु केंद्र सरकार अद्यापही इव्हिएम हटविण्याची भूमिका घेत नाही. मध्यप्रदेशचे मंत्री विजय शहा यांच्याबाबत बोलताना चव्हाण म्हणाले कि, मोदींनी मनात आणले तर एका तासात विजय शहा याचे मंत्रीपद काढू शकतात, पण त्यांना त्यांच्या मंत्र्यामध्ये आदिवासी वोट बँक दिसत आहे. शहा यांनी ऑपेरेशन सिंदूर मधील भारतीय सेनेच्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत अत्यंत चुकीची प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणावर सर्वोच्च न्यायालयाने ताशेरे ओढले असताना सुद्धा या मंत्र्याला पाठीशी घातले जात आहे, हे अत्यंत निंदनीय आहे.



### स्वभिमानी केसरी बैलगाडा स्पर्धेचा थरार; घार्निगीकर, भवरकरांचा राजा व चित्र्या प्रथम

**पिलीव, दि. १९ मे-**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळशिरस तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांच्या वतीने निमगाव पाटी, विझोरी येथे स्वाभिमानी केसरी २०२५ खुल्या बैलगाडा स्पर्धेचे आयोजन रविवार दि १८ मे रोजी करण्यात आले होते. स्पर्धेचे उद्घाटन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी, खासदा धैर्यशिल मोहिते-पाटील, आमदार उत्तम जानकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अर्जुनसिंह मोहिते-पाटील, ॲड. सोमनाथ वाघमोडे, किशोर सुळ, जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, के. पी. काळे, सचिन पाटील, शिवाजीराव पाटील, नामदेव वाघमारे, तुकाराम देशमुख, युवराज घुले, पांडूरंग वाघमोडे, सुरेश टेळे, दादासाहेब घाडगे, पं. स.अजय सकट, सचिन वावरे, मगन काळे, डॉ. सचिन शेंडगे, सचिन पिसे उपस्थित होते. स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील नामवंत असणारे बकासूर, चित्र्या, अर्जुन राजा, चित्या, चिमण्या, शंभु, बाजिंदा, या बैलांसह बैलगाडा मालक, चालक, शर्यत प्रेमी, बहुसंख्येने उपस्थित होते. शर्यतीचे समालोचन सुनिल मोरे पेंडगावकर व संपत वाघमोडे यांनी केले तर झेंडा पंच म्हणून पप्पू मंडले, पप्पू पेंडगांवकर यांनी काम पहिले. या मैदानात बैलगाडा मालक व शैकीनांची गैरसोय होऊ नये म्हणून पिण्यासाठी थंड पाणी, पशुधनाच्या आरोग्याच्या काळजीकरीता ॲम्बुलेन्स सुविधा दिवसभर मैदानात करण्यात आली होती. स्पर्धेत जवळपास ३०० सत्तर बैलगाडा स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला. सेमी फायनला पास करणाऱ्या गाडीला रोख रक्कम व सन्मानचिन्ह देण्यात आले. या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते. मैदान पाहण्यासाठी हजारोंच्या संख्येने बैलगाडा शर्यत प्रेमी उपस्थित होते. स्पर्धेत घार्निगीकर व भवरकरांचा राजा व चित्र्या प्रथम तर उर्मिला गायकवाडांचा व वाघोलीकरांचा अर्जुन व चिमण्या द्वितीय मानकरी ठरले. विजेत्या बैलगाडा स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व रोख रक्कम समारंभपूर्वक देण्यात आले.

### वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी; आंबे, चिक्कू, केळी व टरबूजला फटका

**अक्कलकोट दि १९ मे-**

अक्कलकोट शहर व तालुक्याच्या अनेक भागात रविवारी रात्री अवकाळी पावसाने हजेरी लावली. मेघ गर्जना व विजेचा कडकडाट व लखलखाट ढगाचा गडगडाट वादळी वारा होऊन अवकाळी पाऊस झाला. रविवारी रात्रभर सोमवारच्या पहाटे संतत धार पावसाची टिप टिप होती, सखल भागात पाणी थांबले होते. सोमवारी दिवसभर तापमानात मोठी घट झाली. सायंकाळी ४च्या सुमारास पुन्हा ढगांचा गडगडाट होऊन हलक्या सरी झाल्या. तालुक्यात अंबा, केळी, कलगंड, टरबुज, टमाटे आदि फळबागाना या वादळी वारा पाऊस यामुळे फटका बसला.

### विवाहितेच्या छळप्रकरणी पेनूरच्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ मे-**

पैशासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पेनूरच्या तिघांवर एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत महे शादाब मुजावर (वय २२, रा. सुमैय्या नगर, नई जिंदगी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती शादाब जाफरसोा मुजावर, नुरजहां जाफरसोा मुजावर, शहाना जाफरसो मुजावर (रा. पेनूर, ता. मोहोळ) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. १९ मे २०२२ ते ३१ मे २०२४ या कालावधीत महे या पतीसमवेत पेनूर येथे सासरी नांदत होत्या. या कालावधीत पती शाबाद व त्याच्या घरातील लोकांनी महे हिचा शारीरीक व मानसिक छळ करून माहेरून सासरी घर खर्चासाठी पैसे आण म्हणून आर्थिक त्रास दिला. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

## फरार गुन्ह्यातील आरोपीस पुणे येथून अटक

### अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने विजापूर नाका पोलीस ठाण्यातील दाखल गुन्ह्यातील फरार अल्पवयीन बालिका व आरोपी यांना पुणे येथून ताब्यात घेवून शोध घेतला.

विजापूर नाका पोलीस ठाण्यात १३ फेब्रुवारी २०२४ रोजी गुन्हा दाखल असून या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिकेस संशयीत आरोपी नामे बसवराज जटप्पा हेळवे याने कशाचे तरी अमिष दाखवून पळवून नेले असलेबाबत गुन्हा दाखल आहे.

या गुन्ह्यातील अल्पवयीन बालिका व आरोपी यांचा एक वर्षापासून विजापूर नाका पोलीस ठाणे कडील पोलिस अमंलदार शोध घेवूनही ते मिळून आले नव्हते. त्यामुळे हा गुन्हा तपासकामी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. या गुन्हयाचा तपास तांत्रिक माहितीच्या आधारे करून अल्पवयीन बालिका व संशयीत आरोपी बसवराज जटप्पा हेळवे हे बेंगलोर येथे राहत असल्याचे समजल्याने तपास पथक हे बेंगलोर येथे तपासासाठी गेले होते. परंतु, बेंगलोर येथे संशयित आरोपीच्या नातेवाईकाकडे चौकशी केली असता, तो पुणे येथे राहत असल्याचे समजल्याने बेंगलोर ते पुणे असा तपास करत पोलिसांनी पुणे येथील धायरीमधील गणेश नगरअपहृत बालिका व आरोपी बसवराज हेळवे यांना ताब्यात घेतले. हा गुन्हा पुढील तपास कामी विजापूर नाका पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आला असून आरोपीला अटक केली आहे.

ही कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे पोलीस निरिक्षक महादेव पाडुरंग राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार हेमंत मंठाळकर, अलका शहापुरे, हवालदार महादेव बंडगर, अ.सत्तार पटेल, खोगरे, दादा गोरे तसेच सायबर पोलीस ठाणे कडील हवालदार प्रकाश गायकवाड, मच्छिंद्र राठोड यांनी केली.

### ॲड. राजेश कांबळे खून खटला

## घटनास्थळावरील वस्तू जप्तीची साक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे -**

ॲड. राजेश श्रीमंत कांबळे (वय ४५, रा. ४३, ब्रह्मचैतन्य नगर, सोलापूर) याचा खून केल्याप्रकरणी आरोपी संजय उर्फ बंटी महादेव खरटमल, ॲड. सुरेश तारू चव्हाण व श्रीनिवास महांकाळी येलदी यांच्यावरील खटल्याच्या सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश जे.जे. मोहिते यांच्यासमोर सुरू झाला.

या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार नितीन मच्छिंद्र कांबळे याने आपल्या साक्षीत दिनांक २५जून२०१९ रोजी यातील आरोपी सुरेश चव्हाण याने दुसरा पंच भारत गुणापुरे व सहायक आयुक्त सकळे यांच्या समोर स्वतःहून निवेदन दिले की, मयत राजेश कांबळे याचा खून करून त्याच्या वाट्यास आलेले दोन सोन्याच्या चैन काढून देतो चला असे म्हणून निवेदन दिले त्याप्रमाणे त्याने त्याच्या घरात असलेल्या कपाटातून दोन सोन्याच्या चैन काढून दिल्या व त्या चैन वर एन आर डी असा ठसा होता. त्या चैन जप्त करून पोलिसांसमक्ष पंचनामा केला. अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदवली. आरोपींच्या वकिलांनी घेतलेल्या उलट तपासात साक्षीदाराने नकारात्मक उत्तरे दिली.

दुसरा साक्षीदार सागर मदन गागडे यांनी त्याच्या साक्षीत १२ जून २०१९ रोजी त्यास बंटी खरटमल रहात असलेल्या घराजवळ घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी बोलावले होते, त्याप्रमाणे घटनास्थळावर दोन काळे रंगाचे प्लास्टिकचे पोते दिसून आले. त्यामध्ये एका पोत्यात दोन हात, दोन पाय व मुंडके असे होते तर दुसऱ्या पोत्यात हात पाय व मुंडके नसलेले धड होते. त्या ठिकाणाहून लोखंडी हातोडा, कोयता व सत्तुर अशा एकूण २६ चीज वस्तू घटनास्थळावरून जप्त करण्यात आले. त्या ठिकाणी बोटांचे ठसे हे मिळून आले. पंचनाम्याचे चित्रकरण देखील करण्यात आले होते, अशी महत्त्वपूर्ण साक्ष नोंदविली. सदर साक्षीदाराचा उलट तपास हा पूर्ण न झाल्याने उलट तपासासाठी व खटल्याच्या पुढील सुनावणी मंगळवारी होणार आहे. या खटल्यात विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम, मूळ फिर्यादीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी तर आरोपींकडून ॲड. राजेंद्र फताटे, ॲड. नागराज शिंदे, ॲड. जयदीप माने हे काम पाहत आहेत.

## वरिष्ठांनी संधी दिल्यास जिल्हा काँग्रेसला गतवैभव प्राप्त करून देऊ : हत्तुरे

### काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षपदी विजयकुमार हत्तुरे इच्छुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा काँग्रेस पक्ष निरीक्षक मोहन दादा जोशी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता काँग्रेस भवन येथे सोलापूर जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी अथवा प्रदेश कार्यकारणीवर निवड व्हावे या मागणीचे पत्र विजयकुमार हत्तुरे यांनी दिले.



सोलापूर शहर व जिल्हयासह महाराष्ट्र राज्यात गेल्या २० वर्षांपासून सामाजिक, राजकीय क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करीत आहे. काँग्रेस पक्षामध्ये माजी केंद्रीय गृहमंत्री श्री. सुशिलकुमारजी शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली पक्ष वाढीसाठी व बळकटीसाठी कार्यरत आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये अखिल भारतीय लिंगायत समन्वय समितीचे राज्य महासचिव या पदावर केले आहे. महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांमध्ये राज्यव्यापी लिंगायत धर्म व समाजाच्या विविध मागण्या संदर्भात महामोर्चाचे यशस्वी नेतृत्व केले आहे. याशिवाय कर्नाटक, तेलंगना, आंध्रप्रदेश इत्यादी ठिकाणी लिंगायत समजाच्या मागण्यासंदर्भात महामोर्चाचा नेतृत्व केले आहे. याशिवाय, सध्या हत्तुरे हे सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वरिष्ठ उपाध्यक्ष पदावर कार्यरत असून महात्मा बसवेश्वर ब्लड बँके माध्यमातून व्यापक जनसंपर्क आहे. सोलापूर महानगरपालिकेत परिवहन सभापती म्हणून उत्कृष्ट काम बजावले आहे. सोलापूर जिल्हा मध्ये विविध सामाजिक राजकीय उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत. सामाजिक कार्यातील अनुभवाचा व राजकीय कार्याचा अनुभवाचा विचारात घेवून सोलापूर जिल्हा काँग्रेस अध्यक्षपदी निवड व्हावे याकरिता भारतीय काँग्रेस कमिटीचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे,माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे,भारतीय काँग्रेस कमिटीचे महासचिव के. सी. वेणूगोपाळ,मुकुल वासनिक, महाराष्ट्र प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथिला, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवर,प्रदेश उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा निरीक्षक मोहन दादा जोशी,खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडे विजयकुमार हत्तुरे यांनी मागणीचे पत्र दिले आहे.

## कोळी समाज पुंडलिक, महादेव मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी प्रभाकर अधटराव



### उपाध्यक्षपदी अनिल अभंगराव यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ मे-**

येथील समस्त कोळी समाज श्री पुंडलिक व महादेव मंदिर ट्रस्टच्या अध्यक्षपदी प्रभाकर अधटराव व उपाध्यक्षपदी अनिल अभंगराव यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

येथील समस्त कोळी समाजाच्या श्री पुंडलिक व महादेव मंदिर ट्रस्टची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. यानंतर झालेल्या नूतन विश्वस्तांच्या बैठकीत ट्रस्टच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी ट्रस्टच्या दिनदयाळ महादेव मंदिर कार्यालयात झाली. यामध्ये एकमताने ट्रस्टच्या सचिवपदी उमेश प्रकाश संगितराव, खजिनदारपदी सतिश हरिभाऊ नेहतराव यांची बिनविरोध निवड झाली. नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार ट्रस्टचे ज्येष्ठ विश्वस्त दत्तात्रय कांबळे व मारुती संगितराव यांनी केला. यावेळी अध्यक्ष बाबासाहेब अधटराव यांनी सर्व विश्वस्तांचे आभार मानले. बैठकीस विश्वस्त मारुती संगितराव, सुरेश परचंडराव, मुकूंद नेहतराव, हणमंत अभंगराव, महादेव परचंडराव उपस्थित होते. नगरसेवक विक्रम शिरसट, सुनिल ननवरे, मुकूंद अभंगराव, सोनू अधटराव मित्र मंडळ,कोळी बांधव, आमदार प्रशांत परिचारक व माजी नगराध्यक्ष लक्ष्मणभाऊ शिरसट यांनी शुभेच्छा दिल्या.

## नॉर्थकोर्ट मैदानावर शिव-शंभो गर्जना

### संभाजी आरमार संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

छत्रपती संभाजी महाराज जयंती आणि संभाजी आरमार संघटनेच्या १७ व्या वर्धापन दिनानिमित्त नॉर्थकोर्ट मैदान येथे शिव-शंभू गर्जना या फोक मराठी कॉन्सर्टचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रात सध्या छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या स्फूर्ती गीतांनी लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या अभिजित जाधव आणि अम्मू जाधव या भावंडांच्या शिव-शंभो गर्जना या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.






यावेळी माजी उपमहापौर नानासाहेब काळे, माजी परिवहन सभापती राजन जाधव, माजी नगरसेवक गुरूशांत धुत्तरगावकर, उद्योजक मनीष सुरवसे, हिंदू बहुभाषिक पुरोहित संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष वेणुगोपाल जिल्हा, धाराशिवचे माजी नगरसेवक पिराजी मंजुळे, संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे, कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी बोलताना संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी संभाजी आरमारच्या १७ वर्षाच्या वाटचालीचा आढावा घेतला.

संभाजी आरमारने सर्वसामान्य जनतेच्या न्यायाची घेतलेली भूमिका यापुढेही अबाधित राहील, असे सांगत संभाजी आरमारची ताकद वाढणे म्हणजे सर्वसामान्य माणसाची ताकद वाढणार असून सत्तेच्या नाही तर सत्याच्या जोरावर संभाजी आरमार सर्वदूर कार्यरत राहणार असल्याचे सांगितले. नॉर्थकोर्ट मैदानावर याप्रसंगी हजारोंच्या संख्येने माता-भगिनी आणि शिवप्रेमी मावळ्यांची उपस्थिती होती.

अभिजित जाधव आणि अम्मू जाधव यांनी सादर केलेल्या एक से बढकर एक शिवगीतांनी तसेच गोंधळ गीते आणि देशभक्तीपर गीतांनी वातावरण शिवमय झाले होते. यावेळी सादर केलेल्या प्रत्येक गीतावर मावळे बेभान होऊन नाचत होते. अडीच तासांच्या सादरीकरणामध्ये जाधव बंधूनी शिवकाळाची अनुभूती दिली. त्यांच्यासोबतच वाद्यवृंदानी देखील तितकेच बहारदार सादरीकरण केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, सरचिटणीस गजानन जमदाडे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, शहरप्रमुख सागर ढगे, जिल्हा संघटक अमित कदम, उपजिल्हाप्रमुख राजेश पाटील, सागर संगवे, उपशहरप्रमुख रेवण कोळी, राज जगताप, विभागप्रमुख मल्लिकार्जुन पोतदार, सोमनाथ मस्के, प्रदीप मोरे, तेजस चौधरी, नारायण माने आदीनी परिश्रम घेतले.

# इस्त्रायलचे प्रचंड हल्ले, १५२ ठार

## हमासच्या नेत्यासह दहा अतिरेक्यांचा खात्मा • मदत छावण्यांना लक्ष्य करीत हवाई हल्ले

◆ **गाझा, १९ मे**

इस्रायलने रविवारी गाझात जोरदार हवाई हल्ले केले, यात १५२ नागरिकांचा मृत्यू झाला. हवाई हल्ल्यात हमासचा माजी प्रमुख याह्या सिनवारचा भाऊ मोहम्मद सिनवार व त्याचा मुलगा ठार झाल्याची माहिती आहे. दोघांचे मृतदेह खान युनूस येथील एका भुयारात सापडली. मुहम्मद सिनवार याच्यासोबत त्याच्या दहा साथीदारांचे मृतदेह आढळून आले आहेत. हल्ल्याच्या काही तासांत सोमवारी इस्रायलने उपासमारीने त्रस्त गाझावासीयांना अन्न पोहोचविण्याची घोषणाही केली.



गाझाच्या आरोग्य विभागाने जारी केलेल्या निवेदनात रविवारी इस्त्रायलकडून झालेल्या हवाई हल्ल्यात आतापर्यंत १५२ नागरिकांचा मृत्यू झाला. मृतदेहामध्ये हमासचा माजी प्रमुख याह्या सिनवारचा भाऊ मोहम्मद सिनवार व त्याच्या मुलाचा समावेश आहे. याशिवाय हल्ल्यात हमासच्या दहा अतिरेक्यांचा मृत्यू झाला, तर हमासने हल्ल्यामध्ये १६ सदस्यांच्या मृत्यूची पुष्टी केली. गेल्यावर्षी इस्त्रायलने केलेल्या हल्ल्यात हमासचा प्रमुख याह्या सिनवार याचा मृत्यू झाला होता. सिनवार याने पहिल्यांदा इस्त्रायलवर हल्ला केला होता. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या या हल्ल्यानंतर इस्त्रायल व हमासमध्ये युद्ध सुरू झाले होते. इस्रायलच्या लष्कराने केलेल्या जमिनीवरील कारवाईत उत्तर इस्रायलमधील एका इंडोनेशियन रुग्णालयावर ताबा मिळला. त्यातच सोमवारी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गाझाला मदत साहित्य पाठवण्याची घोषणा केली. मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर त्यांनी ही माहिती दिली.

### इंडोनेशियन रुग्णालयाला इस्रायली सैन्याचा वेढा

इस्रायलने लष्करी कारवाईला 'गिदिओन्स रथ' असे नाव दिले आहे आणि त्यांनी रविवारच्या कारवाईला आतापर्यंतचे सर्वात मोठे जमिनीवरील ऑपरेशन असल्याचे वर्णन केले आहे. इस्त्रायली लष्कराने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, या हल्ल्यात १५२ नागरिकांचा मृत्यू झाला. हमासच्या ठिकाणांना लक्ष करीत हल्ले करण्यात आले. यात दहापेक्षा अधिक हमासचे अतिरेकी मारले गेले. गाझामधील इंडोनेशियन रुग्णालयाला इस्रायली सैन्याने वेढा घातला असून रुग्णालयात हमासचे अतिरेकी लपून असल्याचे त्यांनी नमूद केले. रुग्णालयाचे संचालक डॉ. मारवान अल-सुल्तान यांनी सांगितले की, डॉक्टर, रुग्ण आणि कर्मचारी यासह ५५ लोक आत अडकले आहेत.

### १० लाख पॅलेस्टिनी नागरिकांची उपासमार

हमास- इस्त्रायलच्या संघर्षामुळे उपासमारीचे संकट भीषण असून १० लाख नागरिकांना दररोज उपाशी राहावे लागत असल्याची माहिती संयुक्त राष्ट्र संघाच्या मानवाधिकार आयोगाने दिली आहे. उपासमारीची परिस्थिती पाहता, पंतप्रधान नेतान्याहू यांनी लष्कराच्या शिफारशीवरून गाझाला अन्न पुरवठा करण्याची परवानगी दिली आहे. हा निर्णय इस्रायलच्या लष्करी रणनीतीचा एक भाग आहे, जेणेकरून गाझामधील एक मोठी लष्करी कारवाई अधिक वेगाने पुढे नेता येईल.

### अरब लीग शिखर परिषदेत युद्धबंदीवर चर्चा

अरब लीग शिखर परिषदेत जागतिक नेत्यांनी गाझामध्ये युद्धबंदीचे आवाहन केले. परिषदेला उपस्थित असलेले स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी गाझामधील नरसंहार रोखण्यासाठी दबाव वाढवण्याचे आवाहन केले. यावेळी इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फताह अल-सिसी यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना गाझामध्ये युद्धबंदी आणण्यासाठी आवश्यक असलेली सर्व पावले उचलण्याचे आवाहन केले. इराकी पंतप्रधानांनी सांगितले की, त्यांचा देश गाझाच्या पुनर्विकासासाठी अरब निधी स्थापन करण्यास पाठिंबा देतो. (वृत्तसंस्था)



# हेरगिरीच्या आरोपात अटकेतील ज्योतीला वडिलांचा पाठिंबा

◆ **हिसार, १९ मे**

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपात अटकेत असलेली यूट्यूबर ज्योती मल्होत्राच्या बचावासाठी तिचे वडील मैदानात उतरले आहेत. माझी मुलगी रितसर कागदपत्रांच्या आधारे पाकिस्तानात गेली. ती मित्रांना भेटण्यासाठी जाऊ शकत नाही काय? असा प्रश्न तिचे वडील हरीस मल्होत्रा यांनी म्हटले आहे.



पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेला संवेदनशील माहिती दिल्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली. तत्पूर्वी गुरुवारी पोलिसांनी ज्योती मल्होत्राच्या घरून बॅकांचे पासबुक,लॅपटॉप आणि पासपोर्ट्स जप्त केले होते. माझ्या मुलीने पाकिस्तानला जाण्यापूर्वी सर्व आवश्यक परवानग्या घेतल्या होत्या.ज्योती यूट्यूबसाठी व्हिडीओ शूट करण्यासाठी पाकिस्तानसह इतर ठिकाणी जात असे. तिचे काही मित्र असतील, तर ती त्यांना फोन करू शकत नाही का? आमचे मोबाईल आम्हाला परत करावेत,'' असे हरीस म्हणाले.

### गुप्तचर अधिकाऱ्यांशी संपर्क

ज्योतीवर दाखल झालेल्या प्राथमिक चौकशी अहवालातील माहितीनुसार तिने २०२३ मध्ये दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयात व्हिसासाठी अर्ज करतांना पाकिस्तानी नागरिक एहसान-उर-रहीम (उर्फ दानिश)ची भेट घेतली होती. दानिशला भारताने हेरगिरीच्या आरोपांवरून हद्दपार केले होते. ज्योती दोन वेळा पाकिस्तानात गेली असल्याचे सांगितले जात आहे. अली अहवान हिच्याकडे तिचा मुक्काम होता. तिने शाकीर आणि राणा शहबाज या गुप्तचर अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवला होता. ज्यांचे नाव जट्ट आणि आणि रंधावा या नावाने सेव्ह होते. (वृत्तसंस्था)

# गाझामध्ये चिनी कंपन्यांची घुसखोरी

◆ **गाझा, १९ मे**

गाझा आणि पॅलेस्टाईनच्या पश्चिम किनाऱ्यावर ज्यू वसाहतींच्या बांधकामात चीनने घुसखोरी केली असून तेथे ६ हजार चिनी कामगार कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. इतकेच नाही या वसाहतींमध्ये केवळ चिनी कामगारच काम करत नाहीत तर त्यांच्या सरकारी आणि खासगी कंपन्याही सेवा देत आहेत.

२०१६ मध्ये चीन आणि इस्रायलमध्ये झालेल्या करारानुसार, ६ हजार चिनी कामगारांना इस्रायलमध्ये पाठवण्याचा निर्णय घेतला होतानाब्लस, रामल्लाह, बेट एल आणि हेब्रोन सारख्या भागात चिनी कामगार बांधकाम करीत आहेत. चिनी कंपन्यांमध्ये अदामा, तनुवा आणि अहवा या प्रमुख कंपन्या आहे, त्या गाझातील वसाहतींमध्ये सक्रिय आहेत. इस्रायली कंपनी असलेली अहवा चिनी कंपनी पोसून समुहाने विकत घेतली आहे. ही कंपनी इस्रायलमध्ये कृषी रसायने तयार करते. गाझा युद्धात पॅलेस्टिनींना मदत करण्याऐवजी अदामाने इस्रायली शेतकऱ्यांना मदत केली. कंपनीचा कारखाना वेस्ट बँकमधील मिटझ्पे शालेम येथे आहे, त्याला आंतरराष्ट्रीय समुदाय बेकायदेशीर मानतो. अहवा ही एक सौंदर्य उत्पादन कंपनी आहे. तनुवा कंपनी केवळ अन्न उत्पादनांद्वारेच नव्हे तर वाहतुकीद्वारेही या वसाहतींच्या विकासात योगदान देत आहे. (वृत्तसंस्था)

# ३२ देशांत जाणार सर्वपक्षीय शिष्टमंडळ

### परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव उद्यापासून करणार मार्गदर्शन

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगापुढे आणण्यासाठी भारत सरकारकडून ३२ देशांमध्ये पाठविल्या जाणाऱ्या सात सर्वपक्षीय शिष्टमंडळाला मंगळवारपासून परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव विक्रम मिस्री मार्गदर्शन करणार आहे. भारताची भूमिका मांडताना प्रामुख्याने कोणत्या विषयाला प्राधान्य द्यायचे याची माहिती यावेळी दिली जाईल.

संसद भवनात मार्गदर्शनाचा पहिला टप्पा २० मे, तर दुसरा टप्पा २३ मे रोजी होईल. शिष्टमंडळांमध्ये विविध राजकीय पक्षांचे खासदार, माजी मंत्री आणि माजी राजदूत यांचा समावेश आहे. २३ ते २५ मे दरम्यान शिष्टमंडळ परदेश दौरा करणार आहे. शिष्टमंडळांचे नेतृत्व करण्याची जबाबदारी काँग्रेसचे खासदार शशी थरूर, भाजपाचे रविशंकर प्रसाद आणि बैजयंत पांडा, शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे, जनता दल (यू)चे संजयकुमार झा आणि द्रमुक नेत्या कनिमोझी करुणानिधी यांच्या खांद्यावर टाकली आहे. या सात शिष्टमंडळामध्ये चार नेते सत्ताधारी राजदमधील असून तीन इंडिया आघाडीकडून आहेत.

### शिष्टमंडळाचे नेतृत्व करणारे व सहभागी सदस्य



**पहिला समूहः** बैजयंत पांडा

निशिकांत दुबे, कोन्याक, रेखा शर्मा, असदुद्दीन ओवेसी, सतनाम सिंग सिंधू, गुलाम नबी आझाद, हर्ष श्रृंगला हे सदस्य आहेत. हे शिष्टमंडळ सौदी अरेबिया, कुवेत, बहरीन, अल्जेरिया या देशांना भेटी देणार आहेत.

**दुसरा समूहः** रविशंकर प्रसाद

दग्गुबती पुरंदेश्वर, प्रियांका चतुर्वेदी, गुलाम अली खटाना, अमर सिंग, समिक भट्टाचार्य, एमजे अकबर, पंकज सरण हे सदस्य आहेत. हे शिष्टमंडळ युके, फ्रान्स, जर्मनी, ईयू, इटली आणि डेन्मार्क या देशांत जाणार आहे.





**तिसरा समूहः** संजय कुमार झा

अपराजिता सारंगी, युसूफ पठाण, ब्रिजलाल, जॉन ब्रिटास, प्रदान बरुआ, हेमांग जोशी, सलमान खुर्शीद, मोहन कुमार हे सदस्य आहे. हे शिष्टमंडळ इंडोनेशिया, मलेशिया, कोरिया, जपान आणि सिंगापूर या देशांना भेटी देणार आहे.

**चौथा समूहः** श्रीकांत शिंदे

बांसुरी स्वराज, ई.टी. मोहम्मद बशीर, अतुल गर्ग, सस्मित पात्रा, मनन कुमार मिश्रा, एस.ए.एस. अहलुवालिया, सुजन चिनॉय या सदस्यांचा समावेश आहे. हे शिष्टमंडळ युएई, लायबेरिया, काँगो, सिएरा लिओन या देशांना भेट देणार आहे.





**पाचवा समूहः** शशी थरुर

शांभवी, सरफराज अहमद, जीएम हरीश बालयोगी, शशांक मणी त्रिपाठी, भुवनेश्वर कलिता, मिलिंद देवरा, तरनजीत सिंग सिंधू, तेजस्वी सूर्या हे सदस्य असून, हे शिष्टमंडळ अमेरिका, पनामा, गयाना, ब्राझील आणि केलंबिया या देशात जाणार आहे.

**सहावा समूह** : कनिमोझी करुणानिधी

राजीव राय, मियां अल्ताफ अहमद , कॅप्टन ब्रिजेश चौटा, प्रेमचंद गुप्ता, अशोक कुमार मित्तल, मंजीव एस. पुरी, जावेद अश्रफ यांचा समावेश असून, स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटविया आणि रशिया या देशांमध्ये हे शिष्टमंडळ जाणार आहे.





**सातवा समूहः** सुप्रिया सुळे

राजीव प्रताप रुडी, विक्रमजीत सिंह साहनी, मनीष तिवारी, अनुराग सिंह ठाकूर, श्रीकृष्ण देवरायालू, आनंद शर्मा, व्ही. मुरलीधरन, सय्यद अकबरुद्दीन हे सदस्य आहेत. हे शिष्टमंडळ इजिप्त, कतार, इथिओपिया आणि दक्षिण आफ्रिका या देशांना भेट देणार आहे.

# पाकिस्तानला पाठिंबा दिल्याने तुर्कीचे २०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान

## विविध कंपन्यांमधील शेकडो कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात


◆ **अंकारा, १९ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील तणावादरम्यान तुर्कीने पाकिस्तानला पाठिंबा दिला. एवढेच नाही तर पाकिस्तानने ज्या शस्त्रांनी भारतावर हल्ला केला ती तुर्कीयेकडून मिळवली होती. यामध्ये प्रामुख्याने ड्रोन्सचा समावेश होता. या घटनेनंतर भारतात तुर्कीबद्दल संताप दिसून येत आहे आणि 'बहिष्कार तुर्की' मोहीम सुरू झाली आहे. या बहिष्कार अस्त्रामुळे तुर्कीचे २०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले असून शेकडो कामगारांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या आहेत.

भारताच्या एका निर्णयामुळे एका मोठ्या तुर्की कंपनीला २०० दशलक्ष डॉलर्सचे मोठे नुकसान सहन करावे लागले आहे. गुरुवारी, भारताने तुर्की विमान कंपनी सेलेबी एव्हिएशनवर कारवाई केली आणि तिची सुरक्षा मंजुरी तात्काळ रद्द केली. ही कंपनी भारतात ग्राउंड हँडलिंग सेवा देत होती. सरकारच्या या निर्णयानंतर, कंपनीचे मूल्यांकन फक्त दोन दिवसांत एक तृतीयांश कमी झाले. एवढेच नाही तर भारतात कंपनीसोबत काम करणाऱ्या सुमारे ३,८०० कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्याही धोक्यात आल्या आहेत. सेलेबीची विमानतळ चालवण्यासाठीची सुरक्षा मंजुरी रद्द झाल्यानंतर कंपनीला सुमारे २०० दशलक्ष, म्हणजेच तिच्या जागतिक उत्पन्नाच्या एक तृतीयांश नुकसान झाले. (वृत्तसंस्था)

> **सेलेबीची नऊ विमानतळांवर होती सेवा**
>
> २१ नोव्हेंबर २०२२ रोजी सेलेबी एअरपोर्ट सर्व्हिसेस इंडिया प्रायव्हेट लिमिटेडला दिलेला सुरक्षा मंजुरी आता रद्द करण्यात आली आहे. सेलेबी एव्हिएशन देशातील नऊ प्रमुख विमानतळांवर सेवा देत होती, ज्यात दिल्ली, मुंबई आणि चेन्नई सारख्या संवेदनशील आणि मोठ्या विमानतळांचा समावेश होता. कंपनी ग्राउंड हँडलिंग, कार्गो सेवा आणि एअरसाईड ऑपरेशन्ससारख्या उच्च सुरक्षा ऑपरेशन्समध्ये सहभागी होती. ■

# टांझानियात दिसला आठ टनांचा महाकाय हत्ती



◆ **डोडोमा, १९ मे**

अलीकडेच टांझानियाच्या जंगलात एक हत्ती दिसला. त्याचे वजन सुमारे ८ टन असल्याचा अंदाज आहे. या हत्तीची उंची ३.६ मीटर आहे आणि त्याच्या बाह्य दातांचे वजन सुमारे ४५ किलो आहे. या हत्तीला पाहून शास्त्रज्ञही आश्चर्यचकित झाले. संशोधकांचा असा विश्वास आहे की हा आज जिवंत असलेला सर्वात वजनदार आणि उंच हत्ती आहे. टांझानियाच्या जंगलात सापडलेला हा महाकाय हत्ती केवळ त्याच्या प्रजातीतीलच नाही तर सर्व जिवंत स्थलीय प्राण्यांमध्ये सर्वात मोठा प्राणी मानला जातो.

त्याचे वजन ८ टन आणि उंची ३.६ मीटर असल्याने ते सामान्य आफ्रिकन सवाना हत्ती पेक्षा खूप मोठे आहे. साधारणपणे हे हत्ती ५-७ टन वजनाचे असतात आणि ३-३.३ मीटर उंच असतात. या हत्तीच्या बाहेरील दातांचे वजन ४५ किलोग्रॅम आहे. सामान्यतः आफ्रिकन हत्तीच्या दातांचे वजन २०-३० किलोग्रॅम असते. टांझानियाची जंगले आफ्रिकेच्या समृद्ध जैवविविधतेचे प्रतीक आहेत. परंतु शिकार, अधिवासाचा नाश आणि हवामान बदल यासारख्या धोक्यांमुळे या प्राण्यांचे अस्तित्व धोक्यात येत आहे. स्थानिक समुदायांसाठी, हा हत्ती केवळ एक प्राणी नाही तर निसर्गाच्या महानतेचे प्रतीक आहे. (वृत्तसंस्था)

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या शिष्टमंडळात तृणमूलच्या सदस्याचा सहभाग नाही

◆ **कोलकाता, १९ मे**

पाकिस्तानचा दहशतवाद उघड करण्यासाठी आणि ऑपरेशन सिंदूरबद्दलचे सत्य सांगण्यासाठी मोदी सरकार सर्वपक्षीय शिष्टमंडळ परदेश दौऱ्यावर पाठविणार आहे. या शिष्टमंडळात तृणमूल काँग्रेसचा खासदार नसेल. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकारच्या या मोहिमेत सामील होणार नसल्याचे म्हटले आहे.



मोदी सरकारने या यादीत तृणमूल काँग्रेसचे खासदार आणि माजी क्रिकेटपटू युसूफ पठाण यांचे नाव समाविष्ट केले होते. आता पक्षाने पठाण यांना पाठवण्यास नकार दिला आहे.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील पक्ष सरकारच्या नेतृत्वाशी सल्लामसलत न करता स्वतःचे खासदार निवडण्याच्या निर्णयाशी सहमत नव्हता. त्यामुळे पठाण किंवा इतर कोणताही तृणमूल आमदार त्यात सहभागी होणार नाही, असे त्यांनी सांगितले. लोकसभेतील तृणमूल काँग्रेसचे नेते सुदीप बंदोपाध्याय यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे शिष्टमंडळात सामील होण्यास असमर्थता व्यक्त केल्यानंतर सरकारने मुर्शिदाबादच्या खासदाराची शिष्टमंडळात सहभागी होण्यासाठी निवड केली होती. तृणमूलने म्हटले आहे की सरकारने त्यांच्याशी सल्लामसलत केली नाही.प ठाण यांना जद(यू) खासदार संजय झा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात सामील होण्यास सांगण्यात आले होते, जे इंडोनेशिया, मलेशिया, दक्षिण कोरिया आणि सिंगापूरला भेट देणार आहे. (वृत्तसंस्था)

# सलमानचा पुढील चित्रपट 'गलवान व्हॅली संघर्ष'वर

◆ **मुंबई, १९ मे**

सलमान खानचा 'सिकंदर' हा चित्रपट यंदाच्या ईदला प्रदर्शित झाला असला तरी त्याला अपेक्षित यश मिळाले नाही. मात्र, आता सलमान खान पुन्हा एकदा दमदार विषयावर आधारित चित्रपटासह प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशेष म्हणजे, सलमानचा आगामी चित्रपट देशभक्ती आणि शौर्यगाथेने परिपूर्ण असेल.

सलमान खानचा आगामी चित्रपट २०२० मध्ये गलवान व्हॅलीमध्ये भारतीय आणि चिनी सैन्यांदरम्यान झालेल्या संघर्षावर आधारित आहे. चित्रपटात सलमान खान भारतीय लष्करातील शूर अधिकारी कर्नल बिकुमल्ला संतोष बाबू यांची भूमिका साकारणार आहे. कर्नल बाबू हे १६ बिहार रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर होते आणि त्यांनी गलवानमध्ये चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीविरुद्ध लढताना वीरमरण पत्करले होते. (वृत्तसंस्था)

# भारताच्या दबावामुळे बांगलादेश ताळ्यावर

### अंतरिम सरकारचा चर्चेसाठी प्रस्ताव

◆ **ढाका, १९ मे**

भारताने बांगलादेशातून होणाऱ्या कापडासह इतर वस्तूंच्या निर्यातीवर बंदी घातल्याने तेथील अंतरिम सरकारने आता भारतासोबत चर्चा करणार असल्याचे म्हटले आहे. त्यांनी व्यापारी चर्चेसाठी भारताला प्रस्ताव दिल्याची माहिती अंतरिम सरकारचे वाणिज्य सल्लागार शेख बशीरुद्दीन यांनी सांगितले.



बशीरुद्दीन म्हणाले, सरकार भारतासोबतच्या सर्व प्रलंबित व्यापार समस्या चर्चेद्वारे सोडवण्यास वचनबद्ध आहे. भारत सरकारकडून आम्हाला निर्यातबंदीसंदर्भात कोणतीही अधिकृत माहिती दिलेली नाही. अधिकृत माहिती मिळाल्यावरच आम्ही त्यावर योग्य ती कारवाई करू. जर कोणतीही समस्या उद्भवली तर तर दोन्ही बाजू परस्पर संवादाद्वारे सोडवली जाईल. आम्ही भारताच्या वाणिज्य मंत्रालयाकडे चर्चेसाठी प्रस्ताव पाठविला आहे. दरम्यान भारताने नुकतेच बांगलादेशातून येणारे कपडे, फळे आणि फळांच्या चवीचे पेये, कार्बोनेटेड पेये, बेकरी उत्पादने, स्नॅक्स, चिप्स, मिठाई, कापूस आणि कापसाच्या धाग्याचा कचरा, प्लास्टिक आणि पीव्हीसीपासून बनवलेले तयार उत्पादने आणि लाकडी फर्निचरच्या आयातीवर बंदी घातली आहे. याशिवाय भारताने बांगलादेशला तिसऱ्या देशांमध्ये वस्तू निर्यात करण्यासाठी ट्रान्सशिपमेंट सुविधा देखील निलंबित केल्या होत्या.

### चौक्यांवरून ट्रकला परत पाठविले

शेख बशीरुद्दीन म्हणाले, आम्हाला समाज माध्यमांद्वारे कळले, की भारताने विशेषतः अखौरा आणि डावकी सीमा चौक्यांवर बांगलादेशी मालवाहू ट्रकला रोखले आणि भारतात प्रवेश करण्यास बंदी घातली आहे. आपण भौगोलिकदृष्ट्या एकमेकांशी जोडलेले देश आहोत. स्पर्धा, वाहतूक खर्च आणि इतर घटक निश्चित आहेत. □

या कारणास्तव, आम्ही वेळोवेळी आमच्या कृषी उत्पादनांच्या आयातीवर निर्बंध लादतो आणि भारत देखील असेच करतो. ही व्यापार व्यवस्थापनाची प्रक्रिया आहे आणि आम्ही त्यावर काम करत आहोत. भारताने म्हटले की बांगलादेशातून कोणत्याही भू-बंदरावरून तयार कपडे आयात करता येणार नाहीत. (वृत्तसंस्था)

> **बसणार ६६ हजार कोटींचा फटका**
>
> ◆ **नवी दिल्ली, १९ मे**
>
> भारताने बांगलादेशातून आयात होणाऱ्या ४२ टक्के वस्तूंवर बंदी घातली आहे. यामुळे बांगलादेशला अंदाजे ७७० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे ६६ हजार कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्हनुसार, हे दोन्ही देशांच्या आयातीच्या सुमारे ४२ टक्के आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाच्या निर्देशांनंतर जारी केलेल्या या बंदीमुळे भारत आता बांगलादेशातून काही वस्तू कमी प्रमाणात आयात करेल.
>
> भारत सरकारने उचललेल्या या पावलामुळे, आता बांगलादेशातून केवळ तयार कपडे, प्रक्रिया केलेले अन्न आणि प्लॅस्टिकच्या वस्तू काही विशिष्ट बंदरांमधून भारतात येऊ शकतील. काही वस्तूंच्या जमिनीवरून भारतात प्रवेश पूर्णपणे बंदी घालण्यात आला आहे. बांगलादेशातून दरवर्षी आयात होणारे सुमारे ६१८ दशलक्ष डॉलर किमतीचे तयार कपडे आता केवळ कोलकाता आणि नवा शेवा बंदरमधूनच येऊ शकतील. पूर्वी हे कपडे जमिनीच्या मार्गानेही भारतात आणले जात होते. अशा परिस्थितीत, बांगलादेशच्या भारतातील कपड्यांच्या निर्यातीवर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)

# कामाच्या ताणामुळे अभियंत्याची आत्महत्या

◆ **बंगळुरू, १९ मे**

कामाचा प्रचंड ताण आणि व्यवस्थापकच्या हीन वागणुकीमुळे एका अभियंत्याने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

निखिल सोमवंशी हा ओलाची एआय कंपनी कृत्रिममध्ये अभियंता म्हणून कार्यरत होता. निखिलवर कामाचा प्रचंड ताण होता. त्यामुळे त्याची प्रकृतीही ठिक राहत नव्हती. कंपनीतील पानगुंटी नावाचा मॅनेजर सहकाऱ्यांना व्यवस्थित वागणूक देत नाही. त्याच्यामुळे अनेक कर्मचारी कंपनी सोडून गेले आहेत. निखिल हा सुटीवर होता. ८ तारखेला त्याचे मॅनेजरसोबत बोलणे झाले आणि त्याने सुट्टी वाढवून घेतल्याचे कंपनीने म्हटले आहे. ८ तारखेलाच त्याचा मृतदेह आढळून आला. निखिलच्या मृत्यूमुळे कर्मचाऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले असून मॅनेजरविरोधात कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. (वृत्तसंस्था)

## अग्रलेख...

# अज्ञात 'भारतप्रेमीं'ना धन्यवाद!

पहलगाममध्ये पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी निरपराध २६ पर्यटकांचा जीव घेतला. २० जण जखमी झाले. त्यानंतर भारत सरकार आणि भारतीय भूदल, वायुदल आणि नौदलाने वेगवेगळे 'स्ट्राईक' करून पाकिस्तानला चांगलाच धडा शिकवला. पाकी सैन्याद्वारे प्रायोजित पाकिस्तानात राहणाऱ्या अतिरेक्यांच्या अड्ड्यांवर नेमके हल्ले करून त्यांनाही दणके दिले. एका कुख्यात आणि क्रूर अतिरेकी टोळीप्रमुखाच्या कुटुंबातील तर १२ जण भारतीय वायुदलाच्या हवाई हल्ल्यांमध्ये 'ढेर' झाले. पाकिस्तान सरकार आणि लष्कराने कितीही मुजोऱ्या केल्या तरी या चार दिवसांच्या युद्धात भारताचा पूर्ण वरचष्मा होता, हे आता साऱ्या जगानेच मान्य केले आहे.

भारतीय वायुदलाने त्या दोनच दिवसांत नेमके काय करून ठेवले आहे त्याचे पुरावे, छायाचित्रे, व्हिडीओ वगैरे-वगैरे सारेच आता जगासमोर येऊ लागले आहे. पाकिस्तान नेहमी दावा करत असलेल्या आणि धमकावत असलेल्या अणुबॉम्बच्या नेमक्या केंद्राच्या आसपासही नासधूस करण्यात भारतीय वायुदलाने यश मिळवले असल्याच्याही बातम्या आता येत आहेत. दुसरीकडे आपल्या नौदलाने रावळपिंडी जवळच्या पाकिस्तानी नौदल मुख्यालयावर हल्ले केल्याचे आता स्पष्ट झाले आहे. पाकिस्तानातील दोन-चार विमानतळांच्या त्यातही प्रामुख्याने हवाई दलाचा वापर असलेल्या धावपट्ट्यांनाही एअर स्ट्राईकने उद्ध्वस्त केल्याचेही पुरावे आता जगाने मान्य केले आहेत. या गेल्या सुमारे महिनाभरातील घडामोडींच्या काळात भारतातील बहुसंख्य सजग नागरिकांना त्या अज्ञात बंदूकधाऱ्यांची आठवण येत होती. सुमारे तीन वर्षांपासून विशेषतः पाकिस्तानात, तसेच काही 'अज्ञात' कॅनडामध्येही सक्रिय झाले आहेत. या दोन्ही देशांमधील या अज्ञातांचे लक्ष्य 'भारतविरोधी उपद्रवी शक्ती' हे एकच होते. पाकिस्तानमधील अज्ञातांनी पाकप्रणीत मुसलमान अतिरेकी, तर कॅनडामधील अज्ञातांनी खलिस्तानवादी शीख अतिरेक्यांना लक्ष्य केले होते. बाकी पाकी अतिरेक्यांच्या तुलनेत खलिस्तानवादी संख्येत किरकोळ असल्यामुळे तेथील बंदूकधारी अज्ञातांना फारसे काम नव्हते. त्यांचे अस्तित्व प्रामुख्याने फक्त कॅनडामध्येच असल्यामुळे तेथील अज्ञातांनी लवकरच एक, दोघांवरच ब्रेक घेतला. पण पाकिस्तानप्रणीत अतिरेकी संख्येने प्रचंड, अधिक कट्टर, अधिक खुनशी, अधिक विकृत असल्यामुळे या 'भारतप्रेमी' अज्ञात बंदूकधाऱ्यांनी स्वाभाविकच पाकिस्तानची भूमी हे आपले कार्यक्षेत्र ठरविल्याचे दिसत होते. २०२२ पासून सक्रिय असलेल्या या अज्ञातांनी आतापर्यंत १५ पाकप्रणीत अतिरेक्यांचा खात्मा केला आहे. २०२२ मध्ये हे 'अज्ञात' पाकिस्तानात सक्रिय झाले आणि त्यांनी रहिमउल्ला तारिक या अतिरेक्याचा 'गेम' केला. हा रहिमउल्ला 'जैश-ए-मोहम्मद'चा प्रमुख मौलाना मसूद अझहरचा उजवा किंवा डावा हात होता. तो २००१ मधील भारतीय संसदेवरील हल्ला आणि २०१९ च्या पुलवामा हत्याकांडाचा सूत्रधार होता. नोव्हेंबर २०२३ मध्ये भारताला हवा असलेला हा 'मोस्ट वॉण्टेड' कराचीत एका धर्मसभेत जाताना 'या' अज्ञातांच्या गोळ्यांचा शिकार झाला होता. त्यानंतर लष्कर-ए-तोयबा या अतिरेकी संघटनेतील भरती प्रमुख, चिथावणीखोर भाषण देण्यात कुख्यात असलेला अक्रम गाझी याला अशाच अज्ञात बंदूकधाऱ्यांनी पख्तून प्रांतात उडवले होते. याच दरम्यान २०२३ च्या उत्तरार्धात लष्करचाच एक कमांडर ख्वाजा शाहीद २०१८ च्या काश्मीरमधील भारतीय सैन्याच्या शिबिरावर हल्ला करणाऱ्यांचा 'मास्टरमाईंड' होता. त्याचे धडावेगळे केलेले शिर आढळून आले होते. लष्करचाच एक प्रमुख, मौलानाच्या वेशात वावरणारा, मुसलमान युवकांना कट्टरपंथाकडे घेऊन जाणारा, त्यांना जिहादसाठी प्रवृत्त करण्यात जियाउर रहमान तरबेज होता. तो याच काळात दोन अज्ञात मोटारसायकलस्वारांकडून उडवला गेला होता. मसूद अझहरचाच निकटवर्ती 'अहले-ए-सुन्नत वल जमात'चा नेता आणि आंतरराष्ट्रीय खतम-ए-नबुव्वत आंदोलनाचा प्रमुख कारी इजाज आबिद हा खैबर जिल्ह्यात असाच मारला गेला होता. मसूदचाच एक डावा किंवा उजवा हात लष्कर-ए-जब्बारचा संस्थापक दाऊद मलिक याला अशाच अज्ञात बुरखाधारी मारेकऱ्यांनी लक्ष्य करून त्याला संपविले होते. २०१६ मध्ये भारतातील पंपोर येथे सीमा सुरक्षा दलाच्या सैनिकांवर हल्ला करणाऱ्यांचा 'मास्टरमाईंड' अदनान अहमद कराचीमध्ये डिसेंबर २०२३ मध्ये अज्ञात बंदूकधाऱ्याकडून उडवला गेला होता. पाकिस्तानातीलच अतिरेकांना टिपून मारण्याचे हे सत्र सुरूच होते. हिजबुल मुजाहिदीनचा उच्चस्तर कमांडर बशीर महंमद पीर ऊर्फ इम्तियाज आलम हाही असाच अज्ञातांच्या गोळ्यांनी मारला गेला होता. भारतात विशेषतः काश्मीरमध्ये अतिरेकी घुसवण्यात आणि शस्त्रास्त्रे पोहोचवण्यात हा बशीर ऊर्फ इम्तियाज तरबेज होता. १९९९ मधील इंडियन एअरलाईन्सच्या विमानाचे अपहरण करणारा जैश-ए-मोहम्मदचा दहशतवादी मिस्त्री जहूर इब्राहिम याला अशाच अज्ञातांनी उडवून दिले होते. पाकिस्तानी सैन्यदलात मेजर असलेला दनियाल २०१६ मध्ये जम्मू-काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यात भारतीय सैन्याच्या तुकडीवर झालेल्या अतिरेकी हल्ल्याचा 'संयोजक' होता. तोही पुढे कोणत्यातरी अज्ञातांच्या बंदुकीच्या गोळीचा 'टार्गेट' झाला होता. लष्करचा खतरनाक अतिरेकी राजौरी जिल्ह्यातील अतिरेकी हल्ल्याचा सूत्रधार रियाज अहमद हा व्याप्त काश्मीरमधील रावळकोट येथे डोक्यात गोळी घुसून असाच मारला गेला होता.

पुढे नदीम ऊर्फ अबू कताल हा २६/११ च्या मुंबईवरील दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार हाफिज सईदचा नातेवाईक आणि लष्कर-ए-तोयबाचा सक्रिय सदस्य होता. हाही पाकिस्तानाच्या झेलम जिल्ह्यातील दीना येथे 'असाच' मारला गेला होता. तसेच याच 'लष्कर'चा खास माणूस आणि भारतासाठी मोस्ट वॉण्टेड हाफिज सईदचा बहीणजावई मौलाना काशिफ अली याचाही असाच 'गेम' झाला होता. या सर्वांसारखाच एक, मानव आणि शस्त्र यांचा तस्कर, धार्मिक बुरख्याआड अतिरेकी उद्योग करणारा मुफ्ती शाह मीर हाही असाच अज्ञातांकडून उडविला गेला होता. या सर्व पाकी मुस्लिम अतिरेक्यांसोबतच पाकिस्तानातच राहणारा खलिस्तान कमांडो फोर्स प्रमुख परमजित सिंह पंजाब ऊर्फ मलिक सरदार सिंह हा मोस्ट वॉण्टेड लाहोरमधील त्याच्या घराजवळच उडवला गेला होता.

हे अज्ञात भारतप्रेमी शांत झाले आहेत असे वाटत असतानाच रविवारी सिंध प्रांतात लष्कर-ए-तोयबाचा टॉप कमांडर सैफुल्ला खालिदला 'अशाच' कोण्यातरी अज्ञाताने 'असेच' उडवून दिले आहे. या सैफुल्लाला 'लष्कर'च्या उच्चपदस्थांनी जिहादींच्या दृष्टीने सन्माननीय अशी 'गाझी' ही पदवी दिली होती. २००१ मध्ये उत्तर प्रदेशातील रामपूरच्या सीमा सुरक्षा दलाच्या शिबिरावर हल्ला, २००५ मध्ये बंगळुरूच्या भारतीय विज्ञान संस्थेत बॉम्बस्फोट आणि २००६ मधील नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर एके-५६ रायफली आणि शक्तिशाली बॉम्बसह हल्ला यांचासुद्धा सूत्रधार हाच गाझी सैफुल्ला खालिद मानला जातो. १ जून २००६ च्या नागपूर संघ मुख्यालयातील हल्ल्यात थेट सहभाग असलेले अफजल अहमद बट, अबू अल कलाम अलाद आणि उस्मान हबीब हे तीनही दहशतवादी हा हल्ला प्रयत्न करण्याचा प्रयत्न करत असतानाच भारतीय सुरक्षा दलांनी टिपून मारले होते. हे साऱ्या भारतवासींच्या उत्सुकतेचा, आकर्षणाचा, प्रेमाचा, आदराचा आणि सन्मानाचा विषय झालेले हे 'अज्ञात भारतप्रेमी' नेमके आहेत कोण, त्यांचा नेमका 'याच' लोकांवर राग तो कोणता आणि का, ते करतात काय, ते येतात कुठून, 'काम' केल्यानंतर जातात कुठे, नंतर किंवा आधीही राहतात कुठे, त्यांना बंदुका देते कोण, हे काम सोपविते कोण, ते हे काम पार पाडतात कसे, त्यांच्या पाठीशी आहे कोण, असे अनेक प्रश्न भारतभरातील नागरिकांना पडलेले आहेत. हे सारे कळलेच पाहिजे असा त्यांचा आग्रहही नाही. ते त्यांना धन्यवाद देत आहेत हे मात्र खरे. गेल्या दोन-तीन वर्षांपासून भारतासाठी 'मोस्ट वॉण्टेड' असलेल्या दोन-चार नव्हे, तर चक्क १५-१६ कट्टर अतिरेक्यांना त्यांच्या पाकिस्तानरूपी बिळात शिरून टपकवणाऱ्या भारताच्या हितचिंतक अज्ञातांपैकी एकही जण अद्याप पाकिस्तानी सरकार किंवा सैन्याच्या हाती लागलेला नाही हे विशेष..!

## आंतरराष्ट्रीय

# व्यापारविश्वातले महत्त्वाचे पाऊल

**प्रा. जयसिंग यादव**

अलिकडेच अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सुरू केलेल्या 'टॅरिफ वॉर' नंतर जगात अनेक तरंग उमटले. जगातील बहुतांश राष्ट्रे अमेरिकेवर नाराज झाली. युरोपीय संघही त्यात होता. ज्या चीनशी अमेरिकेने 'टॅरिफ वॉर' सुरू केले, त्याच्याशीच सर्वांत अगोदर करार केला. त्यामुळे अमेरिकेवर विश्वास न ठेवता आता जगातील बहुतांश देशांनी अमेरिकेबरोबरच्या व्यवहाराला पर्याय शोधणे सुरू केले आहे. पर्याय लगेच उपलब्ध होणार नाही; परंतु हळूहळू मार्ग निघेल आणि त्यातही करार करणाऱ्या देशांनी डॉलर या विनिमय दरालाही पर्याय शोधल्यास अमेरिकेची मक्तेदारी मोडीत काढता येईल. वस्तूंच्या बदल्यात वस्तू किंवा दोन देशांतील चलनात विनिमयाचे सूत्र ठेवले, तर ते अधिक सोयीस्कर होईल असा विचार जगातील अनेक देश आता करू लागले आहेत. ब्रिटन आणि भारतातील मुक्त व्यापार कराराचे पाऊल हे त्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यात मोठा व्यापार आहे; परंतु हा व्यापार आणखी खुला व्हावा, बंधमुक्त व्हावा यासाठी गेल्या तीन वर्षांपासून प्रयत्न सुरू होते. चार पंतप्रधानपदाच्या काळात हा प्रश्न सुटू शकला नव्हता. सध्याही ब्रिटनला काही सवलती दिल्या जातात. काही बाबतीत मात्र अजून तितके खुले धोरण नाही. ब्रिटनमधून स्कॉच व्हिस्की आणि जिनची आयात सुरुवातीला ७५ टक्के आणि दहाव्या वर्षापर्यंत ४० टक्के शुल्कानिशी केली जाईल, असे आता ठरत आहे. सध्या हा दर १५० टक्के आहे. एकूण व्हिस्की बाजारपेठेत स्कॉच व्हिस्कीचा वाटा फक्त २.५ टक्के आहे. ही दर कपात दीर्घ कालावधीसाठी आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ताज्या कराराकडे या आणि अशा विविध मुद्यांच्या परिप्रेक्ष्यातून पाहावे लागेल.

आयातीतील वाढीचा देशांतर्गत बाजारपेठेवर कोणताही लक्षणीय परिणाम होणार नाही. दोन्ही बाजूंच्या कोट्याअंतर्गत ब्रिटन २००० कोटी रुपयांच्या वाहनांवरील शुल्क शंभर टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल. त्यामुळे 'टाटा-जेएलआर'सारख्या कंपन्यांना फायदा होईल. या शुल्ककपातीमुळे भारतातील जॅग्वार लँण्ड रोव्हर (जेएलआर), रोल्स-रॉईस, ऑस्टन मार्टिन आणि बेंटलेसारख्या वाहनांच्या किमती कमी होऊ शकतात. कोट्याबाहेरील इलेक्ट्रिक वाहनांसाठी शुल्कात कोणतीही कपात नाही. इलेक्ट्रिक वाहनांशी संबंधित दखलपात्र मुद्यांची काळजी घेण्यात आली आहे. याव्यतिरिक्त, आयसीई



(अंतर्गत ज्वलन इंजिन) वाहनांवरील कोट्याबाहेरील शुल्क दीर्घकालीन काळात हळूहळू कमी केले जाईल. त्यामुळे भारतीय उद्योगांना ब्रिटनमधून होणाऱ्या आयातीतील वाढ सोसण्यास मदत होईल.

ब्रिटनने आपल्या हद्दीत नैसर्गिक व्यक्तींच्या तात्पुरत्या प्रवेशासाठी संख्यात्मक निर्बंध किंवा आर्थिक गरज चाचणी आवश्यकता न लादण्यावरही सहमती दर्शवली आहे. भारतीय वाणिज्य मंत्रालयाच्या मते, ब्रिटनमध्ये तात्पुरते राहणारे भारतीय कामगार आणि त्यांच्या मालकांना तीन वर्षांसाठी ब्रिटनमध्ये सामाजिक सुरक्षा योगदान देण्यापासून सूट आहे. या करारामुळे सुमारे वीस टक्के पगार बचत होईल आणि केवळ आयटी क्षेत्रातील साठ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे भारतीय कंपन्या आणि कर्मचाऱ्यांना चार हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त फायदा होईल. भारताने सरकारी खरेदी क्षेत्र ब्रिटिश कंपन्यांसाठी खुले केले आहे. बाजारपेठेतील प्रवेश केवळ संवेदनशील नसलेल्या केंद्रीय स्तरावरील संस्थांपुरता मर्यादित असेल. उप-केंद्रीय पातळीवरील संस्थांना प्रवेश वगळण्यात आला आहे. आता कराराचे कायद्यात रूपांतर करण्यासाठी सुमारे तीन महिने लागतील. त्यानंतर करारावर स्वाक्षरी केली जाईल. त्यानंतर भारतातील केंद्रीय मंत्रिमंडळ आणि ब्रिटन संसदेकडून मान्यता घेतली जाईल.

२०३० पर्यंत वस्तू आणि सेवांमधील द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ६० अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून १२० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे जानेवारी २०२२ मध्ये सुरू झालेल्या चर्चेचे उद्दिष्ट आहे. या व्यापार करारामुळे ब्रिटनमध्ये भारतीय वस्तू आणि सेवांच्या विस्तृत श्रेणीसाठी सुधारित बाजारपेठ उपलब्ध होईल. त्याचप्रमाणे ब्रिटिश कंपन्यांनाही भारतीय बाजारपेठेत तुलनात्मक फायदे मिळतील. भारताच्या निर्यात हितसंबंधांच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रांमधील वस्तूंसाठी व्यापक बाजारपेठ प्रवेश सुनिश्चित करण्यासाठी एफटीए केले जातात. सुमारे ९९ टक्के टॅरिफ लाईन्सवरील आयात शुल्क रद्द केल्याने भारताला फायदा होईल; जे व्यापार मूल्याच्या सुमारे शंभर टक्के आहे. भारताला सर्व औद्योगिक वस्तूंसाठी 'शून्य शुल्क' बाजारपेठ उपलब्ध आहे. यामध्ये चामडे, पादत्राणे, कापड आणि पोशाख, रत्ने आणि दागिने, बेस मेटल, फर्निचर, क्रीडा वस्तू, वाहतूक, ऑटो घटक, रसायने, लाकूड, कागद, यांत्रिक/विद्युत यंत्रसामग्री, खनिजे यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे.

दुग्धजन्य पदार्थ, सफरचंद, चीज, ओट्स, प्राणी आणि वनस्पती तेले यासारखी संवेदनशील कृषी उत्पादने वगळण्याच्या यादीत आहेत. याचा अर्थ भारताकडून या वस्तूंवर ब्रिटनला कोणतेही शुल्क लाभ दिले जात नाहीत. प्लॅस्टिक, हिरे, चांदी, बेस स्टेशन, स्मार्टफोन, टेलिव्हिजन कॅमेरा ट्यूब, ऑप्टिकल फायबर, ऑप्टिकल फायबर बंडल आणि केबल्स यासारख्या संवेदनशील औद्योगिक वस्तूंचाही यादीत समावेश आहे. काही क्षेत्रांना अधिक सुरक्षित बनवण्यासाठी भारताने दीर्घ कालावधीसाठी हळूहळू शुल्क कमी करण्यास किंवा काढून टाकण्यास सहमती दर्शवली आहे. या वस्तूंमध्ये मातीकाम, पेट्रोलियम उत्पादने, कार्बन, लाल फॉस्फरस, क्लोरोसल्फ्युरिक आम्ल, सल्फ्युरिक आम्ल, बोरिक आम्ल, प्लॅटिनमची मौल्यवान धातूशास्त्र, विमान इंजिने आणि अभियांत्रिकी उपकरणे समाविष्ट आहेत. आयातीतील वाढीचा देशांतर्गत बाजारपेठेवर कोणताही लक्षणीय परिणाम होणार नाही. दोन्ही बाजूंमधील कोट्यांतर्गत ब्रिटन ऑटोमोबाईल्सवरील शुल्क शंभर टक्क्यांवरून दहा टक्क्यांपर्यंत कमी केले जाईल.

गेल्या तीन वर्षांपासून भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार कराराची चर्चा सुरू होती. एकीकडे भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धसदृश परिस्थिती असताना भारत आणि ब्रिटनमध्ये मुक्त व्यापार करार झाला. या कराराची प्रत्यक्ष अंमलबजावणी आणखी काही महिन्यांनी होणार असली तरी भारत आणि ब्रिटनमध्ये व्यापाराचे नवे दरवाजे खुले झाले आहेत. त्याचा फायदा दोन्ही देशांना होणार आहे. या करारामध्ये बहुतेक वस्तू आणि सेवांवरील शुल्क रद्द करण्याची तरतूद आहे. यामुळे भारताच्या वस्त्रोद्योगाला मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफ घोषणांमुळे जागतिक अर्थव्यवस्थेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. त्यामुळे आर्थिक विश्लेषक हा करार अत्यंत महत्त्वाचा मानत आहेत. ट्रम्प यांच्या टॅरिफनंतर भारत आणि अमेरिकेत पहिला करार होऊन त्यातील वादावर तोडगा निघेल असे मानले जात होते; परंतु ज्या दोन देशांमध्ये 'टॅरिफ वॉर' रंगले, त्यांनीच एकत्र येऊन व्यापार करार केला. या पृष्ठभूमीवर भारत आणि ब्रिटनमध्येही मुक्त व्यापार करार झाला. या कराराकडे ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांची एक मोठी कामगिरी म्हणून पाहिले जात आहे. तथापि, त्याचा पाया २०२२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी घातला. असे म्हटले जात आहे की या करारामुळे भारतात ब्रिटनची निर्यात वाढेल आणि येथे रोजगाराच्या संधी निर्माण होतील.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बळीराजाला पुन्हा अवकाळीचा तडाखा

पाऊस आपल्याला हवाहवासा वाटतो. परंतु भर उन्हाळ्यात एप्रिल, मे महिन्यात अवेळी बरसला की, लग्नसमारंभ, शेती, फळबाग, भाजीपाल्याचे नुकसान करून जातो. उन्हाळ्यात प्रचंड उकाड्याने नागरिक हैराण असताना भर दुपारी आकाशात ढग दाटून येतात. विजांच्या प्रचंड कडकडाटासह सुसाट वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यामुळे रस्त्यावर उन्मळून पडणारी झाडे, विस्कळीत होणारी वाहतूक, बाजारात बसणारे फेरीवाले सैरभैर होऊन पळताना दिसतात. सर्वत्र पाणीच पाणी आणि शेती पिकांचे नुकसान करून जातो. मागील काही वर्षांपासून नेहमीप्रमाणे जून, जुलै महिन्यात पडणारा नैसर्गिक ऋतूनुसार येणारा पाऊस आता भर उन्हाळ्यात पडत असल्याने शेतकरी बागायतदार, व्यापाऱ्यांच्या शेती मालावर विपरीत परिणाम होत आहे. मानवनिर्मित वाढते प्रदूषण, प्लॅस्टिकचा वापर, वृक्षांची कटाई, वाढते शहरीकरण यामुळे वातावरणात होणाऱ्या बदलाने अवकाळी अतिवृष्टीसारख्या परिणामांना सामोरे जावे लागत आहे. मे महिन्याच्या प्रारंभापासून राज्यभरात अवकाळी पावसाचा कहर सुरूच आहे. येत्या आठ दिवसांत पुन्हा विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यांत पावसाचा इशारा देण्यात आला आहे. एप्रिल महिन्यात मोठ्या प्रमाणात अनेक भागांत पाऊस झाला. आता मे महिन्यात सुरुवातीपासूनच अवकाळीचा तडाखा बसला आहे. भारतीय हवामान खात्याने पुढील पाच दिवस पावसाचा इशारा दिला आहे. अमरावती, वाशीम आणि बुलढाण्यात ढगांच्या गडगडाटासह विजांसोबत पावसाचा अंदाज आहे. राज्यात यंदा सरासरीच्या ९५ टक्के पाऊस असणार आहे. यामुळे हा पाऊस सामान्य असणार असल्याचा अंदाज आहे. राज्यात जून, जुलै या दोन महिन्यांत कमी पाऊस तर ऑगस्ट महिन्यात साधारण पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. १० जूनपर्यंत राज्यात मान्सून दाखल होणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. विदर्भात यंदा १०० टक्के पावसाची शक्यता व्यक्त केली आहे. हा पाऊस म्हणजे वाळवाच्या पावसाला सुरुवात झाल्याचे म्हटले जात आहे. वाळवाचा पाऊस मान्सून दाखल होण्यापूर्वी आलेला असतो. यामुळे मान्सूनसाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे. आता भारतीय हवामान विभागाने मान्सून संदर्भात चांगली बातमी दिली आहे. मान्सूनने आगेकूच सुरू केली आहे. राज्यात मान्सून लवकरच दाखल होणार आहे.

हवामान विभागाने विदर्भ, मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पुन्हा अवकाळी पावसाची शक्यता आहे. अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली या चार जिल्ह्यांना पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. हवामान खात्याचा अंदाजानुसार, या पावसाचा नियमित पडणाऱ्या मान्सूनवर परिणाम होणार नाही. राज्यात ठिकठिकाणी गारपीट, वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस कोसळत आहे. सध्या महाराष्ट्रात चक्राकार वाऱ्याची निर्मिती झाली आहे. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. राज्यातील विविध भागांमध्ये अवकाळी पावसाचा तडाखा बसला आहे. नाशिक जिल्ह्यातील ३० गावांमधील दीड हजार हेक्टरचे नुकसान झाले आहे. निफाड तालुक्यातील पंधरा गावांना मान्सूनपूर्व पावसाने तडाखा दिला आहे. त्यामुळे कांदा, मका, भाजीपाल्याच्या शेतीशिवारात पाणी साचल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकणातील १४ जिल्ह्यांत ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. बुलढाणा, भंडारा जिल्ह्यात वीज कोसळून दोन शेतमजुरांचा मृत्यू झाला. त्यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात हळद काढणी व प्रक्रियेचे काम सुरू आहे. त्यात अडथळा आल्याने शेतकरी चिंतेत आहे. विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झाले.

विदर्भातील जिल्ह्यांमध्ये गारपीट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यात सर्वाधिक पीक विमा काढणारे शेतकरी विदर्भातील पश्चिम आणि मराठवाडा भागात आहे. अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पावसामुळे शेतपिके, फळबागांचे नुकसान होऊन उत्पन्न सरासरीपेक्षा कमी होत आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी धोरणात्मक पावले उचलणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, पीक विम्याचे पैसे वेळेवर मिळण्याची हमी दिली आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी व राज्य आपत्ती निवारण निधीतून शासनाने शेतकऱ्यांना तातडीची मदत दिल्यास येत्या खरीप हंगामात पीक पेरणी, बियाणे, खते, शेत मशागतीसाठी फार मोठा आधार होईल आणि अवकाळीच्या दुष्टचक्रातून सावरण्यास मदत होईल.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# नवोन्मेषासह स्थायी प्रगतीचा महामार्ग

उद्योग-व्यवसाय व व्यवस्थापन पद्धतीमध्ये 'बदल' ही एक स्थायी व निरंतर चालणारी प्रक्रिया. उद्योग व व्यवसायांच्या गरजांनुरूप हे बदल आणि बदलांच्या प्रक्रियेकडे पाहिले जाते. औपचारिक व्यवसाय व व्यवस्थापन शाखेच्या ऐतिहासिक स्थित्यंतराचा कानोसा घेता, गेल्या अडीचशे वर्षांच्या कालावधीत उद्योग व्यवस्थापन प्रक्रियेमध्ये विविध टप्प्यांमध्ये व कालानुरूप उपयुक्त स्वरूपाचे चार बदल क्रांतिकारक स्वरूपात घडून आले आहेत. सद्यस्थितीत जागतिक स्तरावर 'इंडस्ट्री ५.०' या महत्त्वपूर्ण व क्रांतिकारी स्वरूपातील बदलांच्या टप्प्याची चर्चा सुरू असून, त्याच्या अंमलबजावणीकडे औद्योगिक क्षेत्र गांभीर्याने पाहात आहे, त्याचाच हा मागोवा.

तत्पूर्वी आधीच्या औद्योगिक बदलांच्या महत्त्वपूर्ण टप्प्यांचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे घेता येईल.

**इंडस्ट्री १.०** : ऐतिहासिकदृष्ट्या स्पष्ट होते की, वर नमूद केल्याप्रमाणे उद्योग व व्यवसायासाठी उपयुक्त अशा 'इंडस्ट्री १.०' या विशेष व्यवस्थापन बदल पद्धतीची औपचारिक सुरुवात १६८० साली झाली. त्यावेळी विशेषतः उद्योगांमधील नव्यानेच येऊ पाहणाऱ्या मशीन वापराला पाणी, ऊर्जा वा वाफ यांच्या प्रयोगातून उद्योगांचे उत्पादन प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला होता.

**इंडस्ट्री २.०** : उद्योग-व्यवसाय क्षेत्रातील दुसरा महत्त्वपूर्ण टप्पा 'इंडस्ट्री २.०' स्वरूपात १८६० साली सुरू झाला. या टप्प्यामध्ये उत्पादन क्षेत्रासह उद्योग-व्यवसायात विजेच्या उत्पादन आणि उपयोगाला अधिकाधिक प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्याला चांगला प्रतिसादसुद्धा मिळाला.

**इंडस्ट्री ३.०** : त्यानंतर उद्योगक्षेत्रातील तिसरा महत्त्वाचा व क्रांतिकारी टप्पा सुरू होण्यासाठी सुमारे १०० वर्षांचा कालावधी लागला. परिणामी, १९६० साली उद्योगांमध्ये व व्यवसायाला पूरक मोठा प्रयत्न म्हणून संगणकाच्या माहिती आणि उपयोगाची सांगड घालण्यात आली. परिणामी, उद्योग प्रक्रियेला उत्पादक परिणामकारकतेची जोड मिळाली. भविष्याच्या संदर्भात हे प्रयत्न आणि संगणक प्रयोग अनेक कार्यांनी क्रांतिकारक ठरले.



**इंडस्ट्री ४.०** : याच बदलांच्या पुढील प्रगतीतून २०११ साली 'इंडस्ट्री ४.०'चा टप्पा औद्योगिक क्षेत्राने गाठला. या प्रगत टप्प्यामध्ये वाढते संगणकीकरण, उत्पादन प्रक्रियेमध्ये अद्ययावतपणा, मानवी प्रयत्नांना वाढती तंत्रज्ञानाची साथ, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक व परिणामकारक उपयोग, कृत्रिम बुद्धिमत्तेचा परिचय, अभ्यास व वापर, उद्योजकतेचा उत्पादकतेची साथ, माहिती व तंत्रज्ञानाचा उपयोग आणि अवलंब इत्यादींवर भर देण्यात आला होता. उद्योगांमध्ये वरीलप्रमाणे प्रदीर्घ कालावधीत झालेल्या यशस्वी क्रांतिकारी बदलांचा अनुभव, उपयोग व अंमलबजावणीच्या पृष्ठभूमीवर 'इंडस्ट्री ५.०' या नव्या व दूरगामी स्वरूपातील परिणामकारक पद्धतीच्या अद्ययावत उपयोगांकडे पाहणे, उद्योग-व्यवसाय या उभयतांसाठी फायदेशीर ठरणारे आहे.

औपचारिक स्वरूपात २०२० साली सुरू झालेल्या 'इंडस्ट्री ५.०'च्या नव्या व सुधारित प्रक्रियेमध्ये प्रामुख्याने पुढील मुद्यांवर भर देण्यात आला.

१) उद्योग-व्यवसाय प्रक्रियेमध्ये तंत्रज्ञानावर आधारित व अद्ययावत प्रक्रियेचा अधिक कल्पकपणे वापर करणे. २) नव्या व बदलत्या स्वरूपातील आर्थिक, सामाजिक बदलांचा स्वीकार करणे. ३) उद्योग व व्यवसाय विकासातून सामाजिक विकासाला अधिक गतिमान करणे. ४) नव्या संशोधनाला चालना देण्यासाठी मानव संसाधनाला प्रगत ज्ञान व कौशल्यासह आवश्यक गुंतवणूक करून पद्धतशीर कार्यपद्धती विकसित करून त्याची अंमलबजावणी करणे.

वरील मुद्यांवरून प्रामुख्याने स्पष्ट होणारी बाब म्हणजे, उद्योग-व्यवसायांतर्गत एक कार्यपद्धती म्हणून विकसनशीलतेला सामाजिक विकासाची जोड देणे. यातूनच व्यवस्थापनांतर्गत व व्यवसायाद्वारे विकासावर भर दिला जाणार आहे. त्यादृष्टीनेच उद्योगाचा विकास व आर्थिक प्रगतीला पर्यावरण संरक्षण, आर्थिक फायद्याला समाजकार्याची जोड देऊन त्याद्वारे अधिक जबाबदार व तत्त्वांवर आधारित कार्यप्रणाली स्वीकारून व्यावसायिक यश संपादित करण्यावर भर दिला जाणार आहे.

तसे पाहता, व्यवसायातून विकास वा उद्योगातून सामाजिक जबाबदारी हे मुद्दे गेल्या काही वर्षांपासून व्यवस्थापन पद्धतीचा भाग म्हणून चर्चिले जात आहेत. यामध्ये व्यवसायाचाच एक आवश्यक व महत्त्वाचा भाग म्हणून पर्यावरण विषयक, सामाजिक व व्यावसायिक शुचिता असे सार्थ नामाभिधान दिले आहे. यामागचा मुख्य व व्यापक उद्देश म्हणून उद्योग-व्यवसायाशी संबंधित घटकांचे हितरक्षण व त्यालाच पूरक अशा सामाजिक जबाबदारी तत्त्वाचा सम्यक अवलंबच करणे, हा आहे.

पर्यावरण सामाजिक व व्यावसायिक शुचिता या संदर्भातील वरील उद्दिष्टांची सांगड संयुक्त राष्ट्रांच्या १९३ सदस्यांनी मंजुरी दिलेल्या १७ विकास उद्दिष्टांना जोड म्हणून दिली गेली. यातून या जिव्हाळ्याच्या मुद्यांना जागतिक स्तरावर महत्त्व व मान्यता मिळाली. यातूनच '२०३० सालापर्यंत स्थायी विकासाच्या माध्यमातून जागतिक परिवर्तन' ही संकल्पना व्यावहारिक अंमलबजावणीसाठी संयुक्त राष्ट्राच्या सदस्यांनी त्यांच्या देशांमधील व्यापार-व्यवसायांसाठी मान्य करण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया घडली. या विकास विषयक उद्देश आणि प्रयत्नांना 'इंडस्ट्री ५.०'मुळे उद्योग-व्यवसाय क्षेत्रात गतिमान करण्यात आले, हे आता स्पट होत आहे. विविध उद्योग क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या उत्पादन प्रक्रियेनुसार आपल्या व्यापार-व्यवसायवाढीच्या दरम्यान सामाजिक व सार्वत्रिक विकासाकडे आवर्जून लक्ष देत आहेत. या क्षेत्रातील प्रमुख घटक व भागीदार असणाऱ्या 'टेट्रा-पॅक' कंपनीने यामध्ये स्वतःच्या पुढाकाराने गुंतवणूक केली असून, 'इंडस्ट्री ५.०' या संकल्पनेच्या सक्रिय अंमलबजावणीसाठी पुढाकार घेतला आहे.

आता तर उद्योग-व्यवसायात औद्योगिक प्रगतीची सामाजिक उन्नतीशी जोड घालण्यासाठी 'इंडस्ट्री ५.०' या संकल्पनेला विभिन्न औद्योगिक, व्यावसायिक, सामाजिक व व्यावसायिकांच्या प्रयत्नांना शासकीय व प्रशासनिक स्तरावर पुढाकार घेण्यात येत असून, त्याचे सकारात्मक स्वरूपातील दृश्य परिणाम दिसून येतील, असे आशादायी चित्र निर्माण झाले आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### उन्हाळ्यात ठिकठिकाणी पाणपोई असावी

सध्या उन्हाचा कडाका चांगलाच वाढतोय. उन्हाळ्यात छत्री, रुमाल, गॉगल याबरोबर एक अत्यावश्यक घटक म्हणजे पाणी. घरातून बाहेर निघण्यापूर्वी सोबत पाण्याची बाटली असणे अत्यावश्यक आहे. पण बरेचदा बाटलीतले पाणी संपून जाते. आणि मग मात्र आपल्याला विकतचे बाटलीतले पाणी घ्यावे लागते. हल्ली सगळीकडे रेडिमेड बाटलीचे पाणी विकत मिळते. पण उन्हाळा म्हटलं की पाण्याची गरज जास्त असते. त्यामुळे पाणी विकत घेण्याचे प्रमाणही जास्त असते. पूर्वी उन्हाळ्यात जागोजागी 'पाणपोई' लागत असे. मोठमोठ्या रांजणात भरलेलं थंडगार पाणी घशाची व पोटाची काहिली कमी करायचे. तहान भागवायचे. बरेचसे धनिक धर्माचे काम म्हणून पाणपोई ठेवत असत.

पाणपोईमध्ये तुम्हाला रांजणातले थंडगार पाणी मोफत प्यायला मिळत असे. हल्ली 'पानपोई' हा प्रकार शहरात दिसत नाही. सामाजिक कार्यकर्त्यांनी, धनिकांनी अनेक सामाजिक कार्यांबरोबर शहरात जागोजागी विशेषता बाजार, गर्दीचे ठिकाण, कामाचे ठिकाण या ठिकाणी पाणपोई अवश्य ठेवावी व तहानलेल्यांची तहान भागवावी. कारण पाणी पाजणे हे धर्माचे काम आहे. निदान उन्हाळ्याच्या कडाक्यात तरी पाणी पिण्यास मोफत मिळावे.

**हेमांगी देशपांडे**/७३५०८२३७४२

● ● ● ●

### आज जागतिक मधमाशी दिन

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हेनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहिले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते.

मधमाशा इतर कीटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

● ● ● ●

### नरकातला मर्कट

मर्कट मद्य प्याला तर काय काय करू शकतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे नरकातसुद्धा स्वर्ग कसा दिसतो हे जगापुढे प्रदर्शित करणारा असू शकेल असे वाटते. या प्रदर्शनीय पुस्तकाचा वापर कदाचित रद्दी किंवा भेळवाल्याला नक्कीच होईल यात शंका नाही. ज्याला स्वर्गाची वाटसुद्धा चित्रगुप्त दाखविणार नाही ती व्यक्ती नरकातल्या किड्यांमध्ये वास्तव्य करून स्वर्गाची स्वप्ने पाहतो हा विनोदच म्हणावा लागेल; एवढेच नाही तर ते स्वप्निक चित्र बघण्यासाठी सवंगडी अदबीने जमा झाले हे त्यापेक्षाही अचंबितच ठरले. आपल्याला कोणत्या कारणासाठी १०० दिवस नरकात ठेवले होते त्याचे समीकरण मांडता आले असते तर कदाचित स्वर्ग लांबून चित्रस्वरूपात तरी बघता आला असता. त्या त्या कर्तृत्वानुरूप ज्या शिक्षा नरकात दिल्या जातात त्याचे एकदा तरी गरुडपुराणातून वाचन केले असते तर जन्माचे सोने झाले असते.

त्या यातना भोगतांना स्वर्ग हा शब्दच उच्चारला गेला नसता, असो. मद्य ग्रहण केले की, कुठला नरक आणि कुठला स्वर्ग? भ्रष्टाचार हेच आहे माझे मर्म म्हणूनच भोगावे लागते कर्म; वेळ बाकी आहे, आता तरी करा सत्कर्म!

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

## महत्वाचे...



### जिल्ह्यातील आठ जणांना पर्यावरण पुरस्कार; सृष्टी व पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशनतर्फे आयोजन

**सोलापूर, दि. १९ मे-**

पर्यावरण क्षेत्रात कामगिरी केल्याबद्दल सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील आठ जणांना पर्यावरण पुरस्काराने गौरविण्यात आले. पोलीस मुख्यालयाच्या संवाद सभागृहात हा कार्यक्रम झाला. सृष्टी इको व्हिजन फाउंडेशन आणि पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशन (पुणे) तर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी.वाय. मुजावर, एचडीएफसी बँकेचे क्लस्टर हेड विनायक कुलकर्णी, सांगलीचे क्लस्टर हेड अंकुश आमले, ब्रांच ऑपरेशन मॅनेजर रुपेश दुधनी, उद्योजक माऊली झांबरे, मल्लिकार्जुन खेड यांना पर्यावरण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर उद्योजक अजित कोठारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक गुरु भांगे, वैभव स्वामी, सृष्टी इको व्हिजन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण तळे उपस्थित होते. याप्रसंगी इ वेस्टपासून तयार केलेले चार संगणक डॉ. हेडगेवार रक्तपेढी, जयोस्तुते फाउंडेशन आणि वाइल्ड लाईफ कॉन्झर्व्हेशन असोसिएशन यांना प्रदान करण्यात आले. याप्रसंगी रंगनाथ जोशी, सुनील हरहरे, शैलेश स्वामी, अजित चव्हाण, संतोष धाकपाडे, मदनमोहन बुरगुल, संजय पोळ, डॉ.किशोर वाघमारे, कुणाल माढेकर, कांबळे, मदन पवार उपस्थित होते. या कार्यक्रमास पूर्णम इकोव्हिजन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेश मनेरीकर यांचे सहकार्य लाभले. सृष्टी इको व्हिजन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण तळे यांनी प्रास्ताविक केले. राहुल बिराजदार यांनी सूत्रसंचालन तर शैलेश स्वामी यांनी आभार मानले.

**ई-वेस्ट देण्याचे आवाहन**

सृष्टी इकोव्हिजन फाउंडेशनतर्फे ई वेस्ट पासून समाजातील गरजूंसाठी उपयुक्त इलेक्ट्रॉनिक वस्तू बनवण्यात येणार आहेत. त्याकरिता सोलापूरकरांनी वापरत नसलेले संगणक, टीव्ही, ए.सी. अशा ई वेस्ट इलेक्ट्रॉनिक वस्तू द्याव्यात आणि अधिक माहितीसाठी प्रवीण तळे यांच्याशी ९९२३८९९६८९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### परिवहन विभागाकडील ऑन लाईन बदल्यांमध्ये अधिक सुसूत्रता आणा : परिवहन मंत्र्यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.१९ मे-**

मोटार परिवहन विभागाच्या ऑन लाईन बदल्यामुळे पारदर्शकते बरोबरच जास्तीत जास्त अधिकारी - कर्मचाऱ्यांनी मागणी केलेला पसंतीक्रम मिळत असल्याने बहुतेक अधिकाऱ्यांचे समाधान होते. त्यामुळे भविष्यात परिवहन विभागाच्या ऑनलाईन बदल्यांमध्ये अधिक सुसूत्रता आणावी, तसेच महिला अधिकारी वर्गाच्या अडचणी प्राधान्याने विचारात घ्याव्यात असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी दिले. मंत्रालयातील त्यांच्या दालनात परिवहन विभागाकडील १५९ मोटार वाहन निरीक्षकांच्या ऑनलाईन बदल्या करण्यात आल्या. याबाबत आयोजीत बैठकीला परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर आदी उपस्थित होते. यावेळी गतवर्षी राबविलेल्या ऑन लाईन बदल्या पद्धतीचा देखील आढावा घेऊन मंत्री सरनाईक म्हणाले, ऑनलाइन बदल्या करतांना अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या विशेषतः महिलांच्या समस्या जाऊन घेऊन त्या दूर करण्यास प्राधान्य द्यावे. भविष्यात अधिकाऱ्यांना ३ ऐवजी ५ पसंती क्रम दिल्यास जास्तीतजास्त अधिकाऱ्यांना पसंतीचे ठिकाण मिळण्यास मदत होईल. पुढील वर्षापासून ऑन लाईन बदली प्रक्रिया अधिक चांगल्या पद्धतीने राबवावी.

# महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे ७५ लाखांच्या निधीतून सुशोभीकरण

## बसवकल्याणच्या धर्तीवर महात्मा बसवेश्वरांच्या अश्वारुढ पुतळ्यासह परिसराचा विकास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ मे-**

कर्नाटकातील बसवकल्याण येथील प्रवेशद्वाराच्या धर्तीवर सोलापुरातील कोंतम चौकातील श्री महात्मा बसवेश्वर पुतळा परिसराचा विकास करण्यात येत आहे. सध्या या परिसराच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. या पुतळ्याचे काम पूर्ण झाल्यानंतर शहराच्या सौंदर्यात भर पडणार आहे. बसवप्रेमींच्या सततच्या पाठपुराव्यामुळे शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे काम पूर्णत्वास जात आहे. प्रस्तावित आराखड्यानुसार आज सकाळी क्रेनच्या सहाय्याने महात्मा बसवेश्वर महाराजांचा अश्वारूढ पूर्णाकृती पुतळा काढण्याचे कामकाज सुरू होते. रविवारी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास याचे कामकाज सुरू झाले होते. मात्र पुतळ्याला कोणताही इजा होऊ नये, या अनुषंगाने पुतळा हलवण्याचे काम सुरू असलेले दिसून आले.

गेल्या २० वर्षांपासून या पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले नव्हते. दरम्यान, वर्षभरापूर्वी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ३५ लाख आणि मुख्यमंत्री विशेष निधीतून ४० लाख रुपये, असा एकूण ७५ लाखांचा निधी मिळाला असून त्यातून बसवेश्वर महाराज पुतळा परिसराचे सुशोभीकरण करण्यात येत आहे. या पुतळा सुशोभीकरण करण्यासाठी समाज बांधवांसोबत विचारविनिमय करण्यात आला. त्यानंतर कर्नाटकातील बसवकल्याण येथील प्रवेशद्वाराच्या धर्तीवर हा परिसर विकसित झाला पाहिजे, अशी मागणी समोर आली. त्यानुसार या परिसराचे काम सुरू करण्यात आले आहे.



**सोलापूर : महात्मा बसवेश्वर पुतळा परिसराचे सुशोभिकरणाचे काम हाती घेण्यात आले असून क्रेनच्या सहाय्यने महात्मा बसवेश्वर महाराजांचा पुतळा हलवताना टिपलेले छायाचित्र.**

### बसवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण

सोलापूर शहरातील कौतम चौक येथे १९८५ रोजी जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण श्री काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी तत्कालीन केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर सुशीलकुमार शिंदे आणि तत्कालीन महापौर बंडपन्ना मुनाळे यांच्या उपस्थितीत झाले होते. त्यानंतर २०२५ रोजी पुतळा परिसर सुशोभीकरण विकास काम होणार आहे. तब्बल ४० वर्षानंतर सदरचे विकास काम होणार असल्याने बसवभक्तांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### महात्मा बसवेश्वर पूर्णाकृती पुतळा परिसर विकासकामाचे श्रेय फक्त उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाच जाते

जगतज्योती, महात्मा बसवेश्वर महाराजांच्या अश्वारूढ पूर्णाकृती पुतळ्या सभोवताल परिसराचे सुशोभिकरणाचे विकासकाम सुरू झालेले आहे. तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यामार्फत देण्यात आलेल्या निधीच्या माध्यमातून सदरचे विकासकाम सुरू झालेले आहे. या विकासकामाचे श्रेय फक्त एकनाथ शिंदे यांनाच जाते. या सुशोभीकरण व विकासकामासाठी एकनाथ शिंदे यांनी सुमारे ७५ लाखांचा निधी सुपूर्द केला असून, त्यातील ४० लाखांच्या निधीतून विकास काम सुरू झालेले आहे. उर्वरित ३५ लाखाच्या निधीमधून संरक्षक भिंत तसेच इतर कामे केली जाणार आहेत. एकनाथ शिंदे स्वतः या कामाच्या उद्घाटनासाठी येतील, असा विश्वास त्यांनी आम्हा कार्यकर्त्यांना दिला आहे त्यामुळे तर कोणीही या विकासकामाचे श्रेय लाटू नये.

**-मनीष काळजे, शिंदे शिवसेना जिल्हाप्रमुख**

### मुख्यमंत्री विशेष निधीतून पुतळा परिसराचा विकास

महात्मा बसवेश्वर सर्कल येथील महात्मा बसवेश्वर महाराजांच्या पुतळ्याचे काम हाती घेण्यात आले आहे. अनेक वर्षांपासून निधीअभावी हे काम रखडले होते. त्यासाठी जिल्हा नियोजन समिती आणि मुख्यमंत्री विशेष निधीतून निधी उपलब्ध करून दिला आहे. बसवकल्याणच्या धर्तीवर हे काम सुरू आहे. आतापर्यंत १८ लाख रुपयांचे काम झाले आहे. तर उर्वरित काम जयंती उत्सवानंतर हाती घेण्यात येणार आहे.

**- विजयकुमार देशमुख, आमदार**

### पुतळा परिसरात होणार ही विकासकामे

बसवकल्याणप्रमाणे कमान, कमानीतून पुतळा स्पष्ट दिसण्यासाठी चबुतरा दोन फूट कमी करणार, सुरक्षा भिंत कमी करणार, पुतळा मजबुतीकारण, संपूर्ण परिसरात हिरवळ होणार, उत्सवानिमित्त कार्यक्रम घेण्यासाठी सोय, महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे संकल्पचित्र.

# अग्निशामक दलाच्या गाड्यांची संख्या वाढवा

### शहर भाजपाच्या वतीने महापालिका उपायुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

एमआयडीसी येथील टॉवेल कारखान्यास लागलेल्या आगीच्या पार्श्वभूमीवर महापालिका अग्निशामक दलाच्या गाड्यांची संख्या वाढवावी यासह इतर मागण्यांचे निवेदन शहर भाजपाच्या वतीने नूतन शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या नेतृत्वाखाली महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांना देण्यात आले.

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथे टॉवेल कारखान्यास आग लागून भीषण दुर्घटना झालेली असून यामध्ये मोठी वित्त व जीवित हानी झालेली आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिका प्रशासनाने आवश्यक ती दक्षता घेणे आवश्यक आहे. सोलापूर महापालिकेचा अग्निशामक दल सक्षम आणि सुसज्ज करणे तसेच या विभागात गाड्यांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. आग विझवताना या घटनेत काही कर्मचारी जखमी झाले आहेत. यामुळे या विभागातील कर्मचाऱ्यांना आग विरोधी किट उपलब्ध करावे. एमआयडीसीत फायर ब्रिगेड विभागाच्या गाड्यांची संख्या वाढवणे.

महानगरपालिकेच्या वतीने प्रत्येक कारखान्यात आपत्कालीन संकट आल्यास कोणत्या उपाययोजना कराव्यात तसेच आवश्यक साधनांचे ऑडिट करावे.मनपाच्या वतीने रेस्क्यू व्हॅन यांची व्यवस्था करावी. एमआयडीसी मध्ये अंतर्गत रस्ते व्यवस्थित करावेत. आवश्यक सोयी सुविधांसाठी पालक मंत्र्यांकडे निधीची मागणी करावी आदी मागण्यांचा या निवेदनात समावेश आहे.

यावेळी माजी नगरसेवक पांडुरंग दिड्डी, प्रा. नारायण बनसोडे, राजकुमार हंचाटे, विशाल गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



# विमानसेवा सुरू न झाल्याने हजारो कोटींचे नुकसान

### गुंतवणूकदार फिरवतात पाठ

### सोलापूर विकास मंचने व्यक्त केली नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर विमानतळाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन होऊनही नऊ महिने लोटले तरी आजपर्यंत नियोजित विमानसेवा सुरू झालेली नाही, यामुळे सोलापूरकरांमध्ये तीव्र नाराजी आहे. सोलापूर विकास मंचाने थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ट्विटरवर टॅग करून या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

विमानसेवा नियमित न झाल्यामुळे मोठ्या मल्टिनॅशनल कंपन्या व उद्योजक सोलापूरकडे पाठ फिरवत आहेत. गुंतवणुकीचा ओघ थांबल्यामुळे शहराचा औद्योगिक विकास ठप्प झाला असून, रोजगाराच्या संधीही मर्यादित झाल्या आहेत. दररोज होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा आकडा कोट्यवधींमध्ये गेला आहे. सोलापूर विमानतळाची नागरी कामे पूर्ण असून उड्डाण च्या तपासणीसाठी देखील प्रयत्न झाले, मात्र अद्याप एकही नियमित प्रवासी उड्डाण सुरू झालेली नाही. लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष आणि प्रशासकीय उदासीनता यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. सोलापूर विकास मंचाचे सदस्य विजय कुंदन जाधव यांनी सांगितले की, सोलापूरच्या प्रगतीला आकाशपंख हवे आहेत. आम्ही फक्त उड्डाणाची वाट पाहतोय...! सरकारने या विषयाकडे तातडीने लक्ष देऊन सोलापूरकरांचा विश्वास जपावा, अशी मागणी सोलापूर विकास मंचाने केली आहे.


**विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय**
**साखर संकुल, न.ता.वाडी, शिवाजीनगर, पुणे-४११००५.**
फोन नं. ०२०-२५५३७६१८ email-dir_pna@rediffmail.com
जा.क्र. विसनि/अपिल/जासुनो/२१अ अर्ज क्र.०४/२४/२३५/२५ दिनांक-१४/०५/२०२५

**जाहीर नोटिस**

**मे. के. के. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स**
**रजिस्ट्रेशन भागीदार संस्था तर्फे भागीदार**
**श्री. सुरेंद्र शशिकांत कर्णीक**
**रा. जुनी मील कंपौंड, मुरारजी पेठ, सोलापूर. --- अर्जदार**
**विरुध्द**
१. उपनिबंधक, सहकारी संस्था, सोलापूर शहर, सोलापूर
२. नियोजित वॉटर फ्रंट फेज १, अपार्टमेंट, फ्लॅट ओनर्स, सहकारी गृहरचना संस्था मर्या, तर्फे मुख्य प्रवर्तक जनार्धन माने पत्ता- विजापूर रोड, सोलापूर
३. सुनिल मंत्री रिअल्टी लि. कंपनी पत्ता-जी.ए. १ कोर्ट चेंबर्स, ३५ न्यु मशीन लाईन्स, मुंबई
४. मे. के. के. असोसिएटस तर्फे अ) श्रीमती वनिता नागेश करजगी ब) सौ. लक्ष्मीबाई कुमार करजगी क) श्री. यशराज नागेश करजगी तर्फे पा.क. श्रीमती वतीन नागरेश करजगी, सर्व रा. सोना शंकर निवास, बार्शी रोड, बाळे, सोलापूर
उमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या नं. १४, पत्ता-जुनी मील कंपौंड, मुरारजी पेठ, सोलापूर
५. उमा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या ६. सोलापूर
श्री. कुमार शंकर करजगी पत्ता-जुनी मील कंपौंड, मुरारजी पेठ, सोलापूर
**--- जाबदेणार**

**विषय - महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१ (अ) अन्वये अर्ज क्र.०४/२०२४**

२/- अर्जदार मे. के. के. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार श्री. सुरेंद्र शशिकांत कर्णीक, रा. जुनी मील कंपौंड, मुरारजी पेठ, सोलापूर यांनी नियोजित वॉटर फ्रंट फेज १, अपार्टमेंट फ्लॅट ओनर्स, सहकारी गृहरचना संस्था मर्या., विजापूर रोड, सोलापूर या संस्थेची विनोंदणी करणेबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २१(अ) अन्वये चा अर्ज या कार्यालयात दाखल केलेला आहेत.

त्याअनुषंगाने आपणास जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, सदर कलम २१ (अ) अन्वये अर्जाची सुनावणी दिनांक १८.०६.२०२५ दुपारी ०३.०० वाजता या कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे. सदर प्रकरणासंदर्भात आपणास काही म्हणणे मांडावयाचे असल्यास, आपण सुनावणीस उपस्थित राहुन म्हणणे सादर करावे, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(योगीराज सुवे)**
**विभागीय सहनिबंधक,**
**सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे**



Classifieds

**पाहिजेत**
**हॉस्पिटलसाठी सिस्टर, लेडी रिसेप्शनीस्ट व आया पाहिजे. सारडा हॉस्पिटल, सम्राट चौक, सोलापूर**
**फोन : 9503062999**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**



**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत विभाग**
**ई-टेंडर सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट **www.ireps.gov.in** वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करीत आहेत. **निविदा क्रमांक :** SUR/TD/T/2024/07R4 **कामाचे नाव :** लातूर टर्मिनसच्या विकास, वॉशिंग कम पिट लाइन आणि स्टेबलिंग लाइनच्या बांधकामाशी संबंधित विद्युत TRD काम. (पुनर्निमंत्रण). **अंदाजे किंमत :** 56,61,906.01/- **इमारत सुरक्षा :** 1,13,200/- **पूर्णता कालावधी:** 12 महिने. **ऑफरची वैधता :** 60 दिवस **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ :** 16/06/2025 दुपारी 3.00 वाजता.

**Sr. DEE (TRD), सोलापूर** 46

असुरक्षित तथा अनाधिकृत रूप से रेल लाइन के पास कार्य करना दंडनीय अपराध है



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस सोलापूर जिल्हयातील व विशेषतः मीजे अक्कलकोट (ग्रामीण) ता. अक्कलकोट जि.सोलापूर तसेच सोलापूर जिल्हयातील लोकांना या खरेदीपूर्व जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि तालुका अक्कलकोट मीजे अक्कलकोट (ग्रामीण) ता.अवकलकोट येथील बिनशेती गट नं.६७३/५ मधील प्लॉट नं. २० यांसी एकूण क्षेत्र १.१६.२५ आर.चौ.मी इतकी असुन सदरची संपूर्ण जागा हि खुली आहे. त्यांसी चतुःसिमा पुर्वेस प्लॉट नं.२१, पश्मिचेस प्लॉट नं.१९, दक्षिणेस प्लॉट नं.३३ व उत्तरेसः ६ मीटर रस्ता ही प्लॉट जागा व आतील दगड माती तंदगभूत वस्तूसह व वहिवाटीचे इजमेंटचे सर्व हक्कासहची प्लॉट जागा हि वासंती सुभाष नकाते यांचे स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची होती व आहे. सदर मिळकत हि त्यांनी आमचे अशील राजकुमार गुरुनाथ आसबे यांना कायमखुष खरेदीने देण्याचे ठरवुन रितसर इसारा रक्कम स्विकरलेली आहे. सदरहू मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास त्यांनी आमच्या अशीलांना दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीवर इतर कोणाचाही अग्रहक्क, मालकी, साठेखत, लिज, जप्ती, टाच, गहाण, कर्ज, दान, खरेदीखत, बक्षीस, पोटगी, बोजा, कब्जा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास हि खरेदीपूर्व जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रे पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत आमच्या अशिलावर अथवा वर नमुद प्लॉट जागेवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून हि खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली असे. ता.१९/०५/२०२५

**सही/-**
**ॲड.ए.डी. नाईकवाडी**
**नोटरी भारत सरकार**
**रा. १८८६/४ विणकर वसाहत, मैंदर्गी ता. अक्कलकोट**
**मो.नं. ९८८१५२२९०७**
**अशिल राजकुमार गुरुनाथ आसबे**



**जाहीर नोटीस**

जिल्हा सोलापूर पोट जिल्हा तालुका बार्शी पैकी शहर बार्शी येथील न.पा. हद्दीतील कश्यपी प्लॉट मधील जागा मिळकत गट नं. १३०३ प्लॉट नं. ३ क्षेत्र ०.०२.३८ चौ. मी. ही मिळकत दिपाली राजेंद्र कोटेचा यांचे नावे महसूल दप्तरी दाखल आहे. सदर मिळकत ही दिपाली व तिचे पती व मुले यांचे एकत्र कुटूंबाची मिळकत असून त्यामध्ये बांधकाम आहे. आमचे अशिल चंद्रकांत अनंतराव बिरादार यांचेशी दिपाली राजेंद्र कोटेचा यांचे पती राजेंद्र भिकाचंद कोटेचा यांनी कृषीमाल वेळोवेळी घेऊन त्यापोटी कांही रक्कम दिली असून त्यांचेकडून बाकी रक्कम रु. १५,२६,२९१/- येणेबाकी आहे. तसेच सदर रक्कमेवर बोलीप्रमाणे उदगीर पेठेनुसार नुकसानी दाखल दरमहा दरशेकडा २% प्रमाणे व्याज येणे बाकी आहे. सदर रक्कम वसूलीसाठी आमचे अशिलाने बार्शी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे स्पेशल मुकदमा नं. १३६/२०२५ चा दावा दाखल केलेला आहे व सदर दाव्यातील लिज पेंडन्सी दुय्यम निबंधक बार्शी यांचेकडे नोंदलेली आहे. सदर राजेंद्र कोटेचा, दिपाली कोटेचा व त्यांची मुले सिध्दार्थ व सार्थक हे लोक त्यांचे कुटूंबास झालेल्या देणी देण्यासाठी वर नमूद मिळकत विक्री / तबदिली करणेच्या प्रयत्नात आहेत.

सबब सदर नोटीसीने तमाम लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिलाची वर नमूद येणे रक्कम दिलेशिवाय कोणीही, सदर मिळकतीचे खरेदीखत, बक्षिसपत्र, दानपत्र, भाडेकरार, तबदिली इ. प्रकारे कसल्याही स्वरुपाचे दस्त, व्यवहार संबंधीत राजेंद्र कोटेचा, दिपाली कोटेचा व त्यांची मुले सिध्दार्थ व सार्थक यांचेशी करु नयेत, अन्यथा आमचे अशिलाचे सदर रक्कम देणेस सदर मिळकत जबाबदार असलेमुळे व्यवहार करणारे इसम आमचे अशिलाची रक्कम देणेस जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी, ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १९/०५/२०२५

**सही/-**
**चंद्रकांत अनंतराव बिरादोर तर्फे**
**ॲड. रमेश एम. बुगडे, वाणी प्लॉट, बार्शी**
**मो.नं. ९८२३२८६५०३**



**IIFL HOME LOAN**
आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड
आयआयएफएल हाऊस, सन इन्फोटेक पार्क,
रस्ता क्र. 16व्ही, प्लॉट क्र. बी-23, एमआयडीसी
ठाणे औद्योगिक क्षेत्र, वागळे इस्टेट,
ठाणे - 400604
CIN No.: U65993MH2006PLC166475

या नोटिशीद्वारे सर्वसाधारण जनतेला आणि आयआयएफएल होम फायनान्स लि.च्या ग्राहकांना याद्वारे सूचित करण्यात येते की 1 ला मजला, धनश्री पार्क, पोलिस स्थानकाजवळ, संत दामाजी नगर, मंगळवेढा, जिल्हा- सोलापूर, महाराष्ट्र- 413305 येथील आयआयएफएल गृह कर्ज शाखा **20 ऑगस्ट 2025** पासून बंद करण्यात येईल.

सर्व ग्राहकांना आणि सर्वसाधारण जनतेला विनंती आहे की त्यांनी वरील माहितीची नोंद घ्यावी आणि तुमच्या जवळील इतर आयआयएफएल होम लोन शाखा शोधण्यासाठी iiflhomeloans.com/locate-us ला भेट द्यावी.



**SJSB सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
मल्टी-स्टेट शेड्युल्ड कोऑप. बँक
''गगनभरारी'', शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर 413 007 फोन क्र.: 0217-274 1101 ते 05
ई-मेल : info@sjsbbank.com. वेबसाईट : www.sjsbbank.com

**जाहीर प्रत्यक्ष ताबा नोटीस**
**नियम 8(1)(2)**
(दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस अॅन्ड इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट अॅन्ड रुल 2002 अन्वये)

तमाम लोकांस, कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना सदर जाहीर ताबा नोटीसीने कळविण्यात येते की, ज्या अर्थी सोलापूर जनता सहकारी बँक लि. मुख्य कार्यालय, सोलापूर या संस्थेचे अधिकारी यांना उक्त अध्यादेशाच्या कलम 13(12) अन्वये प्राप्त झालेल्या प्राधिकृत अधिकारी या अधिकारानुसार मी उपरोक्त कायद्याचे कलम 13(2) अन्वये खालील नमूद कर्जदार, जामीनदार व गहाणकार -

| शाखा, कर्जदार व जामीनदार | 13(2) नोटीस व येणेबाकी | प्रत्यक्ष ताबा दिनांक |
|---|---|---|
| **शाखा - मार्केट यार्ड सोलापूर**<br>**कर्जदार- कलबुर्गी ट्रेडर्स,**<br>**प्रोप्रा.म.जावेद गफुरसाब कलबुर्गी,**<br>**सी-13, सिद्धेश्वर मार्केट यार्ड, हैद्राबाद रोड, सोलापूर**<br>**जामीनदार - 1) श्री.इब्राहीम हैदरसाब मैंदर्गीकर**<br>**2) श्री.विजयकुमार सिद्धण्णा उंबरजे** | 13(2)-दि.15/02/2023 रु.67,54,642=91 + दि.01/02/2023 पासूनचे व्याज व इतर खर्च प्रतिकात्मक ताबा - दि.14/02/2024 | मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर, यांचेकडील केस नं.CRI.M..No.929/2024 दि.21/12/2024 च्या आदेशान्वये कोर्ट कमिशनर ॲड.मिठ्ठा अमरनाथ बाळकृष्णा यांनी दि.17/05/2025 रोजी खालील नमूद स्थावर मालमत्ता प्रत्यक्ष ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. |
| **तारण स्थावर मालमत्ता तपशील - म.जावेद गफुरसाब कलबुर्गी** यांच्या मालकीची शहर सोलापूर ता.उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील टी.पी.नं.2, फा.प्लॉट नं.97, सिद्धेश्वर कृषी उत्पन्न बाजार समिती, अग्रो इंडस्ट्रीज प्लॉट नं.सी.31, हैद्राबाद रोड, रविवार पेठ. सोलापूर एकूण क्षेत्रफळ 948 चौ.मी. यावर 2400 चौ.मी. दुकान बांधले आहे अशी मिळकत व त्यावरील इतर बांधकामासह यांसी चतुःसीमा पुढीलप्रमाणे- **पूर्वेस** - जनावर दवाखाना, **पश्चिमेस** - प्लॉट नं.29, **दक्षिणेस** - रस्ता, **उत्तरेस** - प्लॉट नं.32 | | |

यांना मागणी नोटीस पाठवून संपूर्ण रक्कम नोटीस मिळाल्या पासून 60 (साठ) दिवसाच्या आत भरणा करण्याचे कळविले होते. परंतु नोटीसीनंतर आलेला भरणा वजा जाता उपरोक्त कर्जदार / गहाणकार व जामीनदार यांनी उर्वरित रक्कम आमच्याकडे भरण्यास कसूर केलेली होती. त्या अर्थी सदर कर्जदार, गहाणकार व जामीनदार यांना कळविण्यात येते की, मा.मुख्य न्यायदंडाधिकारी सोलापूर यांचे आदेशान्वये कोर्ट कमिशनर ॲड.मिठ्ठा अमरनाथ बाळकृष्णा यांनी वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या स्थावर मिळकतीचा दि.17/05/2025 रोजी दि सेक्युरिटायझेशन रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस इन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 चे कलम 14 अन्वये प्रत्यक्ष **ताबा घेऊन बँकेकडे हस्तांतर केलेला आहे. सदर तारण स्थावर मालमत्ता बँकेच्या प्रत्यक्ष ताब्यात आहे.**

सबब उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार आणि तमाम लोकांना कळविण्यात येते की, वरील परिशिष्ठात नमूद केलेल्या मिळकती बाबत कोणीही कोणाशीही कोणत्याही प्रकारे हस्तांतर, विल्हेवाट, गहाण, विक्री, बोजा, तारण वाटणी, वहिवाट, बक्षिस अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हस्तांतर करार करू नये. या उपरही तसा व्यवहार अथवा करार केल्यास तो बेकायदेशीर आहे, असे ठरवून आमच्या बँकेवर अथवा सदर मिळकतीवर सदर व्यवहार अथवा करार कायद्याने बंधनकारक राहणार नाही. याची नोंद उपरोक्त कर्जदार / गहाणकार / जामीनदार व तमाम लोकांनी घ्यावी.

**दिनांक : २०/०५/२०२५**
**स्थळ : सोलापूर**
कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
**(मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप. बँक)**



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः मौजे हजंगी व तालुका अक्कलकोट येथील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : डी।। व सब डी।। मौजे हजंगी ग्रामपंचायत तालुकाः अक्कलकोट, जि. सोलापूर येथील गट नं. ३५२/२/अ यांचे एकूण क्षेत्र० हेक्टर ८३ आर यांसी आकार ० रु ७८ पैसे. सदर शेतजमिनीत असलेल्या विहिरीचा व बोअरच्या संपूर्ण मालकी हक्क व हिस्स्याची शेतजमीन विक्री देण्याचे ठरलेले आहे. यांसी चतुःसिमा पुढील प्रमाणेः पूर्वस गट नं. ३५२/३, पश्चिमेस जहागीर महिबूब नदाफ वगैरे यांची शेतजमीन, दक्षिणेस जेऊर शिव, उत्तरेस सोनार यांची शेतजमीन. येणेप्रमाणे शेतजमीन आतील सर्व तदंगभुत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कासह.

सदर शेतजमीन ही जंहागीर महिबूब नदाफ यांच्या मालकी व कब्जे वहिवाटीची असून त्यांनी आमचे अशिल यांना सदर शेतजमीन ही कायमस्वरूपी खुश खरेदीने विक्री करण्याचे ठरवून इसारा दाखल रक्कम स्वीकारून, इसारा पावतीचा दस्त आमचे अशिलाच्या हक्कात लिहून दिलेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी आमच्या अशिलास त्यांनी दिलेली आहे. सबब, वर नमूद शेतजमीन संबधी कोणाचाही, कसल्याही प्रकारचा बोजा, टाच, तारण, गहान, दान, लिन, लिज, वहिवाट, पोटगी, भाडेपट्टा, साठेखत, खरेदीखत, कोर्ट केसेस, इजमेंट राईट, बँकेचा बोजा, हितसंबंध, जप्ती व इतर कोणतेही हक्क अगर हितसंबंध वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचे गृहीत धरून खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारच्या हरकतीचा, तक्रारीचा विचार केला जाणार नाही व ते आमचे अशिल यांच्या व शेतीवर बंधनकारक राहणार नाहीत. याची संबधितांनी नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली तारीखः १९/०५/२०२५.

**सही/-**
**ॲडव्होकेटस**
**ॲड. प्रशांत चंद्रकांत उबाळे,**
**ॲड. गजानन सिद्धप्पा कलशेट्टी**
**मो.नं. ७८७५२७५६५६,८०५५७०५६१६.**
**पत्ता : ६४, मित्रनगर, शेळगी सोलापूर - ४१३००६.**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### डच लेडीज गोल्फमध्ये दीक्षा नवव्या स्थानावर



**हल्वरसम** : नेदरलॅण्डमध्ये आयोजित डच लेडिज गोल्फ स्पर्धेत भारतीय गोल्फपटू दीक्षा डागरने अंतिम फेरीत सातत्यपूर्ण ७१ गुणांसह ४-अंडर २१२ च्या एकूण गुणांसह संयुक्तपणे नववे स्थान मिळविले. २४ वर्षीय दीक्षाने तीन दिवसांत ७१, ७० आणि ७१ अशा फेऱ्या केल्या आणि अव्वल-१० मध्ये चौथी कामगिरी केली. २०१९ पासून लेडीज युरोपियन टूरवर (एलईटी) असलेल्या दीक्षाच्या मागे, नवोदित हिताशी बक्षी (७१-७३-६९) संयुक्तपणे १२व्या स्थानावर आणि अवनी प्रशांत (७७-७०-६७) १९व्या स्थानावर आहेत. इंग्लंडच्या मिमी रोड्सने आपला नवोदित हंगाम सुरू ठेवत आपले तिसरे एलईटी जेतेपद पटकावले. गोयर गोल्फ अँड कंट्री क्लबमध्ये तिने मैदानाबाहेर दोन शॉट्स मारले. भारताबाहेर आपली पहिलीच एलईटी स्पर्धा खेळणाऱ्या हिताशीने पार-४ आठव्या क्रमांकावर तीन बर्डी आणि एक बोगीसह एक गरुड मिळवला. अवनीने ५-अंडर ६७ असा उत्कृष्ट गुण मिळवला आणि दिवसाचा संयुक्त दुसरा सर्वोत्तम स्कोअर केला. त्वेसा मलिक (७४-७५) कट चुकली व पहिल्या फेरीनंतर प्रणवी उर्सने वैद्यकीय कारणांमुळे माघार घेतली.

### पोलंडच्या इगा स्वियातेकची पाचव्या स्थानावर घसरण



**न्यू यॉर्क** : बेलारूसची आर्यना सबालेन्का जागतिक महिला टेनिस क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम राहिली, तर अमेरिकेची कोको गॉफने रोममध्ये उपविजेते पटकावल्यानंतर पुन्हा आपल्या कारकिर्दीतील सर्वोच्च दुसऱ्या क्रमांकाचे स्थान मिळविले. मात्र फ्रेंच ओपन जेतेपद राखण्यापूर्वीच पोलंडच्या इगा स्वियातेकची पाचव्या स्थानावर घसरण झाली आहे. २५ मे ते ८ जून दरम्यान पॅरिसमध्ये होणाऱ्या रोलँड गॅरोस येथे २३ वर्षीय स्वियातेक सलग चौथे आणि एकूण पाचवे जेतेपद जिंकण्याचा प्रयत्न करेल. तथापि,माजी प्रथम विश्वमानांकित इगा स्वियातेक २०२४ च्या क्ले मेजर स्पर्धेत विजय मिळवल्यापासून संघर्ष करत आहे. अलिकडेच, इटालियन ओपनमध्ये अंतिम ३२ च्या फेरीत तिला अमेरिकन डॅनिएल कॉलिन्सकडून पराभव पत्करावा लागला, त्यामुळे ती क्रमवारीत दुसऱ्या स्थानावरून पाचव्या स्थानावर घसरली. घरच्या प्रेक्षकांसमोर इटालियन ओपन जिंकणारी जास्मिन पाओलिनी पाचव्या स्थानावरून चौथ्या स्थानावर पोहोचली, तर गॉफची सहकारी जेसिका पेगुला चौथ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर पोहोचली. रशियन किशोरी मिरा ॲण्ड्रिव्हाने ऑस्ट्रेलियन ओपन विजेत्या मॅडिसन कीजला मागे टाकत सहावे स्थान पटकावले.

### सिक्कीम क्रिकेट मैदान फ्लडलाइटने उजळले

**खाणकाम** : खाणकामातील सिक्कीम क्रिकेट मैदानाने अत्याधुनिक हाय-मास्ट एलईडी फ्लडलाइट्स बसवून राज्याच्या क्रीडा इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा गाठला, याचे अधिकृत उद्घाटन सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेम सिंग तमांग यांच्या हस्ते झाले. या विकासामुळे सिक्कीममध्ये पहिल्यांदाच डे-नाईट सामने आणि हाय-डेफिनिशन लाईव्ह ब्रॉडकास्ट आयोजित करण्याची क्षमता या मैदानाला मिळाली आहे. १२.२ कोटी रुपयांचा हा प्रकल्प सिक्कीम सरकारने पूर्णपणे निधी दिला होता आणि सिक्कीम क्रिकेट संघटनेद्वारे (एसआयसीए) द्वारे अंमलात आणला गेला होता. हे काम डिसेंबर २०२४ मध्ये सुरू झाले आणि १८ एप्रिल रोजी पूर्ण झाले. या प्रकाश व्यवस्थेत ४४ मीटर उंच चार मास्ट आहेत, प्रत्येकी ६४ हाय-पॉवर एलईडी फ्लडलाइट्सने सुसज्ज आहेत, एकूण २५६ लाईट्स आहेत. प्रत्येक लाईटची क्षमता १.२ किलोवॅट आहे आणि ही प्रणाली टेलिव्हिजन क्रिकेटसाठी आवश्यक असलेल्या मानकांपेक्षा खूपच जास्त २८०० लक्सची प्रभावी रोषणाई प्रदान करते. उद्घाटन सोहळ्यात सिक्कीम उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती विश्वनाथ सोमद्दर, कॅबिनेट मंत्री, आमदार, मुख्य सचिव, मुख्य प्रशासक-सह-कॅबिनेट सचिव आणि वरिष्ठ विभाग अधिकारी उपस्थित होते.

# चेन्नई, राजस्थानात आत्मसन्मानासाठी लढत

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये प्ले-ऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर झालेले चेन्नई सुपर किंग्ज आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात मंगळवारी येथे लढत होणार आहे. तसे या लढतीला फारसे महत्त्व नाही, परंतु दोन्ही संघ आत्मसन्मानासाठी एकमेकांविरुद्ध झुंजणार आहे. यासोबतच दोन्ही संघ आपल्या पुनर्बांधणी प्रक्रियेला गती देण्याचे लक्ष्य ठेवतील. धोनीच्या नेतृत्वाखालील सीएसके आपल्या संघाला तरुण ब्रिगेडमध्ये रूपांतरित करण्याचा प्रयत्न करेल.

मंगळवारचा सामना राजस्थान रॉयल्ससाठी २०२५ च्या आवृत्तीतील शेवटचा सामना आहे. या आयपीएलच्या माध्यमातून राजस्थानला वैभव सूर्यवंशी सारखा प्रतिभावान खेळाडू गवसला आहे. वैभवने अनपेक्षितपणे आश्चर्यजनक कामगिरी करून क्रिकेट जगताला त्याची दखल घेण्यास भाग पाडले. वाईट गोलंदाजीमुळे राजस्थान रॉयल्सला सर्वात जास्त नुकसान झाले आहे. मधली फळीतील कामगिरी अप्रभावी राहिली. गोलंदाजांच्या सरासरी कामगिरीमुळे व अव्वल फळीच्या फलंदाजांवर जास्त अवलंबून राहिल्यामुळे सीएसकेला दहा संघांच्या गुणतालिकेत नवव्या क्रमांकावर रहावे लागले. जोस बटलरला संघातून वगळल्यामुळे व जोफ्रा आर्चरचा प्रभावशाली खेळ कमी पडल्यामुळेही राजस्थानला बराच संघर्ष करावा लागला. प्रतिस्पर्ध्यांना आव्हान देऊ शकेल



महेंद्रसिंह धोनी



संजू सॅमसन

असा आघाडीचा भारतीय गोलंदाज नसणे हे त्यांचे सर्वात मोठे नुकसान आहे. मुंबई इंडियन्सकडे जसप्रीत बुमराह आणि ट्रेंट बोल्टसारखे प्रभावी गोलंदाज असल्यामुळे ते स्पर्धेत मुसंडी मारू शकले. पण राजस्थानकडे असेही काहीही नाही.

आता राजस्थान रॉयल्स केवळ आत्मसन्मानासाठी खेळणार असून उच्च पातळीवर आपल्या मोहिमेचा शेवट करू इच्छिणार आहे.

तिकडे, संघात अनुभवी खेळाडूंचा समावेश करून त्यांच्यावर अवलंबून राहणे हा फॉर्म्युला जुना ठरला आहे. त्यामुळे या हंगामात चेन्नई सुपर किंग्जच्या कामगिरीवर मोठा परिणाम झाला आहे. राहुल त्रिपाठी व दीपक हुडाकडून सीएसकेने खूप अपेक्षा केल्या होत्या. त्यांच्या भारताच्या अनुभवामुळे त्यांना फ्रॅन्चायझीशी करार मिळाला असेल, पण दबावाच्या परिस्थितीत ते कधीही सातत्यपूर्ण सामना जिंकू शकले नाहीत.

आयुष म्हात्रे, शेख रशीद आणि उर्विल पटेल सारख्या तरुण रक्ताच्या समावेशाने पुनर्बांधणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. २० वर्षीय म्हात्रे बंगळुरुविरुद्ध शतक ठोकण्याच्या जवळ पोहोचला होता आणि हैदराबाद व मुंबईविरुद्धही त्याने चांगली कामगिरी केली. पटेल उशिरा आला आहे, परंतु त्याने केकेआरविरुद्धच्या सामन्यात आपली क्षमता दाखवली.

कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या पराभवामुळे संघाचे संकट आणखी वाढले. धोनीचे कर्णधार म्हणून पुनरागमन संघाचे नशीब बदलेल अशी अपेक्षा होती, परंतु इतक्या मर्यादित संसाधनांमध्ये तोही फारसे काही करू शकला नाही. डेव्हॉन कॉनवे व रचिन रवींद्र सारख्या परदेशी खेळाडूंकडून खूप अपेक्षा होत्या, पण तेसुद्धा यशस्वी झाले नाही. सीएसकेला आपल्या फलंदाजीचे संयोजन निश्चित करावे लागेल. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**चेन्नई सुपर किंग्ज वि. राजस्थान रॉयल्स**
**स्थळ** : अरुण जेटली स्टेडियम, नवी दिल्ली
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# बीसीसीआयने आशिया स्पर्धांमधून माघार घेण्याचे वृत्त फेटाळले

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

भारत आणि पाकिस्तानमधील सीमापार तणावामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) यावर्षीच्या आशिया चषक व महिलांच्या उदयोन्मुख संघ आशिया चषक स्पर्धेत भाग न घेण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त काही माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले, परंतु बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी माध्यमांचे हे वृत्त फेटाळून लावले. सदर वृत्त पूर्णतः काल्पनिक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

बीसीसीआयने पुढील महिन्यात श्रीलंकेत होणाऱ्या महिला उदयोन्मुख संघ (इमर्जिंग टीम) आशिया चषक व सप्टेंबरमध्ये होणाऱ्या पुरुष आशिया चषक या दोन्ही स्पर्धांमधून माघार घेण्याच्या निर्णयाची माहिती आशियाई क्रिकेट परिषदेला (एसीसी) दिली आहे, असा दावा अलीकडील वृत्तांतात करण्यात आला. बीसीसीआयने अशा प्रकारच्या चर्चांमध्ये भाग घेतलेला नाही किंवा एसीसी स्पर्धांबाबत कोणतेही पाऊल उचललेले नाही, अशा शब्दांत सैकिया यांनी या वृत्तांना स्पष्टपणे नकार दिला. सदर वृत्त 'काल्पनिक व केवळ काल्पनिक' आहे असे त्यांनी म्हटले. (वृत्तसंस्था)

# भारताच्या फैजान अन्वरचा घानाच्या कपाकपोवर विजय

## डॅनिलोने जिंकले डब्ल्यूबीओ आशिया मध्य-पूर्व विजेतेपद

◆ **बंगळुरू, १९ मे**

भारताचा अपराजित प्रो-बॉक्सर फैजान अन्वरने सनबर्न युनियन येथे झालेल्या सुपर फायटर सिरीज ३ च्या मुख्य स्पर्धेत १०-राऊंडच्या वेल्टरवेट आंतरराष्ट्रीय व्यावसायिक मुष्टियुद्ध सामन्यात घानाच्या कपाकपो अलोटेवर दमदार विजय मिळवला.

मूळचा कोलकात्याचा रहिवासी असलेला दुबईस्थित स्टार फैजान अन्वरने प्रत्येक फेरीनंतर प्रेक्षकांकडून वाहवा मिळविली. बंगळुरूमध्ये ग्रासरूट बॉक्सिंग व क्राऊन बॉक्सिंगने आयोजित केलेल्या दहा तीव्र सामन्यांचा समावेश असलेला जागतिक दर्जाचा फाईट कार्ड पाहिला. या स्पर्धेत भारत आणि घाना, युक्रेन आणि बेलारूससह विविध देशांतील फायटर्स सहभागी झाले होते. आशिया मिडल-ईस्ट सुपर लाइटवेट जेतेपदाच्या सह-मुख्य स्पर्धेत युक्रेनच्या डॅनिलो होन्चारुलने दागेस्तानच्या रुस्लान कामिलोव्हचा पराभव केला. तिसऱ्या फेरीत त्याचा प्रतिस्पर्धी निवृत्त झाल्यानंतर, डॅनिलोने विजय आणि जेतेपद पटकावले आणि त्याला तांत्रिक नॉकआउट देण्यात आले.



इतर सहाय्यक स्पर्धांमध्ये, मिझोरामच्या एफ. झोरमछना हिने बंगळुरूच्या हर्ष सरोहाला एकमताने हरवले. तसेच बंगळुरूचा आणखी एक प्रो-बॉक्सर कमला रोकाने पंजाबच्या मेहकप्रीतवर एकमताने विजय मिळवला. पंजाबचा रोहित चौधरी, पश्चिम बंगालचा अमन बहादूर आणि उत्तराखंडचा रितेश सिंग बिश्त यांनीही आपापल्या लढती जिंकल्या. हरयाणाच्या राणी देवीने बेलारूसच्या अलेक्झांड्रा सिटनिकोवाला एकमताने हरवले.

माझे स्वप्न स्पष्ट आहे. भारतीय व्यावसायिक बॉक्सिंग आणि आपल्या चाहत्यांसाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ तयार करणे. नेहमीच परदेशात पाहण्याऐवजी मायदेशात जागतिक स्तरावरील लढती आयोजित करण्याची वेळ आली आहे, असे ग्रासरूट बॉक्सिंगच्या संस्थापक मुजतबा कमाल म्हणाले. (वृत्तसंस्था)

# सिंधू, प्रणॉय पुनरागमनाच्या तयारीत

◆ **क्वालालम्पूर, १९ मे**

मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या ४७५,००० अमेरिकन डॉलर्स पारितोषिकांच्या मलेशिया मास्टर्स सुपर ५०० बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या मोहिमेचे नेतृत्व करताना स्टार भारतीय बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू आणि एच एस प्रणॉय नशिबात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करतील.

सिंधू व प्रणॉय या दोघांनीही गत काही काळापासून लय व तंदुरुस्तीशी झुंजत कठीण काळातून प्रवास केला आहे. गत महिन्यात सुदिरमन चषकामध्ये इंडोनेशिया व डेन्मार्कविरुद्ध या दोघांनी आपले सामने गमावले होते. ही त्यांची शेवटची स्पर्धा होती.

दोन आठवड्यांच्या विश्रांतीसह अनुभवी बॅडमिंटनपटू आता अक्सियाटा अरेना येथे आपली लय पुन्हा गवसण्यासाठी उत्सुक असतील. दोन वेळा ऑलिम्पिकपदक विजेती सिंधू, सध्या जागतिक क्रमवारीत १६ व्या क्रमांकावर आहे. ती आपल्या मोहिमेची सुरुवात जपानच्या नात्सुकी निदैराविरुद्ध करेल. नात्सुकी जगात २० व्या क्रमांकावर आहे. जागतिक क्रमवारीत ३५ व्या क्रमांकावर घसरलेली प्रणॉय, जपानच्या पाचव्या मानांकित केंटा निशिमोतोविरुद्ध कठीण सलामीचा सामना करेल. महिला एकेरीत, २०२४ हायलो ओपनची उपविजेती मालविका बनसोडची लढत चीन तैपेईच्या चिउ पिन-चियानशी होईल, तर तैपेई ओपन सुपर ३०० मधील उपांत्य फेरी गाठणारी उन्नती हुड्डा ही आपली देशबांधव लिन हसियांग तीशी होईल. आकर्षी कश्यपने आठव्या मानांकित इंडोनेशियाच्या पुत्री कुसुमा वर्दानीशी बरोबरी साधली आहे.





पुरुष एकेरीत, २०२३ ओडिशा मास्टर्स व २०२४ गुवाहाटी मास्टर्समधील विजेता सतीश करुणाकरण, डेन्मार्कच्या अव्वल मानांकित ॲण्डर्स ॲण्टोनसेनशी लढेल. तैपेई ओपनच्या उपांत्य फेरीत पोहोचलेला व जागतिक कनिष्ठ अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक विजेता आयुष शेट्टी कॅनडाच्या ब्रायन यांगशी लढेल, तर प्रियांशु राजावत सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेहशी सुरुवात करेल.

मिश्र दुहेरीत, जागतिक क्रमवारीत १९ व्या क्रमांकावर असलेल्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांचा सामना पात्रता फेरीत होईल. रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे हे चौथ्या मानांकित चिनी जोडी गुओ झिन वा आणि चेन फांग हुई यांच्याविरुद्ध सुरुवात करतील, तर आशिथ सूर्या आणि अमृता प्रमुथेश हे अव्वल मानांकित जियांग झेन बँग आणि वेई या झिन यांच्याशी लढतील.

सतीश मिश्र दुहेरीत आद्य वरियथसोबत मलेशियाच्या रॉय किंग याप आणि व्हॅलेरी सिओ यांच्याशी लढतील. पुरुष दुहेरीत, हरिहरन अम्साकारुनन आणि रुबन कुमार रेथिनासाबापती ही जोडी खेळणार आहे. महिला दुहेरीत कविप्रिया सेल्वम आणि सिमरन सिंघी, वैष्णवी खडकेकर आणि अलिशा खान, तसेच प्रेरणा अल्वेकर आणि मृण्मयी देशपांडे या भारतीय जोडीचा सहभाग असेल. पात्रता फेरीत, किदाम्बी श्रीकांत, एस. शंकर मुथुस्वामी सुब्रमण्यम आणि थरुन मन्नेपल्ली हे पुरुष एकेरीच्या मुख्य ड्रॉमध्ये स्थान मिळविण्यासाठी स्पर्धा करतील, तर अनमोल खरब आणि तस्नीम मीर महिला विभागात पात्रता मिळविण्याचे ध्येय ठेवतील. (वृत्तसंस्था)

# बेन स्टोक्सने दुखापतीतून बरे होण्यासाठी दारू सोडली

◆ **लंडन, १९ मे**

इंग्लंडचा कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने आपल्या पायाच्या दुखापतीतून बरे होण्यासाठी पुनर्वसनादरम्यान दारू पिणे सोडले आहे, जेणेकरून तो पारंपारिक प्रतिस्पर्धी ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या आगामी ॲशेस मालिकेसाठी तयार राहील.

मी वर्षाच्या सुरुवातीलाच दारू पिणे सोडले होते. मद्यप्राशन न केल्यामुळे मी या दुखापतीतून लवकर बरा होईल, असे या दिग्गज क्रिकेटपटूने सांगितले.

न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यादरम्यान ३३ वर्षीय स्टोक्सच्या डाव्या पायाला दुखापत झाली व डिसेंबरमध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली होती. त्यामुळे तो बराच काळ खेळू शकला नाही.



मी सध्या ठीक आहे, मला माझ्या कामात बदल करायला हवा, असे तो म्हणाला. या वर्षी द हंड्रेडमध्ये स्टोक्सच्या दुखापत झाली व नंतर न्यूझीलंडच्या कसोटी दौऱ्यादरम्यान तो पुन्हा जखमी झाला.

मी कधी पूर्णपणे शांत होईन असे मला वाटत नव्हते, परंतु २ जानेवारीपासून मी एकदाही मद्यप्राशन केले नाही. माझ्या दुखापतीवरील उपचार पूर्ण करून मैदानावर परत येईपर्यंत मी मद्याला स्पर्शही करणार नाही असा दृढनिश्चय केला, असे तो म्हणाला.

स्टोक्सने अलीकडेच झिरो अल्कोहोल स्पिरीट कंपनी क्लीनकोसोबतची आपली भागीदारी उघड केली. या कंपनीसोबत त्याने 'गुंतवणूकदार व ब्रॅण्ड पार्टनर' म्हणून करार केला आहे.

इंग्लिश कर्णधार गुरुवारी ट्रेंट ब्रिज येथे झिम्बाब्वेविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात पुनरागमन करणार आहे. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानमध्ये दिवसाला दहा लाख लोक उपाशी

◆ **न्यू यॉर्क, १९ मे**

पाकिस्तानात अन्नाचे संकट गंभीर असून दररोज दहा लाख लोकांना उपाशी राहावे लागत असल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला आहे. नोव्हेंबर २०२४ ते मार्च २०२५ पर्यंत पाकिस्तानमध्ये गंभीर अन्न असुरक्षितता कायम आहे. यावर्षी सुमारे १.१ कोटी लोकांची उपासमार होणार असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले.

संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेने जारी केलेल्या अहवालात म्हटले की, पाकिस्तानमध्ये उपासमार कायम राहील. पाकिस्तानच्या ६८ ग्रामीण जिल्ह्यांतील २२ टक्के लोकसंख्येला गंभीर अन्न संकटाचा सामना करावा लागू शकतो. यामध्ये विशेषतः पूरग्रस्त बलुचिस्तान, सिंध आणि खैबर पख्तूनख्वा यांचा समावेश आहे. यापैकी १७ लाख लोक आपत्कालीन परिस्थितीत आहेत. अहवालात असे म्हटले आहे की २०२४ मध्ये जेव्हा उपासमारीच्या परिस्थितीचे सर्वेक्षण करण्यात आले, तेव्हा त्यात ३.६७ कोटी लोकांचा समावेश होता. पण २०२५ मध्ये ५.०८ कोटी लोकांचा त्यात समावेश करण्यात आला. यामध्ये आणखी २५ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला.

२०२३ ते २०२४ दरम्यान, पाकिस्तानमध्ये सुमारे १.१८ कोटी लोक तीव्र अन्न असुरक्षिततेचा सामना करत होते. बलुचिस्तान आणि सिंधमध्ये तीव्र कुपोषणाची प्रकरणे जास्त राहिली. जागतिक स्तरावर तीव्र कुपोषण पातळी अनेक जिल्ह्यांमध्ये १० टक्के पेक्षा जास्त होती आणि काही जिल्ह्यांमध्ये ३० टक्के पेक्षा जास्त होती. पुरेशा निधीअभावी पोषण सेवांची उपलब्धता देखील मर्यादित राहिली. २०२५ मध्ये हवामान आपत्ती आणि गंभीर अन्न संकटामुळे कुपोषणाची भयानक परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. अहवालानुसार, २०२३ ते जानेवारी २०२४ पर्यंत १.१८ कोटी लोक तीव्र अन्न असुरक्षिततेचा सामना करत होते, त्यापैकी २२ लाख लोक आणीबाणीच्या परिस्थितीत होते. मार्च २०२३ ते जानेवारी २०२४ दरम्यान, ६ महिने ते ५ वर्षे वयोगटातील २१ लाख मुलांना कुपोषणाचा सामना करावा लागला. (वृत्तसंस्था)

# कोलकाता, बंगळुरूच्या संघात शिवम शुक्ला, मुझारबानीची निवड

◆ **नवी दिल्ली, १९ मे**

कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आपल्या जखमी खेळाडूंसाठी शिवम शुक्ला व ब्लेसिंग मुझारबानीला पर्यायी खेळाडू म्हणून निवडले आहे, असे आयपीएलने सोमवारी सांगितले.

प्ले-ऑफच्या शर्यतीतून आधीच बाहेर पडलेल्या गतविजेत्या केकेआरने उर्वरित हंगामासाठी रोवमन पॉवेलच्या जागी बदली खेळाडू म्हणून शुक्लाला करारबद्ध केले आहे.

वेस्ट इंडीजच्या या अष्टपैलू खेळाडूला त्याच्या टॉन्सिल्सच्या शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे. लेग-स्पिनर शुक्ला स्थानिक क्रिकेटमध्ये मध्य प्रदेशकडून खेळतो आणि ३० लाख रुपयांना केकेआरमध्ये सहभागी होणार आहे.

दरम्यान, आरसीबीने लुंगी नगिदी याच्याऐवजी मुझारबानीला पर्यायी खेळाडू म्हणून निवडले आहे. नगिदी राष्ट्रीय कर्तव्यांसाठी दक्षिण आफ्रिकेच्या संघात सहभागी होण्यासाठी फ्रॅन्चायझी सोडून जाणार आहे. ही बदली २६ मे पासून लागू होईल.

झिम्बाब्वेचा वेगवान गोलंदाज मुझारबानीने आतापर्यंत ७० टी-२० सामने खेळले आहेत आणि ७८ बळी घेतल्या आहेत. याव्यतिरिक्त, त्याने १२ कसोटी आणि ५५ एकदिवसीय सामन्यांमध्ये झिम्बाब्वेचे प्रतिनिधित्व केले आहे. तो ७५ लाख रुपयांमध्ये आरसीबीमध्ये सहभागी होईल. (वृत्तसंस्था)

# मेस्सीच्या इंटर मियामीचा ऑर्लंडो सिटीकडून पराभव



ऑर्लंडो सिटीविरुद्ध खेळताना इंटर मियामीचा लियोनेल मेस्सी

◆ **मियामी, १९ मे**

लियोनेल मेस्सीच्या नेतृत्वाखालील इंटर मियामी संघाला मेजर लीग फुटबॉल समन्यात ऑर्लंडो सिटीकडून सरळ ०-३ गोलने पराभव पत्करावा लागला. सर्व स्पर्धांमध्ये सात सामन्यांपैकी इंटर मियामीचा हा पाचवा पराभव ठरला. या पराभवानंतर आठ वेळा बॅलन डीओर विजेता व २०२२ च्या विश्वचषक विजेत्या अर्जेंटिना संघाचा कर्णधार मेस्सीने आपल्या इंटर मियामी संघातील खेळाडूंना एकजुटीने खेळण्याचे आवाहन केले आहे.

'हा एक कठीण काळ आहे, परंतु आपण यातून बाहेर पडणार आहोत, मात्र आपण एक संघ आहोत की नाही हे बघा. जेव्हा सर्वकाही चांगले चालले असेल तेव्हा सामना खूप सोपा असतो, परंतु जेव्हा कठीण काळ येतो तेव्हा आपल्याला पूर्वीपेक्षा अधिक एकजूट राहावे लागते, एक खरा संघ बनावे लागते आणि त्यातून मार्ग काढावा लागतो, असे मेस्सी म्हणाला. (वृत्तसंस्था)

# कार्लोस अल्काराझ इटालियन ओपन विजेता

◆ **रोम, १९ मे**

स्पेनचा युवा टेनिसपटू कार्लोस अल्काराझने अव्वल क्रमांकाच्या जॅनिक सिनरला पुन्हा ७-६ (५), ६-१ असे हरवून आपले पहिले इटालियन ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद जिंकले आणि आपल्या झोळीत आणखी एक मोठे क्ले-कोर्ट जेतेपद मिळवले.अल्काराझ हा केवळ एकच खेळाडू आहे, जो सातत्याने जॅनिक सिनरला हरवत आहे. आता त्याने सलग चार वेळा असे केले आहे.

तीन महिन्यांच्या डोपिंग बंदीनंतर सिनेरची ही पहिलीच स्पर्धा होती. फोरो इटालिको येथे सिनरच्या घरच्या चाहत्यांसमोर अल्काराझच्या विजयाने इटालीच्या सिनरची २६ सामन्यांचा विजयाची मालिका खंडित झाली.



फ्रेंच ओपनपूर्वी सिनर, अल्काराझ अव्वल दोन स्थानांवर

सोमवारी जाहीर झालेल्या ताज्या एटीपी क्रमवारीत जॅनिक सिनर आणि कार्लोस अल्काराझने अव्वल दोन स्थानांवर कब्जा केला. या क्रमवारीचा या वर्षीच्या फ्रेंच ओपन ड्रॉसाठी वापर केला जाईल.

सिनर व अल्काराझ २५ मे ते ८ जून दरम्यान पॅरिसमध्ये होणाऱ्या रोलँड गॅरोस येथे होणाऱ्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेच्या ड्रॉच्या विरुद्ध भागात असतील आणि त्यामुळे अंतिम सामन्यापूर्वी एकमेकांना तोंड देऊ शकत नाहीत.

इटालियन ओपनमध्ये विजेतेपद पटकावल्यानंतर अल्काराझने जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव्हकडून दुसरे स्थान मिळवले. जिथे त्याने अव्वल क्रमांकावर असलेल्या आणि घरच्या आवडत्या सिनरला हरवले.

सातव्या एटीपी मास्टर्स १००० विजेतेपद पटकावणाऱ्या अल्काराझने सलग चौथ्यांदा सिनरचा पराभव केला आणि त्याचा विजयाचा रेकॉर्ड ७-४ असा झाला आहे. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### मोडनिंब येथील शिवाजीनगर परिसरात महिलेला लुटण्याचा प्रयत्न

**मोडनिंब,दि.१९ मे-**

मोडनिंब (ता. माढा) येथे आज सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास शिवाजीनगर येथील संजीवनी विद्यालय परिसरात सायंकाळी फिरण्यासाठी गेलेल्या एका स्थानिक महिलेला दोन अज्ञात चोरट्यांनी लुटण्याचा प्रयत्न केला.मोटारसायकलवर आलेल्या या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढून नेण्याचा प्रयत्न केला.सुदैवाने महिला सावध असल्याने हा प्रकार टळला असून चोरटे तिथून पळून गेले. या घटनेने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांनी सतर्कतेचे आवाहन केले आहे. निर्जन वस्ती किंवा एकट्याने फिरताना विशेषतः महिलांनी काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मंगळवेढा शहरात तरुणाची गळफास घेवून आत्महत्या

**मंगळवेढा दि.१९ मे-**

मंगळवेढा शहरात एका ४५ वर्षीय तरुणाने अज्ञात कारणावरुन घरातील लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने गळफास घेवून आत्म हत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, १८ मे रोजी रात्री ८.३२च्यापुर्वी खबर देणारे पशुवैद्यकीय डॉ.संदिप लिगाडे यांचे मंगळवेढा येथील शिवाजीनगर मधील राहते घरी दिलीप सहदेव आठवले (वय ४५ रा.नंदूर) याने घरामध्ये लोखंडी अँगलला दोरीच्या सहाय्याने अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केली. अधिक तपास पोलीस हवालदार कांबळे हे करीत आहेत.

# नर्सी नामदेव येथून निघालेल्या वृक्षदिंडीची पंढरपुरात सांगता

## संत नामदेवांच्या जन्मस्थळापासून निघालेली दिंडी नामदेव पायरीवर विसावली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ मे -**

नर्सी नामदेव या संत नामदेवांच्या जन्मस्थळापासून निघालेल्या वृक्षदिंडीचे शनिवारी पंढरपुरात आगमन झाले.विशेष म्हणजे या दिंडीत शेतकरी, वृक्ष, वसंत साहित्य हे विषय घेण्यात आले आहेत. निसर्गाची शाळा व हस्ताक्षर प्रकाशनाच्या माध्यमातून येथील नामदेव पायरी पर्यंत या वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे ही वृक्षदिंडी ३ मे २०२५ रोजी नर्सी नामदेव येथून सकाळी पाच वाजता निघाली होती. रस्त्यातील ३८ गावांमध्ये प्रबोधन करत व बीज वाटप करत वृक्षदिंडी नुकतीच पंढरपूर येथे पोहोचली.



या वृक्षदिंडीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे प्रश्न, सध्याची शेतकऱ्याची परिस्थिती, वेगवेगळ्या वृक्षांची माहिती, दीर्घकाळ टिकणाऱ्या फळ झाडांविषयी जनजागृती, संत साहित्यचे वास्तविक जीवनात अनुकरण हे विषय घेऊन प्रबोधन करण्यात आले. प्रत्येक गावातील लहान मुलांना व जाणकार मंडळींना एकत्र करून वृक्ष, संत साहित्य व शेतकऱ्यांच्या सद्य परिस्थितीवर काय करण्याची गरज आहे यावरती प्रबोधन करण्यात आले. दररोज सकाळी पाच ते नऊ व सायंकाळी पाच ते सात असा पायी प्रवास करीत तब्बल ३८ गावांचा प्रवास करीत ही वृक्षदिंडी पंढरपुरात पोहोचली आहे.

दरम्यान लहान मुलांनी रोपवाटिका कशा तयार कराव्या, दीर्घकाळ टिकणाऱ्या झाडांचे पुढच्या पिढीला काय फायदे होतील या विषयावरती मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मुलांना विविध वृक्षांच्या बिया वाटप करण्यात आल्या. या दिंडीच्या प्रवासा दरम्यान विविध पुरस्काराचे वितरण देखील करण्यात आले. या वृक्षदिंडीत प्रामुख्याने निसर्ग शाळेचे प्रवर्तक अण्णा जगताप व हस्ताक्षर प्रकाशनाचे साहित्यिक कवी विनायक येवले, शेतकरी राजेश चव्हाण यांनी प्रवास केला तर काही गावांमध्ये वृक्षदिंडीसाठी प्राचार्य ज्ञानोबा ढगे, प्रा.हनुमान व्हरगुळे, उद्योजक विनायक जाधव, प्रा.गोविंद सुरोशे, अविनाश राऊत, पंडित अवचार, नामदेव शिंदे, विठ्ठल लोंढे, सदा वडजे, रवी देशमुख, बाळू बुधवंत, केशव घुगे, प्रा.शिवाजी अंबुलगेकर, प्रा.श्रीराम गव्हाणे या उच्चशिक्षित मंडळींनी सहभाग नोंदविला.

### प्रत्येक गावाचा ग्रुप तयार करुन वृक्षदिंडीचे नियोजन

या बरोबरच व्हाट्सअप वरती प्रत्येक गावाचा ग्रुप तयार करून वृक्षदिंडीचे देखील नियोजन केले. काही तरुण प्रगतशील शेतकऱ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. आपापसात विचारांची देवाण-घेवाण करण्यात आली. प्रत्येक गावातील जाणकारांनी वृक्षदिंडीचे थाटामाटात स्वागत केले. मंदिरात राहण्याची व्यवस्था केली

### विठ्ठलाच्या नावाने झाड लावण्याचे आवाहन

प्रत्येक गावात विठ्ठलाच्या नावाने झाड कशा पद्धतीने लावायचे यावरती मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतात या आषाढी एकादशीला एक तरी दीर्घकाळ टिकणाऱ्या फळ झाडाची लागवड करावी असा आग्रह वृक्ष दिंडीतील मार्गदर्शकांनी गावकऱ्यांना केला.

### बीज वाटून वृक्षदिंडीची सांगता

भर उन्हात पायी वृक्षदिंडी काढून तापमानाची व भविष्यातील आपल्या मुलांच्या जगण्याची दिशा दाखवण्याचा प्रयत्न या उच्चशिक्षित मंडळींनी प्रत्यक्ष कृती करून केला आहे. पंढरपूर येथे या वृक्षदिंडीची सांगता पंढरपुरातील जाणकार मंडळींना बीज वाटप करून करण्यात आली.

## निधन वृत्त...

### नारायण बंडगर



**सांगोला,दि.१९ मे-**

कमलापूर, ता.सांगोला येथील रहिवासी नारायण गणू बंडगर (वय-६७) यांचे अपघाती दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.


### गोपाळ मुदगल



**सोलापूर, दि. १९ मे-**

पाथरुट चौक येथील रहिवाशी गोपाळ लक्ष्मण मुदगल (५४) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी (दि.१९) रोजी मध्यरात्री १ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, एक जावई, नातवंडे असा परिवार होत. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या मार्केट यार्ड शाखेत कार्यरत होते.

### भाऊसाहेब देशपांडे



**सोलापूर, दि. १९ मे-**

मंद्रूप येथील प्रगतशील शेतकरी आणि जुळे सोलापूर येथील रहिवासी भाऊसाहेब शंकर देशपांडे (वय ८२) यांचे सोमवारी सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. विलास देशपांडे यांचे ते वडील होत.

### परमेश्वर काशिद



**मंगळवेढा दि.१९ मे**

उचेठाण येथील परमेश्वर नागन्नाथ काशिद (वय ४८) यांचे १९ मे रोजी सकाळी १०.३०च्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. याची खबर विश्वनाथ काशिद यांनी मंगळवेढा पोलीसात दिल्यानंतर या घटनेची नोंद मंगळवेढा पोलीसात झाली आहे.

## छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्तच्या वक्तृत्व स्पर्धेत अंजली लटके प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१९ मे-**

छत्रपती संभाजी महाराज व शंभूपुत्र छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त रुद्रशंभू प्रतिष्ठानच्या वतीने रविवारी दि. १८ मे रोजी झालेल्या खुल्या वक्तृत्व स्पर्धेत अंजली दत्तात्रय लटके हिने प्रथम क्रमांक पटकावला. यामध्ये जयराम परमेश्वर लांडे द्वितीय तर आर्या किसन शिंदे तृतीय आले.

या कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदनेने व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली याप्रसंगी बक्षीस वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले माजी सभापती विक्रम दादा शिंदे, जि प चे माजी कृषी सभापती संजय पाटील भिमानगर, टेंभुर्णीच्या सरपंच सुरजा ताई बोबडे, टेंभुर्णीचे तिसऱ्या आघाडीचे नेते रावसाहेब (नाना) देशमुख , संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, टेंभुर्णी ग्रामपंचायत सदस्य वैभव महाडिक-देशमुख, यशोदीप कॅम्पुटर चे गोरख खटके सर, चव्हाणवाडी चे माजी सरपंच हनुमंत चव्हाण,नवनाथ शिंदे, रोहित अटकळे, राहुल धोत्रे, राहुल कांबळे, अजिंक्य संगितराव, अक्षय धोत्रे उपस्थित होते.

यामध्ये प्रथम क्रमांक मिळवला अंजली दत्तात्रय लटके यांचा विषय शिव फुले शाहू आंबेडकर यांचे पुरोगामी विचार महाराष्ट्राचा कणा, यामध्ये द्वितीय क्रमांक ज्यांनी मिळवला जयराम परमेश्वर लांडे यांचा विषय छत्रपती शिवशंभूंचा विचार आणि आजची तरुणाई, तृतीय क्रमांक आर्या किसन शिंदे यांनी मिळवला यांचा विषय स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज, चतुर्थ क्रमांकाचा मान मिळवला शितल बाबुराव सुरवसे यांचा विषय स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, उत्तेजनार्थ क्रमांक शिवानी दीपक शिंगाडे यांनी मिळवला यांचा विषय राजकारणातील तरुणांचा सहभाग,या स्पर्धेमध्ये ३२ स्पर्धेकांनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन शंकर नागणे यांनी केले, या कार्यक्रमाचे परीक्षण धुमाळ मॅडम व हेमा मॅडम यांनी केले. या कार्यक्रमासाठी ज्यांनी मोलाची कामगिरी पार पाडली ते रुद्रशंभू प्रतिष्ठानचे सर्वच मावळे याप्रसंगी उपस्थित अध्यक्ष अजय गायकवाड उपाध्यक्ष गणेश गोंदिल, अविनाश नांगरे , प्रशांत खंडागळे, ऋषिकेश भंडारे,अस्लम तांबोळी, हर्षद मोरे, गणेश जगताप, दादा मोरे, शंकर नागणे,वैभव पवार, गणेश मोरे, गणेश पाटील, शुभम शिवपूजे, शंभू मुळे, विजय मोरे, ओंकार पाटील,विजय गायकवाड, शशिकांत नांगरे, अजय मोरे, सुमित खडके, दादा खडके, गाजु भाऊ पंडित उपस्थित होते.

## विविध मागण्यांसाठी कृषी सहाय्यक संघटनेचे आंदोलन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे -**

महाराष्ट्र राज्य कृषी सहाय्यक संघटनेकडून विविध मागण्यांसाठी जिल्हा परिषदेच्या पूनम गेटसमोर आंदोलन केला. कृषि सेवक कालावधी रद्द करुन कृषि सेवकांना नियमित कृषि सहाय्यक पदावर नियुक्ती देणे, कृषि सहाय्यकांचे पदनाम बदलून सहाय्यक कृषि अधिकारी करणे, कृषि सहाय्यकांना लॅपटॉप देण्यात यावे, ग्रामस्तरावर कामकाजासाठी कृषि मदतनिस देणे, निविष्ठा वाटपासंदर्भात वाहतुक भाड्याची तरतुद करावी किंवा निविष्ठा वाटप परमिटद्वारे करावे, कृषि विभागाचा आकृतीबंध तात्काळ मंजूर करावे, कृषि पर्यवेक्षक यांची पदे वाढवून कृषि सहाय्यकांच्या पदोन्नतीमधील कुंटितावस्था दूर करावे, समुह सहाय्यकांची पदे पूर्वीप्रमाणे भरण्यात यावी.

एमआरईजीएस योजनेअंतर्गत अडचणीचा विचार करुन लक्षांक देण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती पंचनामा कामाबाबत महसुल, ग्रामविकास व कृषि विभागाच्या जबाबदाऱ्याबाबत कार्यपध्दती तयार करण्यात यावे, सिल्लोड तालुक्यातील कृषि सहाय्यक आत्महत्येनंतर अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावे व कृषि सहाय्यक संवर्गाच्या आस्थापनाविषयक अडचणींची सोडवणूक करण्यात यावी या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. यापूर्वी त्यांनी तालुका कृषी कार्यालय येथे आंदोलन केला होता. मात्र त्याची दखल न घेतल्याने १५ मे पासुन बेमुदत कामबंद आंदोलन सुरू केला आहे. आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून संपूर्ण राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले.

कृषी सहायकांच्या आंदोलनाची दखल न घेतल्याने जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. २१ मे रोजी विभागीय कृषी सहसंचालक व कृषी आयुक्त कार्यालय, पुणे येथे धरणे आंदोलन करुन कृषी सहाय्यक उपोषण करणार असल्याचे सांगितले .या आंदोलनाला तालुका कृषी अधिकारी व मंडळ कृषी अधिकारी यानी पाठींबा दिला आहे. जिल्हा राज्य सदस्य उमेश मोहिते , जिल्हाध्यक्ष विशाल गावडे, जिल्हा सचिव उमेश कोळी , कार्याध्यक्ष रणजीत नाळे , खजिनदार निशिकांत आगलावे तसेच सर्व तालुकाध्यक्ष , सचिव व कृषी सहायक उपस्थित होते

## क्रीडा

### सोलापूरचे सात खेळाडू ग्रेस गुणांच्या लाभापासून वंचित

**सोलापूर, दि. १८ मे-**

दहावी व बारावी परीक्षेच्या निकालात येथील काही खेळाडू विद्यार्थ्यांना ग्रेस गुणांचा लाभ झालेला नाही. त्यामुळे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी सात विद्यार्थ्यांना गुण देण्यात यावे, अशी शिफारस करणारे पत्र महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (पुणे) विभागीय सचिवांना पत्राद्वारे केली आहे.

प्रेक्षा गोविंद मंत्री (किकबॉक्सिंग), सोहम सागर मर्दा (तलवारबाजी), शहानूर ताजुद्दीन शेख (शुटिंग), तनिष्का काकासाहेब गुंड (वुशू), स्वरुप सुरेश चव्हाण (शुटिंग) व यथार्थ आप्पासाहेब पाटील (सॉफ्टबॉल) अशा दहावीच्या सहा खेळाडू विद्यार्थ्यांना आणि समर्थ प्रभुराज घोडके (बुद्धिबळ) या बारावीच्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालात ग्रेस गुणांचा फायदा मिळालेला नाही. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून २०२४-२५ मध्ये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या खेळाडूंना वाढीव गुणाबाबतचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा कार्यालयाकडे ऑनलाईन प्राप्त झाले होते. जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून प्राप्त प्रस्तावाची ऑनलाईन छाननी करून बोर्डाच्या डेस्क ०३कडे शिफारस करून पाठवण्यात आले होते. परंतु, पाठवलेल्या प्रस्तावातून काही खेळाडूंना गुण न मिळाल्यामुळे बोर्डाकडे चौकशी केली असता ऑनलाईन प्रस्ताव त्यांच्याकडे दिसत नाही, असे सांगण्यात आले होते.

### श्राविकाचा यश लोंढे सर्वोत्कृष्ट गोलंदाज

**सोलापूर, दि. १९ मे-**

पुणे येथे झालेल्या राज्य निमंत्रित १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाच्या यश अनिल लोंढे याने सर्वोत्कृष्ट गोलंदाजाचे पारितोषिक पटकाविले. सोलापूर जिल्ह्याकडून खेळताना यशने आठ षटकांत ३५ धावांत ३ बळी घेतले. तो पार्कवरील युनायटेड अकॅडमीमध्ये प्रशिक्षक चंद्रशेखर लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतो. त्याचे मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांनी अभिनंदन केले.



## कल्पना माशाळ व अपुर्वा मेरगू प्रथम

### मातृदिनानिमित्त स्केटिंग करणाऱ्या पाल्याचे बोट धरून आईची स्केटिंगची स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

स्केटिंग करणाऱ्या पाल्याचे बोट धरून आईच्या स्केटिंग स्पर्धेत कल्पना (श्रावण माशाळ) व अपुर्वा (अक्षरा मेरगू यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.



चेतक रोलर स्केटिंग क्लबतर्फे ८२व्या स्केटिंग शिबिरादरम्यान मातृदिनानिमित्त ही स्पर्धा पासपोर्ट ऑफिससमोरील होम मैदानालगत रोडवर आयोजित केली होती. बक्षीस वितरण समारंभामध्ये सर्व विजेत्यांना क्रमवार स्मृती चिन्ह देण्यात येणार आहे. या कार्यक्रमामध्ये दिव्यकांत गांधीसह मयूर सोलनकर, जयदेव बाहेरमठ यांनी स्पर्धा परीक्षणाचे कार्य केले.

**गुणानुक्रमे प्रथम पाच (कंसामध्ये पाल्याचे नाव) :** कल्पना (श्रावण माशाळ), व अपूर्वा (अक्षरा मेरगु), अश्विनी ( समर्थ सारंगमठ), अनिता (आनंद स्वामी), नसरीन ( जाकी शेख), यास्मिन (अदनान शेख).

**उत्तेजनार्थ :** सपना (आलेक्या सनम), अर्चना (समर्थ काशेट्टी ), मरियम (खादिजा शेख), फिरदोस (मोहम्मद साद शेख), अक्सर (आहद शेख), प्रियंका (करूनेश दांती), वर्षारानी (कृष्णा धाराशिवकर), नेहा (वंश शहा).

## ऑर्किड अभियांत्रिकीत एच.पी.एल. क्रिकेट स्पर्धेस सुरवात

### चॅलेंजर्स अव्वल स्थानी

**सोलापूर, दि. १९ मे-**

एन. के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एच.पी.एल. महिला व पुरुष टेनिस क्रिकेट स्पर्धेत साखळी सामन्यात प्रत्येकी तीन सामन्यातून चॅलेंजर्स संघ तीनही सामने जिंकून अव्वल स्थानावर आहे. या स्पर्धेचे उद्घाटन उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास मेतन यांच्या हस्ते झाले. यावेळी रजिस्टार एस. एस. शेळके, सोलापूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड हे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांनी सर्व खेळाडूना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. सर्व सामने सायंकाळनंतर प्रकाश झोतात सुरू आहेत. या स्पर्धा पार पाडण्यासाठी दादा पांगळे, प्रमोद लिगाडे, स्पोर्ट्स सेक्रेटरी प्रतीक राय यांचेसह सर्व क्रीडा समन्वयक विद्यार्थी सहकार्य करत आहेत.





## नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीस विजेतेपद

### आत्मन चषक १४ वर्षांखालील क्रिकेट

### आनंद शेंडे सामनावीर, विहान येवांकर मालिकावीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे-**

नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमीने आत्मन चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

सुयश गुरुकुल येथे झालेल्या अंतिम सामन्यात नीलेश गायकवाड अकादमीने मॉडेल क्रिकेट अकादमीचा ६८ धावांनी पराभव केला. या स्पर्धेचे बक्षीस वितरण अनिकेत पंचभाई यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी किरण दिघे व निलेश गायकवाड आदी उपस्थित होते.

**वैयक्तिक पारितोषिके**

**सामनावीर : आनंद शेंडे**
**फलंदाज : अभिषेक देशमुख**
**गोलंदाज : अथर्व पाटील**
**मालिकावीर: विहान येवांकर**

**संक्षिप्त धावफलक**

**नीलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी :** ४० षटकांत ७ बाद १९३ (आनंद शेंडे ५४, रुगुवेद पाटील ४३, संस्कार गवळी २-१५) वि. वि. **मॉडेल अकादमी :** ३२.१ षटकांत सर्व बाद १२५ (अभिषेक देशमुख ६५, अथर्व पाटील ३-१५, अनुज वाल्मिकी ३-३३)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...

### ट्रक पलटी होऊन चालक जखमी शमशापूर फाट्याजवळ घडली घटना

**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर ते विजापूर असे जाताना ताबा सुटल्याने ट्रक पलटी होऊन झालेल्या अपघातात चालक जखमी झाला. हा अपघात सम शापूर फाट्याजवळ रविवारी रात्री ९.५० वाजता घडला. अरंगराज मुथुरेजियार (वय १९, रा. चिलारामस्वामी थेरू, कोलायुर, राज्य तामिळनाडू) असे जखमी झालेल्या ट्रकचालकाचे नाव अहे. रविवारी रात्री अरंगराज हा ट्रक चालवित सोलापूर येथून विजापूरकडे जात होता. रात्री ९.१५ च्या सुमारास तो समशापूर फाटा येथून जाताना त्याचा ताबा सुटल्यने ट्रक पलटी झाला. त्याच्या डोक्याला मार लागल्याने नांदणी टोल नाका येथील रुग्णवाहिकेतून त्याला उपचारास दाखल करण्यात आले. उपचारानंतर सोमवारी दुपारी एकच्या सुमारास त्याला बाहेर सोडण्यात आल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### कपडे वाळू घालताना महिलेला बसला विजेचा धक्का; विवाहिता भाजून जखमी

**सोलापूर, दि. १९ मे-**

घराच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीत कपडे वाळू घालताना विद्युत तारेचा धक्का लागून विवाहिता भाजून जखमी झाली. हा प्रकार शनिवार सकाळी १०.३० वाजता पंढरपूर येथे घडला. पूजा राजेश नेमाडे (वय २५, रा. पंढरपूर) असे भाजून जखमी झालेल्या विवाहितेचे नाव आहे. शनिवारी सकाळी पूजा या विवाहितेने घरातील कपडे धुतल्यानंतर ते वाळू घालण्यासाठी घराच्या पहिल्या मजल्यावरील गॅलरीत गेली. तेथे कपडे वाळू घालताना विजेचा तारांचा तिला धक्का लागला. यात दोन्ही हात, पाठ, पोट व चेहरा भाजल्याने खासगी रुग्णालयात उपचार करून रविवारी सायंकाळी ७ वाजता पती राजेश याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### एसटी बसच्या धडकेने वृध्देचा मृत्यू सोलापूर एस टी स्टॅन्डमधील घटना

**सोलापूर, दि. १९ मे-**

एस टी बसच्या धडकेने एस टी बसची वाट पाहणाऱ्या वृध्द म हिलेला धडक दिल्याने गंभीर जखमी झालेल्या महिलेचा मृत्यू झाला. ही घटना १८ मे रोजी दुपारी सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे घडली असून याबाबत एस टी चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मेहताबी सय्यद (वय ७६, रा. मंद्रुप, ता. दक्षिण सोलापूर) असे मरण पावलेल्या वृध्देचे नाव आहे. याबाबत सज्जाद खाजाभाई मुल्ला (वय ३२, रा. मंद्रुप) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन शेखर वंसत झुंजरे (वय ३३, रा. वरणे गाव, जि. सातारा) यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ मे रोजी दुपारी सोलापूर एस टी स्टॅन्ड येथे सज्जाद मुल्ला यांची आजी मेहताबी सय्यद या मंद्रुपला जाणाऱ्या एस टी बसची वाट बघत उभ्या होत्या. त्यावेळी शेखर झुंजरे या एस टी चालकाने त्याच्या ताब्यातील एस टी बस क्र. एमएच १४ बीटी ३४८० ही निष्काळजीपणे चालवून मेहताबी यांना धडक दिली. यामध्ये मेहताबी या गंभीर जखमी होऊन मरण पावल्या. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पैशासाठी विवाहितेचा छळ; गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १९ मे-**

घर खर्चासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत गुलनाज तबरेश शेख (वय २०, रा. राजीव गांधी नगर, शांती नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती तबरेश, सासू फातीमा, सासरा आरीफ, दीर अबु शेख (सर्व रा. मित्र नगर, कुमारस्वामी नगर, शेळगी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२३ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत गुलनाज या पतीसमवेत सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती तबरेश व त्याच्या घरातील लोकांनी गुलनाज हिचा शारीरीक व मानसिक छळ करून माहेरून सासरच्या घर खर्चासाठी पैसे आण म्हणून जाचहाट केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

# भागवत कथा मनासह इंद्रियावरील विजयाचे शास्त्र आहे

## ● निरूपणकार विवेक घळसासी : श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञास सुरूवात; जवळगेकर परिवारातर्फे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

भागवत कथेच्या माध्यमातून भक्ती-शक्तीचा संगम मनाला भावणारा आहे. जगात सुखाची प्राप्ती अशा कथातूनच मिळते. दुर्लभ असलेला मनुष्य देह आपल्याला मिळाला. ज्या देशात संतांनी व देवदेवतांनी आवतार घेतले त्या भारतात जन्म हे आपले भाग्य आहे. भारताच्या प्राचीन परंपरा व संस्कृतीचे दर्शन आपल्याला अशा कथांतून होते. सृष्टीच्या रचनेपासून अंतापर्यंतचा प्रवास यातून दिसतो. भक्तीचा उदय कसा झाला, ती वाढली कशी याबाबतचे विवरण गोकर्ण व धुंधुकारीच्या कथेतून मिळते. भागवत कथा आपल्याला जगण्याचे तंत्र शिकवते. त्यामुळे सध्याच्या धकाधकीच्या जीवनात मनाला शांतता व समाधान देणारी तसेच मनासह इंद्रियावरील विजयाचे शास्त्र म्हणजेच भागवत कथा असल्याचे प्रतिपादन निरूपणकार विवेक घळसासी यांनी केले.




सोलापूर : जुळे सोलापूर येथील द्वारकाधीश मंदिरात सोमवारी सायंकाळी भागवत कथा करताना निरूपणकार विवेकजी घळसासी. दुसऱ्या छायाचित्रात कथेला हात उंचावून प्रतिसाद देताना उपस्थित श्रोते. (छायाचित्र : केवल तिवारी)

जुळे सोलापूर येथील द्वारकाधीश मंदिरात जवळगेकर परिवारातर्फे आयोजीत श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञात श्री. घळसासी बोलत होते. पंचांगकर्ते मोहन दाते व श्री. घळसासी यांच्या दीपप्रज्वलनाने सुरवात झाली. यावेळी संयोजक दिलीप जवळगेकर, त्यांच्या पत्नी दिपाली जवळगेकर, त्यांचे चिरंजीव संदीप व संभाजीनगर येथे न्यायाधिश असलेली कन्या सोनाली जवळगेकर यासह द्वारकाधिश मंदिराचे विश्वस्त जयेशभाई पटेल, व्यवस्थापक दत्तात्रय पाठक आदीसह मान्यवर उपस्थित होते. सात दिवस चालणाऱ्या या कथेचे निरूपण श्री. घळसासी करणार आहेत. आज पहिल्या दिवशीचे पुष्प गंफताना श्री. घळसासी यांनी भागवतकथेचे महात्म्य सांगितले. आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत त्यांनी श्रोत्यांना भागवत आणि भारतीय परंपराबाबत माहिती दिली. कथेच्या पहिल्याच दिवशी आलेला पाऊस शुभचिन्ह असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान सकाळी वेदमूर्ती श्रीरंग कुलकर्णी यांनी ग्रंथपूजन व संहितेचे वाचन केले. यावेळी दिलीप जवळगेकर यांच्या हस्ते गणपतीपजून, संकल्प पूजन करण्यात आले. दुपारी चार वाजता १०८ सुवासिनींनी डोक्यावर कलश घेऊन जय जय रामकृष्ण हरी, विठोबा रखुमाई तसेच विठ्ठल विठ्ठल अशा भजनाच्या तालात मिरवणूक काढली.

यावेळी पाऊसधारा कोसळल्याने पावसातही त्यांनी भजनाचा आनंद घेतला. सायंकाळी साडेसहा वाजता कथेला सुरवात झाली. यावेळी श्री. घळसासी यांच्या हस्ते ग्रंथपूजन झाले. तर संयोजक दिलीप जवळगेकर, त्यांच्या पत्नी दिपाली जवळगेकर, त्यांचे चिरंजीव संदीप व संभाजीनगर येथे न्यायाधिश असलेली कन्या सोनाली जवळगेकर यांनी व्यासपीठपूजन केले. यावेळी पंचांगकर्ते मोहन दाते यांचा ब्राह्मणभूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कथेच्या शेवटी भागवताची आरती होऊन प्रसाद वाटप करण्यात आला. पाऊस असला तरी श्रोत्यांनी मोठी गर्दी केली होती.



# सोलापुरातील उद्योजकांसाठी दुबईमध्ये प्लॅटफॉर्म तयार करणार

## आ. सुभाष देशमुख यांचा मानस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

शहर आणि जिल्ह्यात अनेक प्रतिभाशाली उद्योजक आहेत. या उद्योजकांना आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यास चांगली सुविधा उपलब्ध करण्यासाठी आगामी काळात दुबईमध्ये चांगला प्लॅटफॉर्म तयार करण्याचा आपला मानस असल्याचे प्रतिपादन आमदार सुभाष देशमुख यांनी केले.

सोलापूर सोशल आणि उद्योग फाउंडेशन, सोलापूर विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आ. सुभाष देशमुख यांच्या नेतृत्वाखाली शहरातील उद्योजकांचे शिष्टमंडळ दुबई दौऱ्यावर गेले होते. त्याची माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत आ. देशमुख बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शहरातील उद्योजकांनी माहिती सविस्तर द्यावी असा विचार आला. त्या दृष्टीने दुबई दौरा पार पडला. यावेळी विविध उद्योजकांच्या भेटी झाल्या. दुबईस्थित उद्योजकांची दर्जात्मक उत्पादन देण्याच्या अटीवर सोलापूरच्या उद्योग वाढीसाठी सकारात्मकाता दाखवली आहे. दुबईमध्ये जागा घेऊन तेथे उत्पादन स्टोअर करून सोलापुरातील उद्योजकांना आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यास चांगली सुविधा उपलब्ध करण्यासाठी चांगला प्लॅटफॉर्म तयार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### दुबई बिजनेस फोरमची निर्मिती

या शिष्टमंडळाने जवळजवळ ३० ते ३२ उद्योजकांची भेट घेत विविध विषयांवर सकारात्मक चर्चा केली. या शिष्टमंडळाच्या माध्यमातून सोलापूर दुबई बिजनेस फोरम तयार करण्याचे ठरले. ज्याच्या माध्यमातून कोणत्याही उद्योजकाला सोलापुरातून दुबईला जायचे असेल तर त्याला लागणारी काही मदत असेल तर हे फोरम सर्वतोपरी मदत करेल.

यावेळी सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे संचालक अमित जैन यांनी सविस्तर माहिती दिली. शिष्टमंडळाने सेक्युरिटी बिझनेस हेड संतोष कोरट यांच्याशी सायबर सिक्युरिटीमध्ये सोलापूरचे आयटी हब कसे निर्माण करता येईल यावर चर्चा केली. जुई केमकर व जितेंन दमानिया यांच्याशी फूड सेक्टरमध्ये सोलापूरच्या कृषी उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळवण्याबाबत विचार विनिमय केला. टेक्समास - टेक्स्टाईल म र्चंट्स ग्रुपला भेट दिली. त्यांनी सोलापूरच्या उद्योगजगांशी दीर्घकालीन भागीदारी सकारात्मक प्रतिसाद दिला. इंडियन पीपल फोरमचे अध्यक्ष अबुधाबी येथील जितेंद्र वैद्य यांनी शिष्टमंडळाची सदिच्छा भेट घेतली. सोलापूरसाठी डिझाईन ऑटोमेशन क्षेत्रात तरुणांना संधी देण्याचे आश्वासन दुबईस्थित सागर कुलकर्णी यांनी दिले. दुबई स्थित धनंजय दातार हे अल अदिल ट्रेडिंगचे चेअरमन आहेत त्यांनी सोलापुरातील खाद्यपदार्थ आणि इतर पारंपारिक व दर्जेदार कृषी उत्पादने विकत घेण्याचे आश्वासन दिले. शारजाह येथे शारजाह रीसर्च टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन पार्कला भेट देत सरकारच्या संधीवर चर्चा करण्यात आली. युनिफॉर्म उत्पादनात कार्य करणारे मॅथ्यू सुभाष यांच्याबरोबर युनिफॉर्म गारमेंट उद्योग वाढी संदर्भात चर्चा झाली. या पत्रकार परिषदेला उद्यम फाउंडेशनचे सीईओ डॉ. राजेश गुराणी, युनिफॉर्म अँड गारमेंट्सचे प्रकाश पवार, प्रशांत राठी, देव जैन श्रीनिवास बासूतकर,अभिजीत मालानी, विवेक सोनथालिया, यश रंगरेज, म हेश रच्चा, अल्पेश संकलेचा, प्रदीप जैन, यश जैन, सागर गड्डम , मुरलीमोहन बुरा, आनंद झाड आदी उपस्थित होते.

## ● तडीपार असतानाही शहरात फिरणारा

# कासिम शेख एमपीडीएअंतर्गत येरवड्यात स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

तडीपार आदेशाचा भंग करून शहरात फिरणारा सराईत गुन्हेगार कासिम ऊर्फ सोहेल शफीक शेख या एमपीडीए अन्वये येरवडा कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिले. त्यानुसार पोलिसांचे एक पथक शेख यास घेऊन येरवडा कारागृहाकडे रवाना झाले आहे.



कासिम ऊर्फ सोहेल शफीक शेख (वय २८, रा. ९२, मुल्ला बाबा टेकडी, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) असे स्थानबध्द गुन्हेगाराचे नाव आहे.

कासिम हा मागील काही वर्षांपासून सातत्याने घातक शस्त्राने इच्छापुर्वक दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, जबरी चोरी, खंडणी मागणे, घरफोडी करणे, धाकदपटशा करणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, गैरकायद्याची मंडळी जमविणे, दगडफेक करणे, घातक शस्त्रांनी धमकवणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने, अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करीत आला आहे. त्याच्या विरुध्द गंभीर स्वरुपाचे ८ गुन्हे शहरात दाखल आहेत. त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे दहशत असुन त्याचे विरुध्द सामान्य नागरीक उघडपणे पोलीसांना माहीती देत नाहीत.

कासिम यास त्याच्या गुन्हेगारी कारवायापासून परावृत्त करण्यासाठी २०२२ व २०२५ म ध्ये प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या होत्या. त्यानंतरही त्याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्याने गुन्हेगारी कृत्ये चालुच ठेवली. त्याच्यावर तडीपारीचीही कारवाई करण्यात आली होती. या आदेशाचा भंग करून शहरात फिरताना मिळून आला होता. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यामुळे त्याचे गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी एमपीडीएअंतर्गत कारागृहात स्थानबध्द करण्याचे आदेश दिले.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, विजय कबाडे, सहायक आयुक्त राजन माने, प्रताप पोमण, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे, अरविंद माने, सहायक पोलिस निरीक्षक तुकाराम घाडगे, पोलिस हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले यांनी केली.

# लॉ इनफोर्स २४ ॲपमुळे सोलापूर ग्रामीण पोलिसांचे स्मार्ट पोलिसिंग

- ✔ पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून तयार झाले मोबाईल ॲप
- ✔ गेल्या दोन महिन्यात मालाविषयी व शरीराविषयीच्या गुन्ह्यांमध्ये घट

**तभा वृत्तसेवा, अमोल व्यवहारे**
**सोलापूर, दि. १९ मे -**

बदलत्या काळात पोलिसिंगची संकल्पना बदलत आहे. वाढत्या लोकसंख्येनुसार पोलिसांच बळ वाढविणे गरजेचे आहे. तरी प्रशासकीय कारणास्तव त्यामध्ये अनेक मर्यादा असल्याने पोलिसांची संख्या वाढवणे शक्य नाही. त्यामुळे पोलिसांवरील कामाचा तपाण हलका करण्यासाठी स्मार्ट पोलिसिंग चा वापर करण्याशिवाय पर्याय नाही. गुन्हेगारांची संख्यादेखील खूप वाढत चालली आहे. त्यामुळे गुन्ह्यांची संख्या वाढत असून त्याच्या तपासाचा तसेच गुन्हेगारांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस दलाला मोठी कसरत करावी लागत आहे.

हेच ओळखून सोलापूर ग्रामीण पोलिस दलाचे पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलिस विभागाच्या कामकाजामध्ये तंत्रज्ञाचा फायदा होण्यासाठी लॉ-इनफोर्स २४ हे मोबाईल





ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्मार्ट पोलिसिंगला सुरुवात केल्यामुळे गेल्या दोन महिन्यांमध्ये म ालाविषयीच्या तसेच शरीराविषयक गुन्ह्यांमध्ये घट झाली आहे.

पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी हे उच्च शिक्षित असून त्यांनी उच्च संगणकीय अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केलेले आहे. संगणकीय पूर्ण ज्ञान असल्यामुळे त्यांनी पेलिस विभागाच्या कामकाजामध्ये अद्यावत तंत्रज्ञानाचा फायदा कसा होईल याचा अभ्यास करून लॉ-इनफोर्स २४ हे मोबाईल ॲप विकसित केले आहे. सध्या सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिस दलातील प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांच्या मोबाईलमध्ये हे ॲप देण्यात आलेले असून या मोबाईल ॲपमध्ये पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना दैनंदिन कामामध्ये आवश्यक असणारी सर्व माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या मोबाईल ॲपच्या माध्यमातून पोलिसांना जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात दाखल होणारे सर्व प्रकारचे गुन्हे, रात्रगस्तची माहिती, जेलमधून सुटलेल्या आरोपींची माहिती, जिल्ह्यातून हरविलेल्या-बेपत्ता व्यक्तींची माहिती, जिल्ह्यातील मालाविषयी व शरीराविषयीच्या सर्व गुन्हेगारांची अद्यावत माहिती-त्यांच्या हालचाली, जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यांच्या हद्दीतील महत्वाच्या ठिकाणचे सीसीटीव्ही चित्रीकरण, मोबाईल टॉवरची माहिती, शस्त्र परवाना व धारकांची माहिती आदी माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे. या मोबाईल ॲपमध्ये लवकरच वाहन क्रमांक, आरटीओ परवाना, आधारकार्ड, पॅनकार्ड याबाबतची माहितीदेखील उपलब्ध करून देण्यात येणार आहे, जेणेकरून एखाद्या व्यक्तीचा किंवा वाहनाचा पोलिसांना संशय आल्यास या ॲपच्या माध्यमातून त्याची खरी माहिती पोलिसांना लगेच समजून येईल.

### ॲपची वैशिष्टये -

- ग्रामीण पोलिस दलात २३०० अधिकारी व कर्मचारी.
- प्रत्येक पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्याकडे लॉ इनफोर्स २४ ॲप.
- जिल्ह्यातील १६०० हून अधिक गुन्हेगारांवर प्रत्येक पोलिसाचा वॉच.
- जिल्ह्यातील २५०० अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे पोलिसांकडे चित्रीकरण.
- जिल्ह्यातील प्रत्येक शस्त्र परवानारधारक व त्याच्याकडील शस्त्र, दारूगोळ्याचे प्रत्येक पोलिसांकडे माहिती.
- फेब्रुवारी २०२५ पासून ॲपच्या माध्यमातून कामकाज.
- दोन महिन्यांमध्ये गुन्ह्यांमध्ये घट.

### लॉ-इनफोर्स -२४ मोबाईल ॲपच्या माध्यमातून अशाप्रकारे चालणारे काम

- ✔ **प्रथम खबर** - जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाण्यात दाखल होणाऱ्या सर्व प्रकारच्या गुन्ह्याच्या प्रथम खबर अहवालातील महत्वाची माहिती सर्व पोलिस अमंलदार यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे जिल्ह्यातील अधिकारी व अमंलदार यांना जिल्ह्यातील सर्व दाखल गुन्ह्यांची, गुन्ह्यांतील आरोपींची व चोरीस गेलेल्या मालाची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होत आहे.
- ✔ **पेट्रोलिंग** - जिल्ह्यातील पोलिस अधिकारी व अमंलदार यांना पेट्रोलिंग, रात्रगस्त करण्यासाठी पेट्रोलिंग मॅनेजमेंट या टॅबमध्ये जिल्ह्यातील सर्व वारंवार गुन्हे करणाऱ्या लोकांची माहिती व त्यांची राहण्याची ठिकाणे याबाबतची माहिती असून त्याठिकाणी जाऊन पोलिस अधिकारी व अमंलदार यांनी त्यांची तपासणी करून त्यांच्या हालचाली अद्यावत करण्यास सोपस्कर होणार आहे.
- ✔ **जेल रिलीज** - जिल्ह्यामध्ये मालाविषयी व शरीराविषयीच्या गुन्ह्यातील आरोपी जामीनावर सुटल्यानंतर त्याची माहिती मोबाईल ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे गुन्हेगारांवर प्रतिबंधक कारवाई व निगराणी ठेवण्यासाठी मदत होणार आहे.
- ✔ **हरविलेल्या व्यक्ती** - जिल्ह्यामध्ये दररोज लहान मुले, मुली, महिला व पुरुष हरवितात किंवा बेपत्ता होत असतात. ते जिल्ह्यातच किंवा इतर जिल्ह्यात भटकत/फिरत असतात. परंतु, त्याबाबतची माहिती इतरांना नसल्याने इतरांना नसल्याने त्यांचा शोध घेण्यात अडचणी येत असतात, जिल्ह्यातील हरविलेल्या व्यक्तींची माहिती पोलिस अधिकारी व अमंलदार यांना फोटोसह पुरविण्यात येत असल्याने त्या व्यक्तींचा शोध घेण्यास मदत होत आहे.
- ✔ **सीसीटीव्ही चित्रण** - जिल्ह्यातील २५ पोलिस ठाण्याच्या हद्दतील महत्वाच्या रस्त्यावरील हॉटेल, ढाबे, हॉस्पीटल, खासगी आस्थापना यांचे सुमार २५०० पेक्षा जास्त सीसीटीव्हींचे चित्रीकरणाची माहिती या ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे पोलिस विभागास गुन्हे तपास व आरोपींचा माग काढण्यासाठी तसेच संवेदनशील प्रकरणात योग्य तो निर्णय घेण्यासाठी मदत होत आहे.
- ✔ **मोबाईल टॉवर डिटेल्स** - गुन्ह्याच्या तपासामध्ये आवश्यक असणारे मोबाईल सीडीआर व त्यावरून पुढील तपास करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व मोबाईल कंपन्याचे टॉवर डिटेल्स या ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.
- ✔ **शस्त्र परवाना** - पोलिस विभागातील अधिकारी यांना पेट्रोलिंग, नाकाबंदी व तपासामध्ये अग्निशस्त्र मिळून आल्यास त्याच्या सत्यतेबाबत पडताळणी करण्यासाठी जिल्ह्यातील सुमारे ४००० परवानाधारकांची व त्यांच्याकडे असलेल्या शस्त्र व दारूगोळ्याची माहिती या ॲपमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
- ✔ **क्राईम मॅपींग** - पोलिस विभागाच्या दैनंदिन कामासाठी आवश्यक असणारे क्राईम मॅपींग, संवेदनशील ठिकाणांची माहिती यामध्ये उपलब्ध असून स्मार्ट पोलिसिंगसाठी त्याची खूप मदत होत आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



**पावसाची हजेरी; वातावरणात गारवा**

सोलापूर : शहरात सोमवारी सकाळपासून उकाडा जाणवत होता. दुपारनंतर पावसाची हजेरी लागताच वातावरणात गारवा निर्माण झाल्यामुळे उकाड्यापासून सोलापूरकर सुखावले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## ▶▶ महत्वाचे...

### मध्यप्रदेशातील तरुणाची पाकणीजवळ आत्महत्या

**सोलापूर, दि. १९ मे -**

पाकणीजवळील हॉटेल वासुदेवच्या बाजूला असलेल्या बंग लेबर कॉलनीतील खोलीत पंखाल्या लुंगीने गळफास घेऊन मध्यप्रदेशातील तरुणाने आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी रात्री आठच्या सुमारास उघडकीस आला. छोटे मानसी साक्ष (वय १८, रा. सरासडोली, देवाडा, ता. जि. दिंडोरी राज्य, मध्यप्रदेश,सध्या. बंग लेबर कॉलनी, पाकणी) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री आठच्या सुम ारास छोटे हा त्याच्या खोलीतील पंख्याला लाल रंगाच्या लुंगीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. कंपनीचे मॅनेजर संतोष उन्हाळे याने इतरांच्या मदतीने त्यास खाली उतरविले. त्यानंतर त्यास मोहोळ पोलीस ठाण्यातील हवालदार जगताप यांनी रात्री ९ वाजता रुग्णालयात बेशुध्द अवस्थेत दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील चौकीत झाली आहे.

### चिखलात दुचाकीचे चाक घसरून पडल्याने तरुण जखमी

**सोलापूर, दि. १९ मे -**

शेतातील चिखलात दुचाकीचे चाक घसरल्याने खाली पडून तरुण जखमी झाला. हा अपघात सोमवारी सकाळी ८ वाजता बार्शी तालुक्यातील राळेरास येथे घडला. तुषार लालासाहेब पंके (वय १७) असे जखमीचे नाव आहे. तुषार हा दुचाकीवर मागे बसून होता. शेतातील रस्त्यावर पावसामुळे चिखल झाल्याने तुषार बसून गेलेली दुचाकीचे चाक अचानक घसरले. यामुळे खाली पडलेल्या तुषारच्या डोक्याला जखम झाली. वैराग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून दुपारी दोनच्या सुमारास उपचाराकरीता दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मंगळवेढ्याजवळ अपघातात सोलापुरातील एकजण जखमी

**सोलापूर, दि. १९ मे -**

सोलापूर ते मंगळवेढा जाताना अज्ञात वाहनाच्या धडकेत सोलापुरातील एकजण जखमी झाला. हा अपघात सोमवारी मध्यरात्री १.३० च्या सुमारास हॉटेल सुवर्ण समोरील रस्त्यावर घडला. अकबरअली मोहमदअली मुजावर (वय ३८, रा. शनिवार पेठ, सोलापूर) असे जखमीचे नाव आहे. सोमवारी मध्यरात्री अकबरअली हे रिक्षातून मंगळवेढा येथे जात होते. मंगळवेढा जवळील हॉटेल सुवर्ण समोरील रस्त्यावर असताना, ते जात असलेल्या रिक्षाला अज्ञात चार चाकी वाहनाच्या चालकाने धडक दिली. या अपघातात अकबरअली यांच्या डोक्याला आणि उजव्या पायाला जखम झाली. मंगळवेढा येथील खासगी रुग्णालयात उपचार करून पहाटे ४.४० वाजता लियाकतअली याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### मामाच्या घरी भाच्याला सर्पदंश

**सोलापूर, दि. १९ मे -**

भाचा मामाच्या घरी राहयालया गेल्यानंतर त्याला सर्पदंश झाला. ही घटना सोमवारी रात्री १२.३० वाजता मोहोळ येथे घडली. श्रेयस बालाजी डोके (वय १३, रा. माचनूर ता. मंगळवेढा) असे मुलाचे नाव आहे. श्रेयस हा मोहोळ येथील मामाच्या घरी राहण्याकरीता गेला होता. सोमवारी रात्री १२.३० वाजता सापाने त्याच्या उजव्या हाताला दंश केला. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून मध्यरात्री २.१० वाजता उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### अंगावर थुकल्याचा जाब विचारल्याने बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १९ मे -**

बार्शी तालुक्यातील शेळगावात रविवारी रात्री ९ च्या सुमारास अंगावर थुंकल्याचा जाब विचारल्याच्या कारणातून तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी जखमीने दहा जणांविरूध्द तंक्रार दिली आहे. महेश दिलीप शिरसट (वय २५, रा. शेळगाव ता. बार्शी) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. रविवारी रात्री महेश हा गावात असताना त्याच्या अंगावर थुंकण्यात आले. याबाबत त्याने मोहन आणि मुकुंद अडसूळ या दोघांना जाब विचारला. याचा राग मनात धरून मोहन, महेश यांनी त्यांच्या इतर आठ साथीदारासह महेश यास लाथाबुकयांनी तसेच लोखंडी रॉडने मारहाण केल्याने डोक्याला व उजव्या डोळ्याजवळ जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री १२.३० वाजता हरिदास याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# अखेर दुहेरी जलवाहिनी कामाची चाचणी सुरू

### ✔ मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे-**

सोलापूर शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीच्या कामाची चाचणी अखेर आज सुरू करण्यात आली आहे. टप्प्या टप्प्यात ही चाचणी पूर्ण करण्यात येणार आहेत. दरम्यान, या कामाची पाहणी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केली.

११० किलोमीटर उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनी टाकण्याचे काम अखेर २३ महिने १५ दिवसांनी १५ मे २०२५ रोजी पूर्ण झाले. या प्रकल्पामुळे शहराला १७० एमएलडी क्षम तेचा पाणीपुरवठा होणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्मार्ट सिटीचे मुख्य तांत्रिक अधिकारी तथा आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे यांच्या माध्यमातून १२ अभियंते आणि १५० कर्मचाऱ्यांनी मिळून हे काम पूर्ण केले आहे. हे काम १ जून २०२३ रोजी हैदराबाद येथील ठेकेदार पोचमपाड कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले. या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पाहत आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी २१ महिने आहे (नोव्हेंबर २०२४ अखेर). त्यांनतर ३ महिने प्रात्यक्षिक चाचणी व ३ वर्ष देखभाल व दुरुस्ती कालावधी आहे. अखेर २३ महिने १५ दिवसांनी म्हणजेच १५ मे २०२५ रोजी पूर्ण झाले आहे. एकूण ८८२.६८ कोटी रुपयांचा प्रकल्प खर्च आहे. या प्रकल्पाचे काम येत्या २४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत पूर्ण करण्यात येणार होते मात्र विविध अडथळे आणि शेतकऱ्यांचा झालेला विरोधी यामुळे या कामात विलंब झाला होता. अखेर या महत्वपूर्ण कामाची चाचणी प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे उपस्थित होते. समांतर जलवाहिनी प्रकल्पाला वेग आला असून या प्रकल्पातील पंपगृहातील सर्व ६ पंपांची प्राथमिक पाणी उपशाची चाचणी यशस्वी झाली आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, स्मार्ट सिटी मुख्य तांत्रिक अधिकारी तथा कार्यकारी अभियंता व्यंकटेश चौबे, पोचम पाड कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक रंगाराव,सिद्धेश्वर उस्तुर्गे, नितीन अंबिगार. जीवन प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाटील, श्री हरीश व नदाफ, मक्तेदार कंपनीचे प्रकल्प अधिकारी अरुण पाटील, स्मार्ट सिटीचे सहायक अभियंता उमर बागवान, चेतन भोसले आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान यावेळी महापालिका आयुक्तांनी उजनी येथील पंप हाऊस,उजनी दुहेरी पाईप लाईन,पंपींग मशीनरी, जॅकवेल,बी.पी.टीची पाहणी केली.उजनी धरणातून थेट चॅनेल मधून जॅकवेल मध्ये पाणी सोडण्यात येईल. उजनी तेथून उजनी पंप हाऊस मधून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वरवडे येथील ब्रेक प्रेशर टँक (बीपीटी) येथून गुरुत्वाकर्षण (ग्रॅव्हिटी) पद्धतीने पाणी पुढे ८० किलोमीटर अंतरावर पाकणी, सोरेगाव पंप हाऊस येथे आणण्यात येणार आहे. दररोज १७० दशलक्ष लिटर (एम एलडी) पाणी उपसा करण्यात येणार आहे.





#### अशी होणार चाचणी प्रक्रिया

उजनी येथे आवश्यक ती तांत्रिक तयारी करण्यात येत आहे. एकदम सर्व पंप सुरुवातीला चालू करता येणार नाही. पहिला एक पंप सुरू करण्यात येईल. त्यानंतर वॉश आऊटला पाणी आल्यानंतर दुसरा पंप चालू करण्यात येईल. दोन पंपावर शेवटपर्यंत पाणी येईल. वरवडे टोलनाक्यावर पाणी पडले की तिथून पुढे लांबोटी सिना नदीत वॉश आऊट घेतले जाणार आहे. पुढे कॅनॉलला वॉश आऊट घेण्यात येईल. त्यानंतर पुढे पाकणी येथे वॉश आऊट घेतल्यानंतर सोरेगाव येथे पाणी पोहोचणार आहे. अशा पद्धतीने ही चाचणी होईल, असेही महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

#### अंतिम पंपाची चाचणी लवकरच करण्यात येईल : आयुक्त

उजनी धरणावर उभारलेल्या नवीन पंपगृहात ११५० अश्वशक्ती क्षमतेचे सहा पंप बसविण्यात आले असून आज ११५० अश्वशक्ती क्षमतेचा एका पंपावरून चाचणी सुरु करण्यात आली. या एका पंप द्वारे सोलापूरपर्यत किती वेळेत किती एमएलडी पाणी पोहोचणार आहे.याची चाचणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर टप्या टप्याने सर्व पंप सुरु करण्यात येणार आहेत. अंतिम पंपाची चाचणी लवकरच करण्यात येईल, अशी महिती आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

#### एका पंपावरून चाचणी सुरू

उजनी धरणावर उभारलेल्या नवीन पंपगृहात ११५० अश्वशक्ती क्षमतेचे सहा पंप बसविण्यात आले असून आज ११५०आश्वशक्ती क्षमतेचा एका पंपावरून चाचणी सुरु करण्यात आली.उजनी पंप हाऊस मधून ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या वरवडे येथील ब्रेक प्रेशर टँक (बीपीटी) पर्यंत पाणी पोहोचणार आहे. साधारणता: चार दिवसात ही चाचणी पूर्ण करण्यात येणार आहे,अशी माहिती मुख्य तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे यांनी दिली.

# अग्निशामक दल प्रमुख साळुंखे देणार महापालिका आयुक्तांना अहवाल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल कारखान्याला लागलेल्या भीषण आगी प्रकरणी महापालिका अग्निशामक दलाचे अधीक्षक राकेश साळुंखे हे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना अहवाल सादर करणार आहेत.

अक्कलकोट रोडवरील एमआयडीसी येथील सेंट्रल इंडस्ट्री टेक्स्टाईल कारखान्याला आग लागल्याची दुर्घटना रविवारी पहाटे सुमारास घडली होती. तब्बल १४ तासानंतर महापालिका अग्निशामक दलाने ही आग आटोक्यात आणली. या आगीत मालक आणि कामगार कुटुंबातील एकूण ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला. या अग्नीतांडवात वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली. या दुर्घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.आगीचे स्वरूप मोठे असल्याने सोलापूर अग्निशामक दलातील सर्व गाड्या घटनास्थळी पाचारण करण्यात आल्या. आणखी मदतीसाठी अक्कलकोट, पंढरपूर आणि बार्शी नगरपरिषदेच्या अग्निशामक दलाच्या गाड्या बोलविण्यात आल्या होत्या. त्याचबरोबर एनटीपीसी आणि चिंचोळी एमआयडीसी येथील अग्निशाम क दलाच्या गाड्याही मागवून घेण्यात आल्या. सुमारे १० अग्निशमन दलाच्या गाड्यांनी सातत्यपूर्ण आग विझवण्याचे शर्तीचे प्रयत्न युद्ध पातळीवर करण्यात आले होते. एमआयडीसी परिसरात अशा दुर्घटना घडू नये यासाठी शासकीय यंत्रणांनी दक्ष राहणे गरजेचे आहे. रस्ते, लाईटसह मूलभूत सोयी सुविधा आवश्यक आहे. त्याचबरोबर एमआयडीसी प्रशासनाने आणि कारखानदारांनीही आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे, अशा प्रतिक्रिया उमटल्या होत्या. युद्ध पातळीवर अग्निशामक दलाच्या कर्मचाऱ्यांनी आग विझवण्याचा शर्तीने प्रयत्न केला. सोलापूर महापालिकेचे चीफ फायर ऑफिसर (अधीक्षक) राकेश साळुंखे आणि सम ीर पाटील, पंकज चौधरी, बाबुलाल नदाफ, साईनाथ मिसाळ, गौतम आव्हाड हे कर्मचारी जखमी झाले. दरम्यान, एमआयडीसी क्षेत्रात हा कारखाना आहे. येथील सर्व प्रशासकीय अधिकार एमआयडीसी प्राधिकरणाला आहेत. महापालिका क्षेत्रात हा कारखाना येत असल्याने आग विझवण्यासाठी सेवा पुरवली आहे. दरम्यान, या आगी प्रकरणी आयुक्त ओम्बासे यांना अग्निशामक दलाचे प्रमुख साळुंखे हे अहवाल सादर करणार आहेत.

#### या मुद्द्यांच्या राहणार अहवालात समावेश : साळुंखे



अक्कलकोट रोड एम आयडीसीतील टॉवेल कारखान्यासलागलेल्या आगी प्रकरणात काय त्रुटी होत्या? काय अडचणी आल्या? कारखाना परिसरात मोकळी जागा ठेवली नसल्याने गाड्या ये- जा करण्यात अडचणी आल्या. कारखान्याच्या परिसरात मोकळ्या जागेत इतर सामान ठेवण्यात आले होते. यामुळे आत जाणे अडचणीचे ठरले. शेवटी शिडी लावून आत जावे लागले. कारखान्यामध्ये वास्तव्य रहिवास करता येत नाही. यासह विविध मुद्द्यांचा या अहवालात समावेश राहणार आहे. हा अहवाल आयुक्त यांना सादर करण्यात येणार आहे, माहिती अग्निशामक दलाचे प्रमुख राकेश साळुंखे यांनी दिली.



# आगीसंदर्भात पोलीस आयुक्त मागवणार अभिप्राय

### ▶ एमआयडीसी पोलिसांकडून कारखानदाराची आठवड्याभरात बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील सेंट्रल टेक्सस्टाईल कारखान्यात लागलेल्या आगीमध्ये होरपळून आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तरी ती आग कसा लागली याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी औद्योगिक सुरक्षा महामंडळ, विजवितरण व अग्निशमन विभागास पत्र पाठवून अभिप्राय मागवून घेण्यात येणार आहे, अशी माहिती एमआयडीसी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी दिली.

कारखान्यामध्ये मन्सुरी व बागवान कुटुंबातील आठ जणांचा मृत्यू झाला आहे. औद्योगिक क्षेत्रातील या कारखान्यामध्ये राहण्याची परवानगी आहे का?, बांधकाम परवाना, विद्युत परवाना, फायर ऑडीट या सर्व बाबींची माहिती घेतली जाणार आहे. तसेच अशा घटना पुन्हा होवू नये, योग्य ती खबरदारी घ्यावी, यासाठी एम आयडीसी-मध्ये असणाऱ्या सर्व कारखानदाराची आठवड्याभरात एमआयडीसी पोलिसांकडून बैठक बोलावण्यात येणार आहे.



#### एमआयडीसी पोलिसांकडून कारखान्यातील जळीत स्थितीचा पंचनामा...

एमआयडीसी पोलिसांकडून सोमवारी सकाळी सहायक पोलिस आयुक्त पोमण, पोलिस निरीक्षक प्रमोद वाघमारे, पोलिस निरीक्षक गाढवे, पोलिस निरीक्षक बनसुडे आदींनी पाहणी केली. ही पाहणी केल्यानंतर पोलिस उपनिरीक्षक इंगळे व पोलिस अंमलदार सुर्वे व कांबळे यांनी कारखान्यामध्ये जळीत स्थितीचा पंचनामा केला.

#### ऑक्सीजन न मिळाल्याने आगीत होरपळून मृत्यू

कारखान्यामध्ये होरपळून मयत झालेल्यांचे शवविच्छेदन करण्यात आले आहे. त्यामध्ये सदर व्यक्तींना श्वास घेताना ऑक्सिजन मिळाला नाही व श्वसनाद्वारे शरिरात विषारी वायू गेल्याने बे शुध्द पडले व आगीत होरपळून किंवा जळून मयत झाली असावीत असा शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात सांगितले आहे.

# आगीच्या दुर्घटना टाळण्यासाठी तात्काळ उपाययोजना करा : खा. प्रणिती शिंदे

### उपाययोजना करण्याची मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

सोलापूरातील अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीम धील टॉवेल कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत आठ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी घडली. या पार्श्वभूमीवर खासदार प्रणिती शिंदे यांनी शासन आणि महानगरपालिका प्रशासनाला धारेवर धरले आहे. एमआयडीसी भागात विजेच्या कमी-जास्त दाबामुळे शॉर्ट सर्किट होऊन वारंवार लागणाऱ्या आगींच्या घटनांकडे प्रशासन गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप त्यांनी केला. या भागातील अपुऱ्या पायाभूत सुविधा, रस्त्यांची दुरवस्था आणि अग्निशामक दलाला येणारे अडथळे यामुळे आगीचे रौद्ररूप रोखण्यात अपयश येत असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. भविष्यात अशा दुर्घटना रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना पत्र लिहून केली आहे.



सोलापुरातील टॉवेल कारखान्याला लागलेल्या या आगीत मंन्सुरी व बागवान कुटुंबातील आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला. ''या दु:खद घटनेत मृत्यूमुखी पडलेल्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली वाहते. त्यांच्या कुटुंबियांना या दुखातून सावरण्याची शक्ती ईश्वर द्यावी,'' अशा शब्दांत खासदार शिंदे यांनी शोक व्यक्त केला.

● **विजेच्या समस्येमुळे वारंवार आगी :** अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांना एकाच वीज उपकेंद्रातून नागरी आणि औद्योगिक वसाहतींसाठी वीजपुरवठा केला जातो. यामुळे विजेचा दाब कमी-जास्त होऊन शॉर्ट सर्किटच्या घटना घडतात, ज्यामुळे आग लागते. ''यापूर्वीही अशा अनेक घटना घडल्या आहेत, पण जीवितहानी झाली नव्हती. आज मात्र आठ जणांचा बळी गेला. तरीही शासन आणि प्रशासनाचे डोळे उघडणार आहेत की नाही?'' असा सवाल खा. शिंदे यांनी उपस्थित केला. या भागातील विद्युत समस्येवर उपाय म्हणून खासदार शिंदे यांनी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीसोबत कारखानदारांची बैठक घेतली होती. त्यातून विद्युत सोयी-सुविधांचा विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करून शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात आला. मात्र, ऊर्जा विभागाकडून याला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. ''ऊर्जा खात्याच्या सचिवांशी संपर्क साधल्यानंतरही मंजूर झालेला नाही. शासनाने याला तात्काळ मंजुरी द्यावी,'' अशी मागणी त्यांनी केली.

● **अद्यावत अग्निशामक दलाचे केंद्र गरजेचे... :** या भागात आग लागण्याच्या घटनांना तात्काळ प्रतिसाद देण्यासाठी खासदार शिंदे यांनी महानगरपालिकेकडे पाठपुरावा करून तात्पुरत्या स्वरूपात अग्निशामक दलाची गाडी तैनात करण्याची व्यवस्था केली होती. तरीही, या आगीने रौद्ररूप धारण केले. ''प्राथमिक सोय असतानाही आग इतकी भयंकर कशी झाली, याची चिंता वाटते,'' असे त्या म्हणाल्या. तसेच, रस्त्यांची दुरवस्था यामुळे अग्निशामक गाड्यांना घटनास्थळी पोहोचण्यास अडथळे येतात, ज्यामुळे आग मोठ्या प्रमाणात पसरते, असे त्यांनी नमूद केले.

● **विधानसभेत उठवला आवाज, तरीही दुर्लक्ष... :** खासदार शिंदे यांनी विधानसभेत वारंवार आवाज उठवला आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत त्यांनी अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीतील आगींच्या घटनांकडे लक्ष वेधले होते. यासाठी डी.पी.डी. सी. २०२३-२४ च्या निधीतून अग्निशामक केंद्र उभारण्यासाठी १ कोटी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून महानगरपालिकेकडे वर्ग केला होता. ''मात्र, हे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. यावरून मनपा प्रशासनाचे गांभीर्य दिसून येते,'' अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

● **पायाभूत सुविधांसाठी विशेष निधीची गरज... :** अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहतीमधील रस्त्यांची दुरवस्था हा आणखी एक गंभीर मुद्दा आहे. खासदार शिंदे यांनी त्यांना मिळणाऱ्या मर्यादित निधीतून रस्त्यांची कामे करण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र, रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर असल्याने शासनाच्या उद्योग किंवा नगरविकास विभागाने येथील पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यासाठी विशेष निधी द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच, ऊर्जा विभागाने विद्युत सुविधांचा मंजूर करून त्यासाठी तात्काळ निधी उपलब्ध करावा, असेही त्यांनी पत्रामध्ये नमूद केले आहे.

### हायवा ट्रक पायावरून गेल्याने वृध्दाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे -**

मार्डी गावातील बस स्टॅन्ड चौक येथे बसले असता पायावरून हायवा ट्रकचे चाक गेल्याने जखमी झालेल्या वृध्दाचा मृत्यू झाला. हा अपघात रविवारी रात्री ११.३० वाजता घडला.

महादेव शामराव जगताप (वय ७२, रा. मार्डी ता. उ. सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. रविवारी रात्री जेवण उरकून महादेव हे गावातील बसस्टॅन्ड चौकात बसले होते. साधारण ११.३० च्या सुमारास तेथून वळणा-या हायवा ट्रकचे चाक महादेव यांच्या पायावरून गेल्याने ते जखमी झाले. त्यांना रुग्णवाहिकेतून उपचाराकरीता रात्री १२.३० वाजता पुतण्या आप्पासाहेब याने दाखल केले. परंतु उपचारादरम्यान सोमवारी सकाळी ६.१५ वाजता त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी ११२१

**दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडू जैसा ।**
**तो माझ्या ठायी तैसा । मी तयामाजीं ।।**

योगाने माणसाचे मन शुध्द आणि स्थिर होते. मनाच्या शुध्दीमुळे व स्थैर्यामुळे तो सर्वांकडे समदृष्टीने पाहतो. सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी आपणच आहोत व सर्व प्राणीमात्र आपल्या ठिकाणी आहेत. अशा दृष्टीने असा योगी पाहत असतो.. अर्थात आपल्यासह सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराचे अंश असल्याचे योगी पाहातो. प्राणिमात्राच्या दिखाऊ भेदाने त्याला वेगळेपणाचे अस्तित्व जाणवत नाही. योगी सर्व चराचरात समता, एकात्मता कशी पाहतो किंवा तो आपल्या पासून ईतरांना व ईतरापासून आपणाला वेगळे कसे समजत नाही, हे सांगतांना भगवंत म्हणाले, दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडू जैसा । तो माझ्या ठायी तैसा । मी तयामाजीं ।। अर्थात, दिवा आणि प्रकाश यांच्यामध्ये ज्या प्रकारची एकतेची भावना असते, त्याप्रमाणे तो माझ्याठिकाणी आणि मी त्याच्याठिकाणी असतो. दिवा आणि प्रकाश वेगळे असत नाहीत.



त्या दोघांना वेगवेगळे करता येत नाही. पाण्यापासून ओलावा किंवा ओलाव्यापासून पाणी वेगळे नसते तसे एकमेकांचे अस्तित्व योगामुळे एकरुपपणाचे निर्माण होते. अर्थात, भिन्नता किंवा भेद उरत नाही.

वस्त्रामध्ये सर्वत्र एकच धागा असतो. धागा केवळ उभा, आडवा लावल्याचे दिसते. धागा, उभा-आडवा जरी लावला तरी तो एकच असतो. तसेच एकात्मतेच्या दृष्टीने पाहिल्यास या जगरुपी वस्त्रातील सर्व प्राणीमात्ररुपीधागे एकच असल्याचे दिसते. या सर्व धाग्यांनी मिळून एकच वस्त्र बनते. या वस्त्रात, धाग्यात एकच परमात्म शक्ती आहे. भिन्नता नांवाचा प्रकारच इथे असत नाही. प्रत्येक प्राणीमात्रात एकच आत्मा आहे. शारिरीक दृष्टया भिन्न दिसत असले तरी प्रत्यक्षात ते एकच असल्याचे योगी समजतो. त्यामुळे त्याला लहान-मोठा, उच्च-नीच, स्त्री-पुरुष, गरीब- श्रीमंत असा कसलाच भेद दिसत नाही. तो समतेचे, एकात्मतेचे चालते-बोलते व्यासपिठच झालेला असतो. सर्व लोक जर असे समतेचे व्यासपीठ झाले तर आपसात भांडण-तंटे, वैर होण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. जेव्हा भांडण तंटे, वैर, वादविवाद संपुष्टात येतील तेव्हा चोहीकडे सुख समाधान, शांती अनुभवायला मिळेल. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणा-या महात्म्यांची शांतीची, समतेची अपेक्षा आपल्या वर्तनातुन आपण पुर्ण करायला हवी आहे. योगी हा देहधारी असला तरीही त्याने देहाभिमान, मी पणा टाकुन दिला असल्याने त्याच्याकडे विषयवासना, आसक्ती अजिबात उरत नाहीत. ज्याकडे विषयवासना, आसक्ती नसते त्याला आत्मसुखाची, समतेची प्रचिती येत असते. अर्जुनाने स्वत:च्या ठिकाणी विश्व पहावे व सा-या विश्वाच्या ठिकाणी स्वत:चे रुप पहावे असे भगवंतांना वाटते. अर्जुन जेव्हा स्वत:ला विश्वाच्या ठिकाणी व विश्वाला स्वत:च्या ठिकाणी पाहिल तेव्हा त्याला फक्त साम्य दिसेल. या जगात साम्यापलीकडे मिळविण्यासारखे काही शिल्लक नाही. साम्य हेच अत्यंत श्रेष्ट असे साध्य असल्याचे भगवंत म्हणतात. ही साम्यवस्था आपणाला प्राप्त होऊन आपण आत्मसुखी होण्याचा व ईतरांना सुखी ठेवण्याचा प्रयत्न करावा. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : मंगळवार** | **करण - बालव (१७.२७)** |
| **दि. २० मे २०२५** | **दिनविशेष - कालाष्टमी** |
| **विक्रम संवत् २०८१** | **....राहू काल....** |
| **शके - १९४७** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **संवत्सर - विश्वावसू** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **मास - वैशाख** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **कृ. अष्टमी (२८.५५)** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **ऋतु - वसंत** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **नक्षत्र - धनिष्ठा (१९.३१)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **योग - ऐंद्र (२६.४९)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** आर्थिक फायदा झाल्यामुळे आनंदी रहाल. व्यापारात प्रगती होईल. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**वृषभ :** मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

**मिथुन :** कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल.

**कर्क :** दुसऱ्याची नक्कल करू नका. विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल. सुख समृध्दीत वाढ होईल.

**तुळ :** एकाच वेळी नोकरी आणि घर या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागल्याने तुमच्यावर एकप्रकारचा दबाव येईल. नोकरीत बडती मिळण्याची शक्यता. प्रवासाचा योग आहे.

**वृश्चिक :** घरामध्ये छोट्या समरंभाच्या निमित्ताने प्रियजनांची गाठभेट होईल. अपूर्ण कामे पूर्ण होण्याचे मार्गावर.

**धनु :** मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**मकर :** हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य. मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे.

**कुंभ :** नौकरीतमध्ये आपले महत्व वाढणार आहे. विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मीन :** आपल्या मनासारखे व्यवहारात यश मिळणार आहे. सज्जन लोकांच्या मदतीमुळे आपल्या यशात भर पडेल. कोणाचाही राग करू नका.

# रेल्वे विभागाने वाचवले साडेतीन कोटी

## पर्यावरणपूरक वीज वापर पद्धतीचा फायदा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

मध्य रेल्वेने २०२४-२०२५ मध्ये हेड-ऑन जनरेशन (एचओजी) ही एक आधुनिक वीज पुरवठा प्रणालीचा वापर करून १७०.७ कोटी रुपयांची बचत केली. तसेच यामुळे सोलापूर विभागाने ३.६८ कोटी रुपये वाचवले आहेत.

मध्य रेल्वेने, ऊर्जा कार्यक्षमता आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी २०२४-२०२५ या आर्थिक हेड-ऑन जनरेशन (एचओजी) ही एक आधुनिक वीज पुरवठा प्रणाली आहे. यामध्ये लोकोमोटिव्हद्वारे ओव्हरहेड इलेक्ट्रिक लाईन्समधून (ओएचई) थेट वीज घेतली जाते. वातानुकूलित प्रकाशयोजना आणि इतर विद्युत गरजांसाठी रेल्वेच्या डब्यांमध्ये ही वीज वापरली जाते.

पारंपारिक एंड-ऑन जनरेशन (ईओजी) पद्धतीच्या जागी ही नाविन्यपूर्ण प्रणाली वापरल्यने ही बचत झाली आहे. सदरची प्रणाली रेल्वेला जोडलेल्या डिझेल चालित जनरेटर कारवर अवलंबनू असते. रेल्वेच्या दोन्ही टोकांना जनरेटर कारची आवश्यक असते. एचओजी लोकोमोटिव्ह मधून अखंडपणे वीज घेते. ज्यामुळे जनरेटर कारची आवश्यकता कमी होते. पर्यायाने डिझेलचा वापर कमी हानिकारक उत्सर्जन कमी होते.

**विभागनिहाय बचत**
- मुंबई विभाग - १३६.१६ कोटी
- पुणे विभाग - २२.३१ कोटी
- नागपूर विभाग - ६.९६ कोटी
- सोलापूर विभाग - ३.६८ कोटी
- भुसावळ विभाग - १.५९ कोटी

# आंतरराष्ट्रीय योग दिन; पूर्व नियोजनाची रविवारी बैठक

## 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' यावर्षीची संकल्पना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १९ मे-**

दरवर्षी २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जातो. यावर्षीचा ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन जिल्ह्यात साजरा करण्यासाठी केंद्रीय संचार ब्यूरो आणि योग दिवस समन्वय समिती यांची भुतडा भवन येथे पूर्व नियोजनाची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीमध्ये यावर्षीचा ११ वा योग दिन हरिभाई देवकरण प्रशालेच्या मैदानामध्ये आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. केंद्रीय आयुष मंत्रालयाच्या निर्देशाप्रमाणे सहभागी विद्यार्थी, युवा-युवती, अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकाना ४५ मिनिटांचा सामान्य योग प्रोटोकोल प्रमाणे योगाभ्यास घेण्यात येणार आहे. योग शिक्षकांसाठी दिनांक २५ मे २०२५ रोजी सकाळी ७ ते ९ यावेळेत शिवस्मारक, नवी पेठ येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे.

योगाचा प्रचार- प्रसार आणि जास्तीत जास्त नागरिक योग महोत्सव मध्ये सहभागी व्हावे या उद्देशाने दिनांक १८ जून रोजी सकाळी ७ वाजता दमाणी नगर येथून योग दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. योग दिनाच्या एक दिवस आधी सायंकाळी ५ वाजता हरीभाई देवकरण प्रशालेच्या मैदानावार योगाभ्यासाची रंगीत तालीम घेण्यात येणार आहे.

यावर्षीच्या योग महोत्सवामध्ये जिल्हयातील पतंजली योग पीठ, योग असोसिएशन, योग सेवा मंडळ, विवेकानंद केंद्र, योग साधना मंडळ, भारतीय योग संस्था, हार्टफुलनेस इन्स्टिटयुट, गीता परिवार आणि सर्वोदय योग साधना मंडळ सहभागी असणार आहेत.

सदर बैठकीला केंद्रीय संचार ब्यूरोचे सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव, योग दिवस समन्वय समितीचे संयोजक मनमोहन भुतडा, विवेकानंद केंद्राचे नंदकुमार चितापुरे, महेश गोंजारी, रवी कंटली, योग असोसिएशनचे दत्तगुरु वेदपाठक, माईंड फुल हॅपिनेस संतोष सासवडे, योग सेवा मंडळाचे अध्यक्ष सुनील आळंद, सुभाष जोशी, स्मिता शहा, भारतीय योग संस्थेचे दत्तात्रय चिवडशेट्टी, बाळासाहेब पाटील, सर्वोदय योग मंडळाचे अशोक गरड, जीवन अवताडे आणि योग साधना मंडळाचे बाबुशेठ सोनी उपस्थित होते.

## सिद्धेश्वर तलावातील मासे मृत्युमुखी प्रकरणी आज बैठक

**सोलापूर, दि. १९ मे-**

ग्रामदैवत सिद्धरामेश्वर तलावातील पाण्याच्या प्रदूषणामुळे वारंवार मासे, कासव मृत्युमुखी पडत असल्याच्या घटना घडत आहेत. त्या पार्श्वभूमीवर आज मंगळवारी २० मे रोजी बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. या बैठकीसाठी महापालिकेचे संबंधित अधिकारी यांच्या समवेत ही बैठक होणार आहे. गेल्या महिन्याभरापासून सिद्धेश्वर तलावामध्ये प्रदूषित पाणी मोठ्या प्रमाणात मिसळत असल्याने पाण्यातील ऑक्सिजन प्रमाण कमी होऊन मासे, कासव मृत्युमुखी पडत आहेत. नुकतेच जलतज्ञ डॉ. राजेंद्रसिंह यांनी सिद्धेश्वर तलावाची पाहणी करून नाराजी व्यक्त केली होती. पाणी प्रदूषित झाल्याने ऑक्सिजन कमी होऊन या जलचर प्राण्यांनी गुदमरून मरत आहेत.




# आश्रम शाळेतील शिक्षकांचे समायोजन स्थगित करावे

## शिक्षक भारतीचे आमरण उपोषण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत चालू असलेल्या विभाजन प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी आश्रम शाळेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे विविध मागण्यासाठी १९ मे रोजी शिक्षक भारतीच्या वतीने जिल्हाध्यक्ष सुजितकुमार काटमोरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांनी पुनम गेट जिल्हा परिषद समोर आमरण उपोषण केले. तसे निवेदन संघटनेच्या सहाय्यक संचालक सोलापूर यांना निवेदन दिले. यावेळी विकास दसाडे, जिल्हाप्रमुख विजय काशीद, जिल्हा सचिव शुक्राचार्य, धवन व किरण सरकाळे जिल्हा उपाध्यक्ष, प्रियदर्शनी आवटे, महिला आघाडी प्रमुख बसवंत बगले जिल्हा कार्याध्यक्ष, चंद्रकांत शिंदे कोषाध्यक्ष, अली साहेब मुल्ला जिल्हा संघटक, विजयकुमार गुंड ,शरद पवार, योगेश टोणपे, शरीफ चिखली, अमोल तावस्कर, राजकुमार देवकते, सुरेश कनमुळसे, मायप्पा हाके आदी सदस्य उपस्थित होते.

**या आहेत विविध मागण्या-**

जिल्ह्यात अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांची यादी तयार करताना नव्याने मान्यता मिळालेल्या शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्यात यावे व त्यांच्या जागी सेवा जेष्ठतेनुसार जुन्या अतिरिक्त शिक्षकांना कायमस्वरूपी समायोजन करण्यात यावे. अतिरिक्त शिक्षकांचे इतर मागास बहुजन कल्याण विभागामध्ये कायमस्वरूपी समायोजन शक्य नसल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये करण्यात यावे. यावर्षीची समायोजन प्रक्रिया रद्द करावी व सर्व अतिरिक्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देऊन त्यांना सेवानिवृत्ती पर्यंत मूळ शाळेतच कायम ठेवावे.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींसाठी शिक्षणाची मोफत संधी

**सोलापूर, दि. १९ मे-**

भारतीय जैन संघटना (बीजेएस) यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही, महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील मुला-मुलींना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रवेश देऊन बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्णतः मोफत दिले जाणार आहे. तसेच भोजन, निवास, वैद्यकीय व इत्यादी सुविधा शिक्षण पूर्ण होण्यापर्यंत मोफत उपलब्ध करण्यात येतील. यासाठी इयत्ता ५ वी व ६ वी मध्ये १०० मुला-मुलींना प्रवेश देण्यात येणार असून, दि. ७ जूनपर्यंत अर्ज वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्प, पुणे-नगर रोड, बकुरी फाटा, पुणे येथे सादर करण्यात यावे. यासाठी आवश्यक कागदपत्र व पालकांचे संमती पत्र अनिवार्य असून, इतर माहितीसाठी बीजेएस प्रकल्प व्यवस्थापक सुरेश साळुंके ९४२३०७४२३४, वस्तीगृह व्यवस्थापक, साईनाथ रापतवार ९९७०००१०११, प्रमुख अधीक्षक, रामदास औटे ९४२०७८६२१२, सविता सुतार ९८६०१०५३२६ यांच्याशी संपर्क साधावा. बीजेएसचे संस्थापक शांतिलाल मुथ्था हे गेली ४० वर्षांपासून सामाजिक कार्य अविरत करीत आहेत. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुला-मुलींना ही सुविधा प्राप्त करून देण्यासाठी बीजेएसचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकिशोर साखला, मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैनसह संपूर्ण बीजेएसची टीम कार्यरत आहे. राज्यातील आत्महत्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांनी बारावी पर्यंतच्या शिक्षणाकरिता आमच्याकडे सोपवावी, असे अध्यक्ष केतन शहा यांनी आवाहन केले.

# भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**



सोलापूर शहर भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर यांच्या शहरअध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल माजी सभागृह नेता सुरेश पाटील यांचे चिरंजीव युवा नेता बिपिन पाटील यांच्या नेतृत्वाखाली रविवारी शिवस्मारक येथे सोलापूर रोहिणी तडवळकर यांची भारतीय जनता पार्टीचे नूतन शहरअध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी युवा नेता बिपिन पाटील, रेवन वग्गूर, मनोज टींगी, जेमिनी नवरात्र महोत्सव मंडळाचे अध्यक्ष पवन तगारे, अविनाश सोल्लगी, सिद्राम हळ्ळी, लक्ष्मण पुजारी, श्रीशैल हिरेमठ, यशवंत पुराणिक, सचीन म्हेत्रस, प्रवीण डोळे, प्रकाश पुजारी, विजय पुजारी, मल्लू कोळी, कुमार शिंरसगीकर, नागू कोळी, राहुल सकांराम, देवराज पाटील, बसवराज करली, विनायक पाटील, जंबण्णा होसमणी, लिगंराज पाटील, सुरेश मंदकल, नवीन गोटीमुकुल, संतोष कोळी, आकाश कोळी, लिंगराज मासरेड्डी, नितीन शेजूळ, अफसर नालवार, सिद्रामं मंदकल, विजय कोळी, अंबादास पाटील, सिद्राम गंधाळकर, चिदानंद मासरेडी, अमर माडा, अभिषेक भाईकट्टी, विनायक डोळे, कुमार कामूर्ती, महेश गोरकल, प्रविण कैरमकोंडा, रवि मंदकल, रेडी गोरकल, प्रशांत बाकळे, शिवा मंदकल,आदी बिपीन पाटील समर्थक बहुसंख्येने उपस्थित होते.

# निराळे वस्तीत वारकरी संस्कार शिबिराची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

येथील निराळेवस्तीत श्री संत सावता महाराज वारकरी मृदंग वादन प्रशिक्षण संस्थेच्या वारकरी संस्कार शिबिराचा सांगता समारंभ अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर इंगळे महाराज यांच्या हस्ते शिबिरामध्ये सहभाग घेतलेल्या बाल वारकऱ्यांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात हभप सुधाकर महाराज इंगळे म्हणाले, आत्ताच्या युगामध्ये अशा संस्कारक्षम शिबिराची प्रामुख्याने गरज होती. कोणत्याही मोबदल्याचा विचार न करता मोफत वारकरी प्रशिक्षण देण्यात ही संस्था अग्रगण्य ठरली आहे. महाराष्ट्रभर मी कीर्तनाच्या माध्यमातून फिरतो पाहतो असे संस्था कुठेही पाहण्यास मिळाली नाही. असे गौरवोद्गार इंगळे महाराज यांनी काढले. प्रारंभी कार्यक्रमात हभप सुधाकर इंगळे महाराज, ऑक्टो पॅडचे प्रशिक्षक श्याम नाईकनवरे, नंथकुमार येणे, बळीराम जांभळे, प्रशिक्षक अनिकेत जांभळे यांच्याहस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास ज्ञानेश्वर सपाटे, शेखर फंड, संजय केसरे, चंद्रकांत जांभळे प्रामुख्याने यांची उपस्थिती होती. महिनाभरामध्ये ज्या मुलांनी विशेष प्राविण्य मिळवले अशा विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. दरम्यान, या महिनाभरात विशेष सेवा करणाऱ्या सर्वांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित प्रशिक्षणार्थी मुलांनी गीतेचा बारावा अध्याय व पंधरावा अध्याय पठण केला. कार्यक्रमाचे समारोप श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजकृत पसायदानाने करण्यात आले. कार्यक्रम संपन्न करण्यासाठी तुकाराम लोखंडे, समर्थ कांबळे, स्वराज केसरी, आर्यन खंदारे, अंजली लोखंडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाची प्रस्तावना व आभार बळीराम जांभळे यांनी मानले. या शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**प्राविण्य मिळवलेल्या या विद्यार्थ्यांचा सन्मान**

**गीता पठण :** शर्वरी भोसले, कार्तिकी काशिद, प्रगती शिंदे, शौर्य भोसले, प्रथमेश ढेरे, सोहम शिंदे.

**मृदंग वादन :** श्रावणी काकडे, श्रेया लोहकरे, माधुरी सोमदळे, प्रणव पवार, श्रेयस गात, ओम व्यवहारे, समर्थ कांबळे, स्वराज केसरे, तेजस सुर्वे, अथर्व कोकरे, राजवीर जांभळे, अंजली लोखंडे, प्राची यमगवळी, भक्ती परदेशी.




# मधमाशी संवर्धन काळाची गरज

दरवर्षी २० मे हा जागतिक मधमाशी दिवस म्हणून जगभरात साजरा केला जातो. या दिवसाच्या निमित्ताने मधमाशी पालनाविषयी जागरूकता आणि मधमाशीपासून मिळणाऱ्या उत्पादनांचे महत्त्व लोकांमध्ये पटवून दिले जाते.

जगभरातील नागरिकांची अन्नाची गरज भागविण्यासाठी अप्रत्यक्षपणे मधमाशा अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. मधमाशीपालनातून मधाचे उत्पादन तर मिळतेच पण त्यासोबत विविध पिकांच्या परागसिंचनामध्ये मधमाश्या महत्त्वाच्या ठरतात. मात्र, वाढते शहरीकरण, हानिकारक रासायनिक कीडनाशकांचा अमर्यादित वापर, प्रदूषण आदी कारणांमुळे मधमाश्यांच्या वसाहती आणि संख्या दिवसेंदिवस वेगाने कमी होत चालली आहे. याचा एकूण परिणाम परागीभवन प्रक्रियेवर होऊन पीक उत्पादनात घट होताना दिसून येते. त्यामुळे भविष्यात वाढणाऱ्या लोकसंख्येची अन्नाची गरज लक्षात घेऊन पीक उत्पादकता वाढीसाठी मधमाश्यांचे संवर्धन ही काळाची गरज बनली आहे.

आधुनिक मधमाशीपालनाचे जनक म्हणून 'एन्टोन जान्सा' यांना ओळखले जाते. त्यांचा जन्म २० मे १७३४ मध्ये एका गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब पारंपरिक पद्धतीने मधमाशीपालन व्यवसाय करत होते. त्यामुळे घरी मधमाशीपालनाविषयी कायम चर्चा होत असे. त्यातून एन्टोन जान्सा यांची मधमाशीपालनाबाबतची आवड अधिकच वाढली.



त्यानंतर १७६९ मध्ये त्यांनी मधमाशीपालक म्हणून पूर्णवेळ काम करण्यास सुरुवात केली. त्यांनी विविध ठिकाणी फिरून लोकांमध्ये मधमाश्यांचे महत्त्व पटवून देण्यास सुरुवात केली. एन्टोन जान्सा यांच्या कार्याची आठवण म्हणून दरवर्षी 'जागतिक मधमाशी दिवस' साजरा केला जातो. मानवी जीवनातील मधमाश्यांचे महत्त्व सर्वांपर्यंत पोचवून मधमाश्यांचे संवर्धन व्हावे व मधमाशीप्रती कृतज्ञता व्यक्त व्हावी हा यामागील मुख्य उद्देश आहे. जर पृथ्वीवरील मधमाश्यांचा नाश झाला तर काही वर्षांतच पृथ्वीवरील मानवाचा अंत होईल, अशी प्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा. अल्बर्ट आइन्स्टाईन यांनी नोंद करून ठेवली आहे. कारण, पीक उत्पादनामध्ये मधमाश्या अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. मधमाशा एका फुलातून परागकण गोळा करून दुसऱ्या फुलांमध्ये टाकतात. त्यातून दर्जेदार फळे, फुले आणि पिकांचे उत्पादन घेता येते. मधमाशीकडून होणाऱ्या परपरागीभवनामुळे पीक उत्पादनात सरासरी ३० ते ४० टक्के वाढ होते. आज वाढते शहरीकरण, जंगल तोड, रासायनिक कीडनाशकांची अमर्यादित वापर, वाढते प्रदूषण इत्यादी कारणांमुळे मधमाशी सारख्या इतरही उपयुक्त कीटकांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. त्यासाठी व्यापक स्वरूपात मधमाशी संवर्धनाचे महत्त्व लोकांमध्ये निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. याच निमित्ताने मधमाश्यांचे महत्त्व जगभरातील लोकांमध्ये पटवून देण्यासाठी मधमाशी दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजच्या दिवशी मधमाशीप्रेमी एकत्र येऊन हा मधुमहोत्सव साजरा करतात. केंद्र शासनाच्या आणि मिशन अंतर्गत विविध उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर जास्तीत जास्त युवकांना मधमाशी पालन या उद्योगाकडे वळवण्यासाठी सीबीआरटीआय तसेच खादी ग्रामोद्योग महामंडळ आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून प्रयत्न होत आहेत. सोलापूरमध्ये युगंधर फाउंडेशन या आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही मागील पाच वर्षांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील महाविद्यालयातील तरुण तसेच शेतकरी यांना मधमाशी पालन करण्यासाठी प्रशिक्षण दिले आहे. युगंधर फाउंडेशनच्या वतीने मधमाशी पालन क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या युवकांना एकदिवसीय तसेच पाच दिवसीय शास्त्रीय पद्धतीने प्रशिक्षण दिले जाते याचा जास्तीत जास्त तरुणांनी लाभ घ्यावा. मधमाशी दिनाच्या निमित्ताने ग्रामीण भागातील शेतामध्ये तसेच वनविभागातील मोठा झाडांवरती असणारे आग्या मोहोळ तसेच इतर मधमाशीच्या पोळ्यांचे संरक्षण करणे आपले कर्तव्य आहे. मधमाशी पालनासाठी शासकीय स्तरावर विविध योजना आणि अनुदान उपलब्ध आहेत त्याचा जास्तीत जास्त प्रचार प्रसार होणे आवश्यक आहे. त्या माध्यमातून युवकांना स्वयंरोजगाराची संधी मिळू शकते या मधमाशी दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी केवळ संकल्प न करता कृती करूया आणि मधमाशी संवर्धनासाठी कटिबद्ध राहू या.

**- प्रा. रेश्मा माने**
युगंधर फाऊंडेशन सोलापूर
मास्टर ट्रेनर
सीबीआरटीआय पुणे

## महत्वाचे...



### बार्शीत वंचित बहुजन आघाडीची भव्य सभा संपन्न

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि.१९ मे-

येथील गांधी पुतळ्यासमोर वंचित बहुजन आघाडीच्यावतीने नुकतीच सुजात आंबेडकर यांची सभा संपन्न झाली. छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, टिपू सुलतान यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. बार्शी सोलापूर वंचित बहुजन आघाडीच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्यावतीने सुजात आंबेडकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी मोशीन तांबोळी, सलीम चाचा चौधरी, एजाज शेख व महिला भगिनींनी वंचित बहुजन पक्षांमध्ये प्रवेश केला. यावेळी बोलताना आंबेडकर म्हणाले की, देशातील राज्यकर्त्यांनी समाजामध्ये जातीवादाचे बीज पेरले आहे. वंचित, दलित, मुस्लिम व इतर समाज यात भरकटले असून देशात संविधान व लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी अन्यायविरोध आवाज उठवणारा वंचित बहुजन पक्ष हा सदैव आपल्या पाठीशी राहील, अशी ग्वाही देतो. युवकांनी, नागरिकांनी, महिला भगिनींनी वंचित बहुजन पक्षामध्ये यावे, कुणालाही भीती बाळगण्याची गरज नाही. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष ॲड. विवेक गजशीव, सचिव शोएबभाई सय्यद, सोमनाथ साळुंखे, राज्य उपाध्यक्ष अरुण आबा जाधव, महिला जिल्हाध्यक्ष श्वेताताई राजगुरु, चंद्रशेखर, मडिखांबे, अश्वकुमार अहिरे तसेच वंचित आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्पणा दळवी यांनी केले. शहराध्यक्ष धनंजय जगदाळे पाटील यांनी आभार मानले.

### दहावीत बार्शी शहरातून जान्हवी बारबोलेचा प्रथम क्रमांक

बार्शी, दि.१९ मे-

बार्शीतील अस्थिरोग तज्ञ डॉ. जीवन व स्त्रीरोगतज्ञ डॉ. अमृता बारबोले यांची कन्या जान्हवी बारबोले हिने इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेत



९८.४० टक्के गुण मिळवून बार्शीत पहिला क्रमांक पटकवला आहे. तिच्या शाळेतील शुभदा सरवदे हिने ९७.६० टक्के आणि ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र म ाळी यांची कन्या हर्षिता माळी हिने ९७.४० टक्के गुण मिळवले आहेत. जान्हवी व हर्षिता या दोघींनी पुढील शिक्षणासाठी लातूरच्या शाहू कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आहे. डॉ. जीवन बारबोले यांनी देखील सन १९९५ दहावी परीक्षेत विशेष प्रविण्य मिळवले होते. तर डॉ. रवींद्र माळी हे शालेय जीवनात शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी होते. पुढे मेडिकलला नंबर लागला पण फी भरायला पैसे नव्हते म्हणून जगदाळे मामा संस्थेकडून कर्ज घेऊन त्यांनी आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ते ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी म्हणून सेवा बजावत आहेत.



### उद्योजक गोरख देशमुख यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार

टेंभुर्णी, दि.१९ मे-

टेंभुर्णी येथील उद्योजक गोरख बप्पा देशमुख यांचा उद्योग व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल कोल्हापूरच्या आविष्कार सोशल ॲन्ड एज्युकेशनल फौंडेशनने राज्यस्तरीय महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन सन्मान केला. हा कार्यक्रम पन्हाळगड येथे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या भाची डुमुनी मुर्मु व कोल्हापूरची प्रसिद्ध न्यूरो सर्जन डॉक्टर प्रभू यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण झाले. कोल्हापुरी फेटा मानपत्र प्रमाणपत्र देऊन श्री. देशमुख यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष संजय पवार, महासचिव सुनिता केदार, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष रंगराव सुर्यवंशी, पन्हाळ तालुका अध्यक्ष शशिकांत म्हेत्तर उपस्थित होते. महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल माढा तालुका व सोलापूर जिल्ह्यातून श्री. देशमुख यांच्यावर शुभेच्छांचा व अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

### सरकारी कामात अडथळा; आरोपीची निर्दोष मुक्तता

वळसंग, दि.१९ मे-

सरकारी कामत अडथळा केल्याप्रकरणी आरोपी अप्पु मिनगिले, महेश कोकरे, प्रथमेश कोकरे (रा. अक्कलकोट) यांची सत्र न्यायाधिश योगेश राणे यांनी निर्दोष मुक्तता केली आहे. याबाबत माहिती अशी की, दि १३/०८/ २०१७ रोजी सकाळी ११ च्या सुमारास आरोपी अप्पु मिनगिले, महेश कोकरे, प्रथमेश कोकरे यांनी त्यांचे ताब्यातील दुचाकी भरधाव वेगात, हयगयीने, निष्काळजीपणे, जिवितास अपाय होईल अशा प्रकारे चालवल्याप्रकरणी अक्कलकोट येथे पोलिसांनी कायदेशीर दंड भरणेस सांगितले होते. आरोपींनी पोलिसांसोबत हुज्जत घालुन, धक्काबुकी करुन सरकारी कामात अडथळा केल्याने पोलिसांनी आरोपी विरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला होता. आरोपी विरुद्ध सोलापुर येथील सत्र न्यायलयात दोषारोप दाखल करण्यात आले. यात सरकार पक्षातर्फे पाच साक्षीदार तपासण्यात आले. संपूर्ण चौकशीअंती सरकार पक्षाने आरोपी हे सरकारी काम ात अडथळा केल्याबाबत सबळ पुराव्याशीनी सिध्द करुन शकले नाही. सदर बाब हे आरोपी यांचे वकिलांनी युक्तीवाद दरम्यान न्यायालयाच्या निदर्शनास आणुन दिली. आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपी यांची निर्दोष मुक्तता केली आहे. यात आरोपी तर्फे ॲड. श्रीशैल रायचूरकर, ॲड. मनोज गुंडे यांनी काम पाहिले.

# मंद्रुपमधील चेंबर बनले धोकादायक

## ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष; नागरीकांमधून संताप

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ मे-





मंद्रुप येथील आठवडा बाजाराच्या प्रवेशद्वारासमोर शिव बसव चौकातील व हुतात्मा चौकातील बसस्थानकालगत असणाऱ्या चेंबरचे झाकण एक महिन्यापासून तुटलेल्या अवस्थेत आहेत . हे झाकण धोकादायक बनले आहेत. ग्रामपंचायतीचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने पावसात व रात्रीच्या वेळी वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत असून, अपघाताची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. म्हणून ग्रामपंचायतीने त्वरीत चेंबरचे झाकण बसवावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

सध्या पावसाळी वातावरणाम ुळे ड्रेनेजमध्ये पाणी वाहत आहे, तर वादळ वाऱ्यामुळे परिसरातील वीजपुरवठा खंडित होत आहे. तुटलेले चेंबरचे झाकण, ओले रस्ते, आणि अंधार यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. अबालवृध्दांसाठी ही परिस्थिती गंभीर आहे. या परिसरातच मंद्रुपचा आठवडा बाजार व मुख्य बाजारपेठ ठिकाणही आहे. येथून दररोज शेकडो वाहनचालक व मळसिध्द देवांच्या भक्तांची वर्दळ असते. त्यामुळे वाहनचालकाकडून अपघात होण्याची भीती नागरिकांम धून व्यक्त करण्यात येत आहे. ग्रामपंचायतीच्या हलगर्जी व निष्काळजीपणावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मंद्रुपमधिल मुख्य बसस्थानक व हुतात्मा चौकातही चेंबरचे झाकण तुटून महिना उलटून गेला आहे. याठिकिणी दररोज एसटी बससह शेकडो चारचाकी वाहनांची वर्दळ असते. चेंबर तुटल्याने त्याच्यावर बॅरीकेट ठेवण्यात आला आहे. मात्र चेंबर धोकादायक बनला आहे. अनेक वेळा बस व एसटी चालकाकडून अपघात होण्याचे टळले आहे. तसेच शाळा व म हाविद्यालयाचे विद्यार्थीही चेंबरम ध्ये दुचाकी अडकून पडले आहेत. दोन्ही ठिकाणी प्रवेशद्वारासमोर चेंबरचे झाकण तुटले असताना ग्रामपंचायत प्रशासन बघ्याची भूमिका घेऊन झाकण बसविण्यास टाळाटाळ करीत आहे. वारंवार वाहनचालक व नागरिकानी तक्रार करूनही पदाधिकारी व प्रशासन दखल घेत नसल्याबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने त्वरीत चेंबर दुरुस्त करून झाकण बसवावे, अशी म ागणी होत आहे.

> **अपघात झाल्यास ग्रामपंचायत जबाबदार**
>
> दोन्ही ठिकाणी चेंबरचे झाकण तुटले असून ग्रामपंचायत बघ्याची भूमिका घेत आहे. पदाधिकार्यांची येथून दररोज ये जा असताना त्याकडे दुर्लक्ष होत आहे. दोन्ही ठिकाणी वाहनांसह नागरीकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यता आहे. चेंबरमध्ये वाहन अडकून अपघात होत आहेत. मंद्रुप ग्राम पंचायतीस जबाबदार धरून कारवाई करण्याची मागणी करणार आहे.
>
> - भगवान सुतार, उद्योजक, मंद्रुप



## पांगरीच्या उपसरपंचपदी प्रमिला नारायणकर बिनविरोध

तभा वृत्तसेवा,
बार्शी, दि.१९ मे-

पांगरी (ता. बार्शी) येथील उपसरपंचपदी प्रमिलाताई सोमनाथ नारायणकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. मावळते उपसरपंच ॲड.रियाज बागवान यांनी राजीनामा दिल्याने हि जागा रिक्त् होती.

या रिक्त जागेसाठी सोमवार (दि.१९) रोजी दुपारी १ वाजता ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच म निषाताई घस यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्यांची बैठक झाली. यावेळी उपसरपंचपदासाठी प्रमिलाताई नारायणकर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची उपसरपंचपदी सर्वानुमते बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. माजी आमदार राजाभाऊ राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपाच्या माध्यमातून मी उपसरपंच म्हणून काम करत असताना पक्षीय हेवेदावे बाजूला ठेवुन सर्वाना एकत्र घेऊन गावातील पाणी, रस्ते, वीज, आरोग्य आदी प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करेन तसेच शासनाच्या विविध योजना सर्वसाम ान्य नागरिकांपर्यंत पोहचवेन, असे नूतन उपसरपंच नारायणकर यांनी सांगितले. यावेळी ॲड.अनिल पाटील, सोलापूर जिल्हा नियोजन समिती सदस्य विजय गरड, राम लिंग गोडसे, तंटामुक्ती अध्यक्ष सुहास देशमुख, सोसायटी चेअरमन बापू खबाले, माजी उपसरपंच तथा सदस्य धनंजय खवले, ॲड. रियाज बागवान, सदस्य शैलजा माळी, मैनाबाई बगाडे, सतिश जाधव, सुरेखा लाडे, रेणुका मोरे, शुभांगी कुंभार, गणेश गोडसे, रामभाऊ देशमुख, शहाजी घस, सोमनाथ नारायणकर तसेच गावातील ग्रामस्थ व ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## वळसंग येथे बुधवारी डायग्नोस्टिक व्हॅनमधे कर्करोग तपासणी

वळसंग दि. १९ मे-

जागतिक कर्करोग दिनाचे औचित्य साधून आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅनचे उद्घाटन केले. यामध्ये प्रामुख्याने मुख कर्करोग, स्तन कर्करोग व गर्भाशय मुख कर्करोग या तीन प्रकारच्या कर्करोगांची तपासणी केली जाणार आहे.

दि. २१ एप्रिल ते २५ मे या कालावधीमध्ये ही कॅन्सर डायग्नोस्टिक व्हॅन सोलापूर जिल्ह्याम ध्ये दौरा करणार आहे. ही व्हॅन कर्करोगाची तपासणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या उपकरणांनी सुसज्ज असून खेड्यापाड्यांमध्ये गावांमध्ये राहणारे नागरिक जे त्यांच्या उच्च तपासणीसाठी रुग्णालयांपर्यंत पोहोचू शकत नाही अशा लोकांना या सुसज्ज व्हॅन द्वारे सेवा देण्यात यावी हा आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निलम घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कॅन्सर निदान व्हॅन दिनांक २१ मे रोजी ग्रामीण रुग्णालय, वळसंग तालुका दक्षिण सोलापूर येथे येणार आहे. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अमोल कापसे व प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. हरकुड यांनी या सेवेचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

## कोळेगावात १६ वर्षानंतर एकत्र आले दहावीचे विद्यार्थी

### विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालयात रंगला स्नेहमेळावा

तभा वृत्तसेवा,
पिलीव, दि. १९ मे-




कोळेगांव (ता. माळशिरस) येथील विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या २००८-०९ बॅचच्या विद्यार्थ्यांचा तब्बल १७ वर्षानंतर एकत्र आल्याने पारंपारिक फेट्यांसह हलगीच्या नीनादात स्नेहमेळावा रंगला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत सावता माळी विद्यालयाचे मुख्याध्यापक दत्तात्रय आवताडे होते. यावेळी व्यासपीठावर शिक्षक सूर्यकांत कोळी, रेखा हंबीरराव, करे उपस्थित होते. प्रारंभी सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींना पारंपारिक फेटे बांधून हलगीच्या नीनादात स्वागत कमानीपासून कार्यक्रम स्थळी आणण्यात आले. यानंतर तत्कालीन शिक्षक शहाजी दुपडे व दत्तात्रय आवताडे यांचा सन्मान विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आला. प्रस्ताविक दिनेश सावंत यांनी केले. यावेळी बोलताना दत्तात्रय आवताडे, सूर्यकांत कोळी व रेखा हंबीरराव यांनी मनोगत व्यक्त केले. तब्बल १६ वर्षानंतर एकत्र आल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर उत्साह दिसत होता. यावेळी जीवनात यशस्वी होण्यासाठी शरीराकडे दुर्लक्ष न करता व्यायामाबरोबर अध्यात्मिक विचार अमलात आणला पाहिजे असे मनोगत बोंडलेच्या संत तुकाराम विद्यालयाचे मुख्याध्यापक शहाजी दुपडे यांनी मांडले. सूत्रसंचालन व आभार पंकज दुपडे यांनी मानले.

## शहिदांना श्रद्धांजली वाहत केली वडिलांची पुण्यतिथी

### नाईकनवरे कुटूंबाने दिला अन्य विधींना फाटा

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. १९ मे-



स्वर्गीय राजाराम नाईकनवरे यांनी देशसेवेबरोबरच समाजसेवेचे कार्य आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत केले. त्यांचा मोठा मुलगा सैन्यात मेजर असून लहान मुलगा अंपायर व समाज कार्यामध्ये आहे. पहलगाम येथे अतिरेक्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या २७ नागरिकांना श्रद्धांजली वाहून एका वेगळ्या पद्धतीने स्वर्गीय राजाराम नाईकनवरे यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

स्वर्गीय राजाराम नाईकनवरे प्रतिष्ठान व सामाजिक संस्था यांच्या वतीने दरवर्षी विविध कार्यक्रमाने पुण्यतिथी साजरी करण्यात येते. परंतु राजाराम नाईकनवरे यांचे चिरंजीव विक्रम नाईकनवरे हे भारतीय लष्करामध्ये आपली सेवा बजावत आहेत. अतिरेकी हल्ल्यानंतर त्यांना देश सेवेसाठी जावे लागले. त्यांचा मान राखत यंदा सर्व कार्यक्रमांना फाटा देत साधेपणाने पुण्यतिथी साजरी करण्यात आली. स्वर्गीय राजाराम नाईक नवरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केल्यानंतर परिसरातील महिला पुरुष यांनी प्रथम पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहून दादांच्या प्रतिमेवर पुष्पांजली अर्पण केली.

## उमरड मध्ये वीज पडून रघुनाथ भिसे यांच्या म्हशीचा मृत्यू

तभा वृत्तसेवा,
करमाळा, दि.१९ मे-



करमाळा तालुक्यातील उमरड येथे काल दुपारी वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात अवकाळी पाऊस झाला. या पावसात वीज पडून रघुनाथ विष्णू भिसे या शेतकऱ्यांची म्हैस मृत्युमुखी पडली आहे.

यावेळी गोठ्याशेजारी सोमनाथ भिसे व ब्रह्मदेव भिसे हे दोन शेतकरी कांदा चाळ बांधत असताना त्यांनाही विजेचा शॉक बसला मात्र दुसरी इतर जीवित हानी झाली नाही. वीज पडल्याने कोकरे वस्तीवरील अनेक इलेक्ट्रॉनिक उपकरणात तांत्रिक बिघाड झाले आहेत.भिसे यांच्या म्हशीचा मृत्यू झाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे तरी संबंधित विभागाने पंचनामा करून शेतकरी भिसे यांना शासकीय मदत मिळण्याची मागणी शेतकरी करत आहे.मे महिन्यातच वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावल्याने अनेकांचे तारांबळ उडाली. अचानक जोरदार वारे विजांचा कडकडाट व मुसळधार पाऊस पडल्याने कांदा व मका उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

## अक्कलकोट येथे १११ जणांचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान

### १८ जिल्ह्यातील समाजसेवकांचा समावेश

तभा वृत्तसेवा,
अक्कलकोट, दि.१९ मे-



महाराष्ट्रात विविध क्षेत्रात विविध समाजसेवकांनी केलेल्या लक्षवेधी कार्याबद्दल १११ सुवर्णरत्नांचा महावस्त्र, मोत्याचे माळ, सन्मान पत्र, सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांच्या हस्ते एका शानदार सोहळ्यात सन्मान व सत्कार करण्यात आले.

बाळासाहेबांची शिवसेना अक्कलकोट, सोनार हक्क परिषद जिल्हा सोलापूर व स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटना तालुका अक्कलकोट यांच्या संयुक्त विद्यमाने, संयोजक चंद्रकांत वेदपाठक व संपूर्ण वेदपाठक परिवार यांनी अक्कलकोट येथील सर्जेराव जाधव सभागृहात आयोजित करण्यात केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वराज्यचे प्रदेश अध्यक्ष धनश्री उत्पात पंढरपूर या होत्या. सोहळ्याचे उद्घाटन शिवसेनेचे जिल्हा प्रमुख मनिष काळजे होते तर प्रमुख वक्ते म्हणून सोनार हक्क परिषदेचे संस्थापक राजेश पंडित रेणापूरकर होते. अक्कलकोट शहर, सोलापूर जिल्ह्यासह १८ जिल्ह्यातील विविध जातीधर्मातील १११ समाजसेवकांचा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रथम श्री संत नरहरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिपक पोतदार यांनी स्वागत केले. तर प्रस्तावना कार्यक्रमाचे संयोजक चंद्रकांत दादा वेदपाठक यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे तालुका प्रमुख संजय देशमुख, जिल्हा महिला आघाडी प्रमुख अनिता म ाळगे, जिल्हा उपप्रमुख सुलोचना कडबगावकर, विधानसभा संघटक प्रा. सूर्यकांत कडबगांवकर, स्वराज्यचे विश्वस्त उमेश काशीकर,पश्चिमम महा. अध्यक्ष श्रीराम बडवे, शोभा खेडकर, इफ्तेकार कामतीकर, सोनार हक्क परिषदेचे राज्य युवा समन्वयक निलेशभैय्या धाराशिवकर, कुर्डूवाडीचे माजी नगराध्यक्ष राजेंद्र पारखे, सहकार भारतीचे सुनील पंडित, सोलापूरचे संतोष दीक्षित, पुण्याचे गणेश क्षीरसागर हे होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विठ्ठल वेदपाठक, सुरेश वेदपाठक, अनिल वेदपाठक, गुरुनाथ पोतदार, कल्लप्पा खेडगी, सचिन निंबाळकर, अनिल पवार, राहुल वेदपाठक, आकाश वेदपाठक, सागर वेदपाठक, ओंकार वेदपाठक, स्वामिनाथ हरवाळकर आर्दीनी विशेष परिश्रम घेतले.

## बुधवारी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर,दि.१९ मे -

महावितरणतर्फे जिल्ह्यातील सर्व विभागीय कार्यालयांमध्ये २१ मे रोजी ग्राहक तक्रार निवारण दिनाचे आयोजन केले असल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

२१ मे रोजी जिल्ह्यातील पंढरपूर, बार्शी,अकलूज, सोलापूर शहर व सोलापूर ग्रामीण अशा सर्व विभागीय कार्यालयांमध्ये सकाळी १० ते दुपारी १ वा.पर्यंत ग्राहकांनी उपस्थित राहून आपल्या तक्रारी मांडून त्यांची सोडवणूक करून घ्यावी. यावेळी अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहा.अभियंता हे अधिकारी समक्ष उपस्थित राहून तक्रारी, अडचणी,समस्या सोडविणार आहेत. तरी पंढरपूर, बार्शी, अकलूज, सोलापूर ग्रामीण, सोलापूर शहर या ठिकाणी सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांनी आपल्या अवाजवी बील, सरासरी बील आकारणी, वीज बिल वेळेत न मिळणे,मीटर रीडिंग वेळेत न घेणे, कनेक्शन वेळेत न मिळणे, योग्य दाबाने वीजपुरवठा न होणे, वारंवार वीजपुरवठा खंडित होणे,नविन मीटर वेळेत न मिळाल्यामुळे ग्राहकांना स्वखर्चाने आणलेल्या मीटरची संपूर्ण रक्कम न मिळणे, शेतकरी ग्राहकांना वेळेत डी.पी. बदलून न मिळणे, सोलर सिस्टीम अशा कोणत्याही स्वरुपातील लिखित तक्रार अर्जासह उपस्थित राहावे, असे आवाहन महावितरण सोलापूर मंडलचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, अ. भा. ग्राहक पंचायतीचे जिल्हा संघटक दीपक इरकल, प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा सचिव सुहास निकते, जिल्हा महिला प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## बार्शीतील आनंद शेलार यांना अमेरिकेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ मे-**

बार्शीचा सुपुत्र आणि नामांकित क्रिकेट प्रशिक्षक आनंद शेलार यांनी आणखी एक आंतरराष्ट्रीय टप्पा गाठला आहे. त्यांची निवड अमेरिकेतील शिकागो क्रिकेट संघाचा सहायक प्रशिक्षक म्हणून करण्यात आली असून, या नियुक्तीमुळे बार्शीचा झेंडा पुन्हा एकदा जागतिक पातळीवर फडकला आहे.

आनंद शेलार यांनी यापूर्वी वेस्ट इंडिज लिजेंड्स, साउथ आफ्रिका लिजेंड्स, तसेच वेस्ट इंडिज मास्टर्स या संघांसोबत आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक म्हणून कार्य केले आहे. त्यांचा अनुभव आणि प्रशिक्षण पद्धती यांना जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याने ही निवड निश्चितच उल्लेखनीय आहे. शेलार यांचा 'हाय परफॉर्मन्स क्रिकेट अकॅडमी' हा उपक्रम बार्शीमध्ये कार्यरत असून, अनेक विद्यार्थी जिल्हा व राज्य स्तरावर चमकले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक खेळाडूंना राष्ट्रीय पातळीच्या संधी मिळाल्या आहेत. या निवडीबद्दल बोलताना



आनंद शेलार म्हणाले, मी कायम स्वप्न पाहिलं की आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय प्रशिक्षक म्हणून मी योगदान द्यावं. आज हे स्वप्न खरं होत आहे. ही निवड केवळ माझ्यासाठी नाही, तर माझ्या गावासाठी आणि माझ्या खेळाडूंना प्रेरणा देणारी आहे. सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रासाठी ही अभिमानास्पद बाब आहे. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थान मिळवणाऱ्या प्रशिक्षकांमुळे ग्रामीण भागातील नवोदितांना नवी दिशा आणि उमेद मिळते हे निश्चित.

## महत्वाचे...

### बार्शीचे उद्योजक संतोष ठोंबरे यांना महाराष्ट्र महागौरव पुरस्कार जाहीर

**बार्शी, दि.१९ मे -**

खामगाव (ता. बार्शी) येथील यशस्वी उद्योजक संतोष ठोंबरे यांना डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेचा मानाचा महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५ हा पुरस्कार नुकताच जाहीर झाला. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत राज्य समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या हस्ते पुणे येथे दि. २५ मे रोजी पुरस्कार वितरण समारंभ असल्याचे संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी सांगितले. ठोंबरे यांनी कुबोटा ट्रॅक्टर विक्रीमध्ये सलग तीन वर्षे जगात प्रथम क्रमांक पटकावला आहे. मातृभूमी प्रतिष्ठानची स्थापना करुन, गोरगरीब वंचितांना गेली अनेक वर्षांपासून अन्नछत्रलयाच्या माध्यमातून मोफत अन्नदान केले जाते. ठोंबरे यांनी तब्बल ११ एकर जागेमध्ये भव्य अशा क्रीडा संकुल उभारणीची सुरुवात केली आहे. तसेच व्याख्यानमालेच्या माध्यमातून बार्शीकरांना नेहमीच वैचारिक शिदोरी देण्याचे काम मातृभूमी प्रतिष्ठान सातत्याने करत आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेच्यावतीने हा पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याचे निवड समितीच्यावतीने सांगण्यात आले आहे. संतोष ठोंबरे यांची पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले जात आहे.



### चोरीच्या कारणावरून बठाण येथील वाळू ठेका रद्द; ४० लाखाची अनामत रक्कम जप्त

**सोलापूर, दि.१९ मे -**

मंगळवेढा तालुक्यातील बठाण येथील वाळू ठेकेदाराने वाळू चोरी न थांबविल्याने वाळू ठेका रद्द करण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. संबंधित ठेकेदाराचा चाळीस लाख रुपयांचा अनामत रक्कमही जप्त करण्यात आली आहे. यापूर्वी संबंधित ठेकेदाराकडे नोटीस बजावून चौकशी करून काही दिवसांसाठी वाळू उपसा स्थगिती देण्यात आली होती. पुन्हा अटी शर्तीनंतर वाळू उपसा करण्यास परवानगी देण्यात आली. परंतु ठेकेदाराने नियम न पाळल्याने ठेकार रद्द करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेसाठी प्रत्येक लाभार्थ्याला पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून दिले जाणार आहे. त्यासाठी नाले ओढे या ठिकाणी वाळू साठा उपलब्ध करून दिले जाणार आहे. येत्या पंधरा दिवसांमध्ये संबंधिताकडून किती वाळू पाहिजे याची माहिती घेऊन मोफत वाळू उपलब्ध करून दिले जाणार आहे. तर उर्वरित नऊ घाटाचे वाळू लिलाव प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

### महाराजस्व अभियानांतर्गत सांगोला तालुक्यात चार शिबीरांचे आयोजन

**बार्शी, दि.१९ मे -**

सांगोला तालुक्यामध्ये विविध शाळा व महाविद्यालयामध्ये जात, रहिवास, उत्पन्न असे विविध शासकीय दाखल्यासाठी महसूल विभागाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत दि.२१ मे, २२ मे, २३ मे व २९ मे यादिवशी शिबीरांचे आयोजन केले आहे. या शिबीराव्दारे विद्यार्थ्यांना शासकीय शुल्कात आवश्यक दाखले देण्यात येणार असल्याची माहिती सांगोला तहसिलदार संतोष कणसे यांनी दिली. माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले असून आता प्रवेश, शिष्यवृत्ती, नोकरी यासाठी विद्यार्थ्यांकडून विविध दाखल्यांची मागणी वाढते. दरवर्षी दाखल्यांसाठी होणारा विलंब तहसिल कार्यालयात होणारी गर्दी व वेळेवर दाखल न मिळाल्याने विद्यार्थ्यांना होणारा त्रास या पार्श्वभुमीवर सदर शिबीर घेतली जात आहेत. दि.२१ मे रोजी वत्सलादेवी देसाई जवळा, दि.२२ मे रोजी विद्यामंदिर प्रशाला नाझरा, दि.२३ मे रोजी विद्यामंदिर सांगोला, दि.२९ मे रोजी डॉ.भाई गणपतरावजी देशमुख सभागृह ग्रा.पं.महूद बु येथे आयोजन केले आहे. तरी सर्व नागरिक व विद्यार्थ्यांनी सदर शिबीरांचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन तहसिलदार संतोष कणसे यांनी केले आहे.

### सापाला पकडताना दोघांना दंश

**सोलापूर, दि.१९ मे -**

घरात निघालेला साप पकडताना सापाने दोघांना दंश केला. ही घटना कुमठा नाका परिसरातील भारत रत्न नगरात शनिवारी रात्री ८.४५ वाजता घडली. सुजल किशोर लालबिंगी (वय २०) व करण सतेज वाल्मिकी (वय ३०, दोघे रा. भारतरत्न इंदिरा नगर) अशी सर्पदंश झालेल्या दोघांची नावे आहेत. यातील सुजल याच्या घरात शनिवारी रात्री ८.४५ च्या सुमारास साप दिसून आला. त्याला पकडण्यासाठी सुजल आणि करण हे दोघे प्रयत्न करत होते. त्यावेळी सापाने सुजलच्या डाव्या हाताला व करणच्या डाव्या पायाला दंश केला. रात्री ९ वाजता भाऊ प्रेम याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## उजनी धरण जलप्रदुषण रोखण्यासाठी जनआंदोलन उभारा

**● आंतरराष्ट्रीय जलतज्ञ राजेंद्रसिंह : वस्तुनिष्ठ अभ्यासासाठी साळुंखे यांनी पुढाकार घ्यावा**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.१९ मे-**

आंतरराष्ट्रीय जलतज्ञ राजेंद्रसिंहजी यांनी करमाळा तालुक्यातील कुंभेज परिसरातील पिण्याचे पाण्यासंदर्भात कुंभेज येथील दिगंबरावजी बागल माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी संशोधन करून तयार केलेला अहवाल पिण्याच्या पाण्याची खरी वस्तुस्थिती दर्शवणारा असून शाळेच्या या उपक्रमाचे कौतुक करून या विद्यालयाचे शिक्षक कल्याणराव साळुंके यांना तज्ञांच्या मदतीने उजनी धरणातील जलप्रदूषणा संदर्भात वस्तुनिष्ठ संशोधन करण्यासाठी सहयोग देण्याची तयारी व्यक्त केली आहे.






शालेय शिक्षणाबरोबरच वेगवेगळे उपक्रम राबवणाऱ्या करमाळा तालुक्यातील कुंभेज येथील दिगंबरा बागल माध्यमिक विद्यालयाने मागील काळात कुंभेज व परिसरातील पिण्याच्या पाण्याची स्तोत्र येथील पाणी तपासणी प्रथम करून वस्तुनिष्ठ अहवाल तयार केला होता यामध्ये अनेक जल स्तोत्राचे पाणी पिण्यास अपायकारक असल्याचे निष्कर्ष निघाले होते हा अहवाल या विद्यालयातील मुलांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला होता आंतरराष्ट्रीय किर्तीचे जलतज्ञ राजेंद्रकुमारजी उजनी धरणातील जलप्रदूषणासंदर्भात पाहणी करण्यासाठी उजनी धरण पाणलोट परिसरात आले होते यानंतर त्यांनी परिसरातील लोकांसमवेत बैठक घेऊन उजनीचे जलप्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाय करावे याविषयी उपस्थित लोकांना मार्गदर्शन केले यावेळी कुंभेज प्रशाले विद्यालयाचे उपक्रमशील शिक्षक कल्याणराव साळुंखे यांनी मागील काळातील संशोधन केलेला अहवाल त्यांना दाखवला एका माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी राबवलेला हा महत्त्वपूर्ण उपक्रमाचे त्यांनी कौतुक करून करमाळा तालुक्याबरोबरच तीन ते चार जिल्ह्यातील लोकांचे भवितव्य अवलंबून असलेल्या उजनी जलप्रदूषणासंदर्भात असाच वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्याची गरज व्यक्त केली यासाठी साळूंके यांनी सहयोग द्यावा अशी अपेक्षा व्यक्त केली यावेळी त्यांनी उजनी धरणातील पाणी मनुष्य व सर्व प्रकारच्या प्राण्यांबरोबरच शेतीसाठी सुद्धा अपायकारक असुन धरणातील जलप्रदूषण रोखण्यासाठी जनआंदोलन उभे करणे गरजेचे आहे.

भारतातील सर्वात जास्त सुशिक्षित शहर म्हणुन पुणे आहे व पुणे,पिंपरी चिंचवड चे रासायनिक व मलमूत्र उजनीत येते आणि नागरिक त्या पाण्यामुळे आजारी पडत आहेत,रोगी बनत आहेत.कॅन्सर,त्वचा आदी रोग पसरत आहेत. उजनी प्रदूषण रोखण्यासाठी आता उजनी काठ,सोलापुर व परिसरातील नागरिकांनी लढाईसाठी एकत्रित आले पाहिजे असे मत व्यक्त केले. ही लढाई भविष्यातील पिढीसाठी व आपल्या जीवनाशी आहे.पाण्यामुळे लोक आजारी पडत आहेत. कार्यक्रमास जलबीरादरीचे नरेंद्र चुघ, विनोद बोधनकर, तेलंगाणाचे माजी मंत्री व्ही.प्रकाशराव, आंध्रप्रदेशचे सत्यनारायण बोलीशेट्टी, रमाकांत कुलकर्णी, सुनील रहाणे, आकांक्षा पांडे तसेच परिसरातील भजनदास पवार,मारुती वणवे,हनुमंत बंडगर,सरपंच गुराप्पा पवार,सचिन बोगावत, ॲड.पांडुरंग जगताप,संपत बंडगर, करमाळा तालुक्यातील कल्याणराव साळुंके गजेंद्र पोळ विराज साळूंके यांचे बरोबरच इंदापूर दौंड करमाळा तालुक्यातील नागरिक उपस्थित होते.

## बार्शीत मोफत आरोग्य शिबिरात १०१ जणांची तपासणी

**▸▸ डॉ कर्मवीर मामासाहेब जगदाळे बहुउद्देशीय संस्थेतर्फे आयोजन**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ मे-**

येथील डॉ.कर्मवीर मामासाहेब जगदाळे बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने आयोजित मोफत आरोग्य शिबिरात १०१ जणांची तपासणी करण्यात आली. नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला.



येथील शिवाजीनगर येथे संपन्न झालेल्या या शिबिरात विविध वैद्यकीय तपासण्या आणि समुपदेशन झाले. शिबिराचे उद्घाटन डॉ. आर. व्ही. जगताप यांच्या हस्ते झाले. शिबिरात हृदयरोग, मधुमेह, कोलेस्ट्राल, रक्तदाब तपासणी, थायरॉईड व कॅन्सर यासारख्या तपासणी सुविधा उपलब्ध होत्या. तसेच मोफत औषधोपचार करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष सुरेश राऊत यांनी शिबीराचा उद्देश समाजातील सर्व स्तरांतील लोकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देणे असल्याचे सांगितले.

शिबिरात डॉ. आर. व्ही. जगताप व डॉ. बारबोले यांनी वैद्यकीय सेवा पुरवल्या. या शिबिराला स्थानिक नागरिक, विशेषतः वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमधील व्यक्तींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. अनेकांनी शिबिराच्या आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले आणि भविष्यातही अशा उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली. शिबीरासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनिता बांगर यांनी सहकार्य केले. संस्थेचे अध्यक्ष सुरेश राऊत, उपाध्यक्ष शशिकांत गोडगे व सचिव सतीश राऊत, सहसचिव संतोष कुमार गुजरे, खजिनदार गुणवंत खांडेकर यांनी नियोजन केले. त्याचप्रमाणे संस्थेचे सभासद नंदकुमार जगदाळे, प्रा सुनील शेळके, ॲड. काकासाहेब गुंड, प्रा. श्रीपाद भंडारी, राजाभाऊ इंगोले, कल्याण तांबे, बलभीम माळी, निलेश मोहिते यांनी सहकार्य केले. व्यवस्थापक मंडळ म्हणून बी.टी. शिंदे, जगन्नाथ साळुंखे, प्रकाश नेवरे, प्रदिप शिंदे, भाऊसाहेब गोडगे, आकाश राऊत, दर्शन धावणे, प्रतिक शिंदे, ओंकार गवळी, कमलाकर घोडेकर, संग्राम गोडगे, अभिषेक राऊत यांनी सहकार्य केले. सूत्रसंचालन अध्यक्ष प्रा. राऊत यांनी तर प्रास्ताविक प्रा. श्रीपाद भंडारी यांनी व आभार सतीश राऊत यांनी मानले.



## सांगोल्यातील 'आपुलकी' कार्यालयाचे अंध दाम्पत्याच्या हस्ते झाले उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१९ मे-**

सांगोला तालुक्यात कार्यरत असलेल्या आपुलकी प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेच्या कार्यालयाचे उद्घाटन नगरपरिषद पाठीमागे गाळा क्र.३ मध्ये राजू बंडगर व सुरेखा बंडगर या अंध दाम्पत्याचे हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत रविवारी संपन्न झाले.

आपुलकी प्रतिष्ठाने शैक्षणिक साहित्य वाटप, विद्यार्थ्यांना सायकल वाटप, गरजू व निराधार महिलाना शेळी वाटप, शिलाई मशीन, पिको फॉल मशीन वाटप, पिठ गिरणी वाटप, दिव्यांगाना तीनचाकी सायकल वाटप करुन समाज जीवनात मानवतेचे महान कार्य केले आहे, असे गौरवोद्गार डॉ.प्रभाकर माळी यांनी काढले.

> **आपुलकीने खरी दृष्टी दिली - राजू बंडगर**
>
> आम्ही दोघेही अंध असून आपुलकी प्रतिष्ठानमुळे आम्हास खऱ्या अर्थाने दृष्टी मिळाली आहे, त्यामुळे आमच्या जीवनात प्रकाश निर्माण झाला आहे असे कौतुकोद्गार राजू बंडगर यांनी यावेळी काढले.

याप्रसंगी डॉ.प्रा.विजय जाधव, ॲड. गजानन भाकरे, प्रा.राजेंद्र ठोंबरे, दिगंबर जगताप, सुरेश माळी, शहाजी गडहिरे, प्रहार संघटनेचे माळी यांनी मनोगत व्यक्त करुन शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात हार, गुच्छ, फुले, बुके, शाल, सत्कार यांना फाटा देवून केवळ शालोपयोगी वस्तुंचा स्वीकार करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. यावेळी पत्रकार बंधू, समाजसेवक, महिला भगिनी व आपुलकी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एकाच शाळेत दोन विज्ञान शिक्षकांची नियुक्ती

**● अक्कलकोटच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांचा मनमानी कारभार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ मे-**

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परीषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेत दोन विज्ञान पदवीधर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. एक विज्ञान पदवीधर शिक्षक पुर्वीपासून असताना जानेवारी २०२५ मध्ये पुन्हा दुसऱ्या शिक्षकाची नियमबाह्य नियुक्ती करण्यात आली आहे.

सदरील शाळेत दोन विज्ञान शिक्षक पात्र नसताना प्रभारी गटशिक्षणाधिकारी यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करुन तोंडी आदेश देऊन एका शिक्षकाची नियुक्ती केली आहे. एक वर्षापासुन नियमबाह्य प्रतिनियुक्त प्रकरणाची चर्चा सुरू असताना गटशिक्षणाधिकारी पदाचा दुरुपयोग केल्याचे शिक्षकाच्या हजेरीवरुन आढळून आली आहे.



शाळेतील मुख्याध्यापक यांनी त्या शिक्षकाला कोणत्या आधारे हजर करुन घेतले याबाबत देखील सखोल चौकशी करावे. अक्कलकोट तालुक्यात विज्ञान व गणीत शिक्षकांचे १० जागा रिक्त असताना एकाच शाळेत दोन विज्ञान शिक्षकांची नियुक्ती करण्याचे कारण काय ? याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे. गटशिक्षणाधिकारी यांची खातेनिहाय चौकशी करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल संघटनेस आठ दिवसात देण्यात यावा , अन्यथा बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे तालुकाध्यक्ष महांतेश कट्टीमनी यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे. मैंदर्गी येथील शाळेत ९० विद्यार्थ्यांसाठी सात वर्गांमधून तीन शिक्षक अध्यापन करीत आहेत. या शाळेसाठी वर्गखोल्यांची गरज नसताना दोन खोल्या बांधून शासनाच्या निधीचा दुरूपयोग केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मैंदर्गीचे नागरीक उमेश पोतेनवरू यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.



## 'सनातन' तर्फे एक कोटी श्रीराम नामाचा जप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१९ मे-**

सनातन राष्ट्रासाठी रामराज्य संकल्प जपयज्ञाद्वारे एक कोटी श्रीरामनामाचा जप सनातन संस्थेच्या वतीने फर्मागुडी, फोंडा गोवा येथे आयोजित सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात करण्यात आला. देश विदेशातून आलेल्या २५ हजारांपेक्षा अधिक भाविकांनी भावपूर्ण वातावरणात 'श्रीराम जय राम जय जय राम' असा नामजप केला. यामुळे वातावरण राममय झाले होते. सोलापूर जिल्ह्यातील १४०० हून अधिक तर सांगोल्यातील ३० साधक सहभागी झाले होते. या जपयज्ञाचा उद्देश म्हणजे राष्ट्राला अध्यात्मिक उर्जा देणे, नैतिक मूल्यांची पुनर्स्थापना करणे आणि सनातन हिंदू संस्कृतीचा जागर घडवणे ही होय. या यज्ञात देशभरातील साधक, भक्त, धर्मप्रेमी आणि विविध धार्मिक संस्था सहभागी झाल्या होत्या.

## बार्शीत 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्'च्या घोषणांनी दुमदुमला परिसर

**भव्य तिरंगा रॅली संपन्न सेवानिवृत्त जवानांसह नागरिकांचा होता सहभाग**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १९ मे-**

भारतीय सैन्याच्या शौर्याचा गौरव करणारी आणि 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वी मोहिमेला मानवंदना देणारी तिरंगा रॅली आज बार्शी शहरात भव्य स्वरुपात पार पडली. चलो, तिरंग्याखाली एकत्र येऊया! या राष्ट्रभक्तीपूर्ण घोषवाक्याखाली ही रॅली शहरभर दिमाखात काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात सकाळी १० वाजता भगवंत मैदान येथून झाली. भगवंत मैदान- महाद्वार चौक- रामभाऊ पवार चौक- लोखंड गल्ली- तुळशीराम रोड- आझाद चौक- टिळक चौक- भोसले चौक- शिवाजी आखाडा- पोलिस स्टेशन- पोस्ट चौक- पांडे चौक असा मार्गक्रमण करत रॅली शिवसृष्टी येथे पहलगाम हल्ल्यातील मृतांना व शहीद जवांनाना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर सैन्य शौर्याच्या घोषणा बाजीनंतर राष्ट्रगीताने सांगता झाली. रॅलीमध्ये शिस्तबद्ध पद्धतीने यामध्ये सेवानिवृत्त जवान, माजी नगरसेवक, माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध सामाजिक घटक, विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने बार्शीकर सहभागी झाले होते. हातात तिरंगा धारण करुन भारत माता की जय, वंदे मातरम्, जय हिंद अशा घोषणांनी संपूर्ण वातावरण देशभक्तीने भारुन गेले होते.

या रॅलीचे आयोजन भारतीय जनता पार्टी, बार्शी शहर व तालुका यांच्यातर्फे करण्यात आले होते. प्रमुख उपस्थितीमध्ये माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष ॲड. असिफ तांबोळी, रमेश पाटील, विजय राऊत, संतोष निंबाळकर, भाऊसाहेब आंधळकर, विलास रेणके, महावीर कदम, दिलीप गांधी, सचिन मडके, बापूसाहेब कदम, संदेश काकडे आदी मान्यवरांचा समावेश होता.

ही रॅली राष्ट्राभिमान, सैन्याच्या पराक्रमाविषयी कृतज्ञता आणि लोकांमध्ये एकात्मतेचा संदेश देणारी प्रेरणादायी घटना ठरली.

